म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. ८८
१९८०
REFBK-0001811

# सुमनांचा अनुक्रम.


| | | पान. |
|---|---|---|
| १ | कुस्करूं नका हीं सुमनें | १ |
| २ | जगाहून भिन्न | ३ |
| ३ | झरा | ४ |
| ४ | मार्गप्रतीक्षा | ८ |
| ५ | रोखुनि मज पाहुं नका | १० |
| ६ | विधवेचें स्वप्न | ११ |
| ७ | ठावा न सुखाच्या वारा | १२ |
| ८ | गुराख्याचें गाणें | १३ |
| ९ | तुजवीण | १५ |
| १० | संध्यातारक | १७ |
| ११ | प्रियेस ( त्वेषानें घनघोर घर्घर रवें ) | १८ |
| १२ | —— कांते या जगतीं किती मिरविती | १९ |
| १३ | ——चंद्रानें गगना पयोधवलशा | २० |
| १४ | ——पातालांतुनि येतां वरवर गगनीं | २१ |
| १५ | ——नाहीं ज्या सुमनीं मधू | २२ |
| १६ | ——झाले जे कवि वंद्य | २२ |
| १७ | ——जेव्हां हो अति तीव्र शीत | २३ |
| १८ | घटोत्कचमाया | २४ |
| १९ | कां रे जासी मज त्यजुनी | २६ |
| २० | सुंदरीस | २८ |
| २१ | तारुण्यांतील एक प्रसंग | २९ |
| २२ | वदन मदनकेलिभुवन | ३२ |
| २३ | चिरंजीव कोण | ३२ |
| २४ | सत्प्रीतिमार्ग | ३६ |
| २५ | बुलबुलास | ३७ |

| | | |
|---|---|---|
| | | पान. |
| २६ | सखये या स्थानीं बसावें वाटे दिनरजनी ... ... | ३९ |
| २७ | बिजली जशि चमके स्वारी ... ... ... | ४२ |
| २८ | ये पहांटचा वर तारा ... ... ... | ४३ |
| २९ | देईं वचन तुला ... ... ... ... | ४५ |
| ३० | जीवन ... ... ... ... | ४६ |
| ३१ | –प्रत, मुलाच्या निधनकालीं ... ... ... | ४८ |
| ३२ | आलें तुझ्यारे दारीं नृपा ... ... ... | ५३ |
| ३३ | दुष्काळानंतरचा सुकाळ ... ... ... | ५४ |
| ३४ | मुलाच्या विवाहकालचे एका विधुराचे उद्गार . ... | ५५ |
| ३५ | प्रीतीचा वास ... ... ... ... | ५६ |
| ३६ | हा–तो ... ... ... ... | ५८ |
| ३७ | रसिकाप्रत ... ... ... ... | ५९ |
| ३८ | कुपित अंगनेप्रत... ... ... ... | ६१ |
| ३९ | क्रुद्ध सुंदरीस ... ... ... ... | ६२ |
| ४० | हाय हाय ! ती गेली गेली काय अतां उरलें ... | ६३ |
| ४२ | अजुनि लागलेंचि दार उजळे ही प्राची ... ... | ६४ |
| ४२ | पाडवा ... ... ... ... | ६५ |
| ४३ | वियोगिनी ... ... ... ... | ६८ |
| ४४ | सायंकाल ... ... ... ... | ७४ |
| ४५ | सृष्टिशिक्षण ... ... ... | ७५ |
| ४६ | प्रणयवंचिताचे उद्गार ... ... ... | ७५ |
| ४७ | कालाच्या चढुनी श्रमें वरिवरी चवऱ्यांयशीं पायऱ्या ... | ७७ |
| ४८ | गेली ज्योति विझोनियां मग फुका फुंका तयाला किती | ७८ |
| ४९ | राजकन्या व तिची दासी ... ... ... | ७९ |
| ५० | शुक्राची चांदणी ... ... ... ... | ८१ |
| ५१ | आनंद ... ... ... ... | ८१ |
| ५२ | वारा ... ... ... ... | ८३ |
| ५३ | क्षिप्राचमळासंगम ... ... ... | ८४ |

| | पान. |
|---|---|
| ५४ रासमंडळ गोपीचंदन तुलसिकी माला जय् ... | ८५ |
| ५५ आइकडे न्या ... ... ... | ८६ |
| ५६ चिमणी ... ... ... | ८८ |
| ५७ आतां गडि फू दादाशीं ... ... ... | ८९ |
| ५८ शिशुवंचन ... ... ... ... | ९० |
| ५९ मुशाफिर आम्ही ... ... ... ... | ९७ |
| ६० मातृभूमीप्रत ... ... ... ... | ९९ |
| ६१ एक चित्र ... ... ... ... | १०० |
| ६२ गतकाल ( १ ) ... ... ... ... | १०१ |
| ६३ गतकाल ( २ ) ... ... ... ... | १०२ |
| ६४ पन्नास वर्षांनंतर ... ... ... ... | १०३ |
| ६५ वंचित जीव ... ... ... ... | १०४ |
| ६६ विधवेचा आत्मयज्ञ ... ... ... | १०६ |
| ६७ आत्मयज्ञ ... ... ... ... | १०८ |
| ६८ हंसदूत ... ... ... ... | ११३ |
| ६९ जीवसंयोग ... ... ... ... | ११५ |
| ७० प्रणयप्रभा ... ... ... ... | ११६ |
| ७१ जीवनसंगीत ... ... ... ... | ११७ |
| ७२ प्रभु तुज कवणेंपरी ध्याऊं ... ... ... | ११८ |
| ७३ ॐ तत् सत् ... ... ... ... | ११९ |
| ७४ समर्पण ... ... ... ... | १२० |
| ७५ गारुडी ... ... ... ... | १२१ |


ग्रंथालय
नं. ५४५०
ता. ........

## विषयानुक्रम.


१ संग्राहकाचे दोन शब्द. ... ... ... ...

२ कविपरिचय. ... ... ... ...

३ प्रस्तावना. ... ... ... ...

४ कविता. ... ... ... ...

५ टीपा—परिशिष्ट अ. ... ... ... ...

परिशिष्ट आ. ... ... ... ...

# संग्राहकाचे दोन शब्द

प्रिय वाचकहो ! आज हीं सुमनें आपणां रसिकांस सादर करितांना मला अतिशय आनंद कां होत आहे, याचें कारण मला सांगतां येत नाहीं. १९१५ सालीं प्रथम मी तांबे यांची कविता वाचली. महिलापाठशाळेंतील विद्यार्थिनींना ही कविता शिकविण्याची संधी आल्यामुळें मी तिचें परिशीलन सुरू केलें. कवीचा अभिप्रेत अर्थ, काव्यस्फूर्तीचे प्रसंग इत्यादि जाणण्यासाठीं कवींबरोबर माझा पत्रव्यवहार सुरू झाला व तेव्हांपासून मी त्यांचें शिष्यत्व पतकरिलें. या सान्याचें पर्यवसान या सेवेच्या रूपांत झालें आहे. ही सेवा करूं देण्यांत ईश्वराचा कांहीं संकेतच असावा असें वाटतें. कारण रा. तांब्याच्या कविता त्यांच्या संग्रहीं नव्हत्या. व त्यांच्या स्नेह्यांना किती विचारून पाहिलें तरी त्यां वह्यांचा पत्ता लागत नव्हता. मोगरे, गडकरी, टिळक, ठोमरे, आगाशे यांसारखे वाङ्मयाचे अस्सल भक्त अकालीं कालमुखीं पडलेले पाहून अंतःकरणास चरके बसत होते; व भास्कररावांची कविता छापलेली पाहण्याचें आपले नशिबीं नाहीं असेंच वाटूं लागलें होतें ! पण एके दिवशीं इंदूरचे कवि श्रीयुत माकोडे हे सहज संस्था बघण्याकरितां आले असतांना मी त्यांच्याजवळ तांब्यांच्या हरवलेल्या कवितांची गोष्ट काढली. तेव्हां तांबे यांच्या कवितेची एक वही आपल्याजवळ असल्याचें त्यांनीं सांगितलें व या कविता छापण्याची कल्पना त्यांस पटून इंदुरास गेल्याबरोबर त्यांनीं वही पाठवूनहि दिली.

कविता हातांत आली पण प्रकाशनार्थ पैशाची व्यवस्था कोठून करावयाची ? तांबे यांजकडे चारसहा महिन्यांपूर्वीं चोरी होऊन नऊदहा हजारांचा ऐवज म्हणजे इतक्यावर्षांत जवळ जमविलेली सारीच पुंजी चोरीस गेल्यामुळें, कविता छापण्याचा खर्च त्यांना करण्यास सांगणें अशक्यच होतें. परंतु ही अडचण त्यांचे शिष्य श्रीमंत खासेसाहेब पवार यांस कळवितांच ३०० रुपये पाठवून देण्याचें श्रीमंतांनीं मोठ्या उदारपणानें कबूल केलें. या त्यांच्या गुरुभक्तीसाठींच हीं सुमनें ते नको नको म्हणत असतांहि त्यांस अर्पण केलीं आहेत.

त्यानंतरची महत्त्वाची मदत म्हणजे प्रो. वासुदेव बळवंत पटवर्धन यांची होय. हीं काव्यें वाचून प्रस्तावना लिहून देण्यासाठीं विनंती करतांच वासुदेवरावजींनीं कविकृतीबद्दल मतभेद असूनहि प्रस्तावना लिहून देण्याचें काम हौसेनें पतकरिलें. श्रीयुत भा. ल. लिखिते यांनीं प्रेसकॉपी तयार करून दिली. कवि श्रीयुत टेकाडे, यांनीं नागपुराहून रा. बोबडे यांजकडून ताम्ब्यांच्या कवितांची दुसरी प्रत मिळवून दिली. रा. वा. गो. आपटे यांनीं ताम्ब्यांच्या फोटोचा ब्लॉक फुकट वापरू दिला. जगद्धितेच्छु छापखान्याचे मालक रा. गोंधळेकर व चालक रा. गोखले यांनीं हीं सुमनें लवकर छापून निघावीं म्हणून अतिशय परिश्रम घेतले. माझे व्यवसायबंधु प्रो. हरि रामचंद्र दिवेकर व प्रो. वामन मल्हार जोशी यांनीं महत्त्वाच्या सूचना केल्या व अनेक उत्साहभंगाच्या प्रसंगीं उत्तेजन दिलें. वरील मित्रमंडळींच्या मदतीच्या अभावीं हें पुस्तक छापून निघणें अशक्यच होतें. या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहें. आपल्या कविता छापणें म्हणजे ईश्वराच्या लाडक्या बालांशीं स्पर्धा करणें अथवा न ध्यावा तेथें पाय देणें असें भास्कररावांस वाटत असूनहि माझ्या विनंतीस मान देऊन त्यांनीं आपलीं सुमनें छापूं दिलीं याबद्दल त्यांचे मी सानंद आभार मानतों.

पुस्तक छापतांना बरींच अशुद्धें राहून गेलीं आहेत. प्रुफें तपासण्याचें सर्व काम माझ्यावरच पडल्यामुळें हीं अशुद्धें राहून गेलीं. त्याबद्दल वाचक क्षमा करतील अशी आशा आहे.

हिंगणें. }
१।१२।२० } वा. गो. मायदेव.



श्री० सरदार खासेरावसाहेब पवार,

यांस

हा सुमनसंग्रह

सादर समर्पण असो.

मा. ... का.

# कविपरिचय

श्रीयुत भास्कर रामचंद्र तांबे यांचें मूळगांव खेटकुई. हे गांव रत्नागिरी जिल्ह्यांत आहे. तांबे यांचे पूर्वज पेशवाईंत गोविंदपंत बुंदेल्यांबरोबर उत्तर हिंदुस्थानांत गेले. त्यांच्या कामगिरीबद्दल बुंदेलखंडांतील कुढोण गांव त्यांना जहागीर म्हणून मिळाला. झांशी खालसा झाली त्या वेळेस ह्या गांवावरहि गदा आली; तथापि त्यांतला कांहीं भाग तांबे कुळांत अद्याप चालत आहे.

भास्कररावांचे आजे गंगाधरशास्त्री तांबे हे एक प्रसिद्ध शास्त्री व वैद्य होते. यानां चार मुलगे होते. पहिले रामचंद्रराव, दुसरे लखुभय्या, तिसरे मुकुंदराव व चौथे बाळकृष्णपंत. यापैकीं रामचंद्रराव याचे द्वितीय चिरंजीव भास्करराव होत. भास्कररावांस तीन भाऊ व दोघी बहिणी आहेत. भास्कररावांचे मातामह कै. बळवंत रामकृष्ण डोंगरे हे देवास येथें फडणीशीच्या कामावर होते. ह्यांना विलक्षण विद्याभिरुचि होती. ते स्वतः तर संस्कृत शिकलेच पण त्या काळांत त्यांनीं आपल्या मुलीबाळींसहि स्वतः शिकविलें. रात्रीं ९ वाजतां घरांतील सर्व मंडळींनीं दिवाणखान्यांत जमलें पाहिजे असा त्यांचा कडक नियम असे. त्या वेळेस पुराणांतील कांहीं महत्त्वाचा भाग काढून, तो सर्व मंडळीस ते स्वतः वाचून समजावून देत असत. याचा विलक्षण संस्कार त्यांच्या मुलाबाळांवर झाला आहे. विद्याभिरुचि व निस्पृहपणा हे गुण कवींत यांच्यामुळेंच उतरले असावेत असें वाटतें. भास्कररावांची आजी मथुबाई डोंगरे यांचा मुख्य गुण प्रेमळपणा हाहि कवींत अत्यंत उत्कट रीतीनें उतरला आहे. भास्कररावांच्या मातुःश्रीचें नांव यमुनाबाई. या अजून हयात आहेत.

भास्कररावांचा जन्म ग्वाल्हेर संस्थानांत मुगावली मुक्कामीं इ. स. १८७४ त झाला. त्या वेळेस झांशीहि शिंद्यांकडेच होती व रामचंद्रपंत तेथेंच नोकरीस होते. ग्वाल्हेर सरकारचें शिक्षणखातें त्या वेळेस इतकें व्यवस्थित नसल्यामुळें भास्कररावांचें प्राथमिक शिक्षण झांशी व मुगावली येथें धूळपाटीवरूनच

झालें. सन १८८५ मध्यें इंग्रज सरकारनें झांशी आपल्याकडे घेतली. त्यामुळें झांशीची सुभायत भांडेर मुक्कामीं गेली व भास्कररावांच्या वडिलांस भांडेर येथें जावें लागलें. या वेळीं भास्करराव ११।१२ वर्षांचे असतील. परंतु या वेळेपर्यंत भास्कररावांनीं पांडवप्रताप रामविजय वगैरे ग्रंथांचीं बरींच पारायणें केलीं होतीं व त्यानां तुलसीकृत रामायणहि बहुतेक पाठ झालें होतें. भांडेर मुक्कामीं शिक्षणाची सोय नसल्यामुळें १८८८ सालीं भास्करराव आपल्या आजोळीं देवास येथें गेले, व देवास हायस्कूलमध्येंच त्यांच्या शिक्षणास खरा आरंभ झाला. पण भास्करराव देवास येथें जाऊन फार दिवस झाले नाहींत तोंच रामचंद्रपंत वारले. हें पाहून बळवंतराव डोंगरे यांनीं भास्कररावांकडून कांहीं फारशीचा व कांहीं कायद्याचा अभ्यास करवून घ्यावा म्हणून देवास हायस्कुलांतून काढून त्यांस उज्जेन एथें पाठविलें. त्यांचे वडील बंधु गोपाळराव बरेच दिवसांपासून उज्जेन येथें शिकत असून या वेळीं ते प्रवेशवर्गात होते. भास्कररावांचे मामा केशवराव डोंगरेहि त्याच वर्गात होते व त्यांजवळच भास्करराव रहात असत. येथेंच भास्कररावांच्या चरित्रांत महत्त्वाचा बदल करणारा एक विलक्षण प्रसंग घडून आला.

नारायणराव रास्ते म्हणून एक विद्यार्थी केशवराव डोंगरे यांचे सहाध्यायी असत. एका रात्रीं भास्करराव ऊंस खात आपल्या मामांच्या खोलींत गेले. तेव्हां नारायणराव रास्ते व केशवराव डोंगरे हे बीजगणिताचीं उदाहरणें सोडवीत होते. भास्कररावांनीं आंत गेल्याबरोबर नारायणरावांस विचारिलें. "काय हो नारायणराव, काय चाललें आहे." "भास्कर, तुला त्याच्याशीं काय करावयाचें आहे ? तूं फक्त खडेंघांशी करावीस ! या फार मोठ्या गोष्टी आहेत ! येथपावेतों तुझी पोंच नाहीं !" असें उत्तर नारायणरावांनीं दिलें. हें ऐकतांच भास्कररावांच्या तोंडून एकदम पुढील उद्गार निघाले.

" पण लक्षांत ठेवा नारायणराव कीं मी तुमच्या आधीं प्रवेशपरीक्षा पास होईन." या वेळेस भास्कररावांस इंग्रजी पहिलें पुस्तक वाचतां येत असेल किंवा नसेल. वरची प्रतिज्ञा केलेली पाहून नारायणरावांस हंसू कोसळलें व ते म्हणाले "भास्कर, दहा रुपयांची पैज !" " बरें पैज " !

झालें; प्रतिज्ञा तर केली पण ती पार कशी पाडावयाची याचे विचार भास्कररावांच्या मनांत रात्रभर घोळत होते. त्या विचारांचा परिणाम ह्मणजे भास्कररावांनीं सूर्योदयापूर्वी उज्जेन सोडलें व देवासची वाट धरली. पण मुलाचीच जात! चार पांच कोस चालला नसेल तोंच पोटांत कावळे ओरडूं लागले! थकल्यामुळें दुःश करीत हा मुलगा कुंपणाशेजारीं बसला. भुकेनें व्याकुळ झाल्यामुळें कुंपणापाशीं वांकलेल्या एका पेरूच्या झाडाकडे त्याची दृष्टी गेली व फांदी वांकवून त्यानें एक पेरू तोडला. पण इतक्यांत बागवानाची भयंकर आरोळी त्याच्या कानावर आली व ह्मातारा बागवान हातांत काठी घेऊन बागेबाहेरहि आला. त्याबरोबर हातांतील पेरू पुढें करून हा मुलगा ह्मणाला "बावा, हा पहा तुझा पेरू. अजून मी खाल्ला नाहीं. हा तुझा तूं घे! माझ्याकडून अपराध झाला खरा!" तें ऐकून बागवानानें त्या नुसत्या सदरा टोपी घातलेल्या पोराकडे पाहिलें व तो कळवळून म्हणाला! "भय्या खाव्. मैं और ला देता हूं" असें म्हणून भास्कररावांस त्यानें आंत नेलें व खावयास दुसरीं कांहीं फळें आणि प्यावयास पाणीहि आणून दिलें. तो म्हणाला "मुला, तूं फार थकलेला दिसतोस; तूं आमच्या गांवीं येशील तर आमचे ठाकूरसाहेब तुझा शीण कमी झाल्यावर तुला तुझ्या गांवीं पोंचवितील." पण भास्करराव ऐकेनात. तेव्हां त्यानें देवासाकडे जात असणाऱ्या एका चाऱ्याच्या गाडींत त्यांस बसवून देवाशास रवाना केलें. ती गाडी रात्रीं ९ वाजतां देवाशास पोंचली. भास्करराव उतरले ते आजोळीं न जातां तडक हायस्कुल सुपरिन्टेंडंट रा. काशिनाथपंत लेले यांजकडेच गेले!

ही मूर्ति अशा वेळीं अशी आलेली पाहून लेलेमास्तरांस गहिंवर आला! त्या वेळेस भास्करराव ह्मणाले " मास्तरसाहेब अज्ञानांत राहण्यापेक्षां मरण बरें! मला इंग्रजी शिकवा!" त्यावर लेले ह्मणाले, " अरे, इंग्रजी येणें ह्मणजेच कांहीं ज्ञान नव्हे! या जगांत इंग्रजी न शिकलेले हजारों लोक इंग्रजी शिकलेल्यांहून ज्ञानी आहेत. पण तुझी इच्छाच असेल तर तुझ्या इंग्रजी शिकण्याची मी व्यवस्था करीन. आतां तूं दमला आहेस! जेव व स्वस्थ जाऊन नीज. काळजी करूं नको!" दुसरे दिवशीं सकाळीं या बटु मूर्तीस बरोबर घेऊन लेलेमास्तर बळवंतराव

डोंगऱ्यांकडे गेले व बळवंतरावांस त्यांनीं सर्व इतिहास सांगितला. हें ऐकून बळवंतराव ह्मणाले " हा वेड्या ! मला हें आधीं सांगतास तर मी तुला मुळींच उज्जेनीस पाठवलें नसतें ! कांहीं हरकत नाहीं. तुझ्या इच्छेप्रमाणें तूं इंग्रजी शीक ! " झालें; इंग्रजी शिक्षणास आस्थापूर्वक आरंभ झाला ! व चार वर्षांत ह्मणजे १८९३ मध्यें भास्करराव अलाहाबाद युनिव्हर्सिटीची प्रवेश परीक्षा पहिल्या वर्गांत पास झाले. दुर्दैवानें उपहास करणारे नारायणराव मात्र तोपावेतों पास झाले नव्हते ! असो.

भास्कररावांच्या जीवनक्रमांत अनुकूल क्रांति घडवून आणणारे जर कोणी असतील तर ते रा. काशिनाथपंत लेले होत; आणि याच दृष्टीनें मी या गुरुशिष्यांच्या कांहीं गोष्टी सांगणार आहें. गुरुशिष्यसंबंध कसा असावा ह्या दृष्टीनें या गोष्टींचा उपयोग होण्यासारखा आहे. हा एक फायदा परंतु दुसरा प्रधान फायदा असा कीं, कवीमधील काव्यांकुर जोपासनेनें कसा वाढविण्यांत आला हेंहि या गोष्टीमुळें कळणार आहे !

एकदा भास्करराव मॉनिटर असतांना शाळा सुटण्याचे सुमारास हजेरीपट भरीत होते. एका विद्यार्थ्यानें गडबड केली, तेव्हां विचित्रपणानें त्यांनीं त्या मुलास वांकोल्या दाखविल्या. वर्गासमोर असलेल्या ऑफिसमधून तें लेलेमास्तर यांनीं पाहिलें त्यांना तें न खपून ते छडी घेऊन आले. व भास्कररावांच्या पायावर त्यांनीं २।३ छड्या ओढल्या. ते ह्मणाले " तूं असें केलेलें मला खपावयाचें नाहीं दुसऱ्यांची गोष्ट वेगळी. तूं मोठा माणूस होणार आहेस ! You will remember that an old man foretold your fortune; therefore be dignified and respectful. I mean, dignified to yourself and respectful to others. " तांवे हूं का चूं न करितां शाळेच्या बाहेर गेले; परंतु वरील वाक्यांचा परिणाम आपल्यावर फार झाला असें भास्कररावांचें ह्मणणें आहे.

•

भास्कररावांस शाळेंत असल्यापासूनच इंग्रजी पुस्तकांतील कवितांचें भाषांतर करमणुकीखातर करण्याचा नादच असे. वर्ग चालला असतांना भाषांतर करावें व घरीं जातांना चोळामोळा करून कागद टाकून द्यावे, हा यांचा नेहमींचाच क्रम असे. एकदां असाच चोळामेळा करून कागद

टाकतांना भास्कररावांस लेलेमास्तरांनीं पाहिलें. त्यांनीं तो कागद उच-लून घेतला व उघडून पाहतात तों त्यावर पुढील ओळी लिहिलेल्या होत्या,

**'अहामतिगती खुटे तव कृती परी नाकळे**
**बघूनि अशि ही स्थिती दुरभिमान देवा गळे'**

या ओळी वाचून मास्तरांस विस्मय वाटला व त्यांनीं विचारलें, " काय रे या ओळी कोणी लिहिल्या ? " याबरोबर भास्कररावांनीं भीत भीतच उत्तर दिलें " होय मास्तर, मीच लिहिल्या. " भीतभीत दिलेलें उत्तर ऐकून मास्तरांस मोठें कौतुक वाटलें. या बालभास्कराचें हें काव्यतेज पाहून लेलेमास्तरांनीं त्यास कांहींना कांहीं तरी कारणानें काव्यविषयक व इतर चांगलीं पुस्तकें बक्षिस म्हणून देण्याचा सपाटा चालविला; व प्रत्यक्ष साहित्यशास्त्राचा अभ्यास करवून घेण्यासाठीं बळवंतराव कमळाकर यांचा मराठी रसप्रबोध, आणि ध्वन्यालोक हे ग्रंथ छापून प्रसिद्ध होण्यापूर्वींच भास्कररावांकडून वाचवून घेतले.

काशिनाथपंत लेले यांनीं तांबे यांच्या कवितावल्लीची जोपासना करण्याकरितां कोणते परिश्रम केले हें विचारण्यापेक्षां कोणते केले नाहींत हें विचारणें योग्य होईल. कोठलाहि रसिक प्रसंग असो, वादविवाद असो, फार काय कथा असो, तांब्रे यांस त्यांनीं आपल्याबरोबर घेऊन जावें. या वेळची कवीचा हूड स्वभाव दाखविणारी एक गोष्ट सांगितल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं.

देवास येथें मोठ्या पातीच्या दिवाणसाहेबांकडे कथा होती. कीर्तनकारांचा एकेका श्लोकाचे दहा दहा अर्थ करण्यांत हातखंडा असे. इतर कवींचें असो पण तुकारामासारख्या भोळ्या संताच्या उक्तीचेही जेव्हां कीर्तनकारांनीं दोन दोन अर्थ करण्यास प्रारंभ केला तेव्हां ही काव्यदेवीची ओढाताण भास्कररावांस खपली नाहीं. " मग ती कशाची माउली । तान्हें कशासाठीं व्याली " याचा सरळ अर्थ सांगून बुवांनीं नंतर ' कसा ' शब्दावर श्लेष करून असाही अर्थ केला कीं, अशी आई म्हणजे पैशाच्या पिशवीची आई !! दुसरे दिवशीं तांबे आपल्या नेहेमीच्या क्रमाप्रमाणें मास्तरांकडे गेले असतां बुवा व त्यांच्या चेल्यांचा घोळका लेले मास्तरांकडे आला. नमस्कार चमत्कार झाल्यावर बुवांच्या एकेक

श्लोकाचे दहा दहा अर्थ लावण्याच्या कौशल्याबद्दल गप्पा सुरू झाल्या; त्या वेळेस तांबे यांस तें सहन न होऊन ते कोंपऱ्यांतूनच मोठ्यानें म्हणाले " तें तर खरेंच, पण बुवांनीं जें ध्रुवपद लावलें होतें त्याचे ही दोन अर्थ होतात हें त्यांच्या लक्षांत आलेसें दिसत नाहीं, ' कथामृत संतत पान करी ' याचा आणखी एक अर्थ होतो कीं कथा मृत । संत तपा न करी । मग कथेकरी कितीहि ओरडो ! " हें ऐकून मंडळींत एकच हंशा पिकला गुरुजींनीं डोळे वटारले व तांब्यांनींहि तेथून हळूच पळ काढला ! यावरून लहानपणापासूनच भास्कररावांमध्यें हूडपणा, सदभिरुची व कोटिक्रम करण्याची शैली या गुणाचे अंकुर कसे वृद्धिंगत होत होते हें कळण्याजोगे आहे!

बालपणच्या त्यांच्या कौतुकास्पद बुद्धीची आतां आणखी एकच गोष्ट सांगतों. भास्करराव प्रवेशवर्गांत असतांना Agent to the Governor General ची स्वारी येणार म्हणून देवास येथें मोठी गडबड उडून गेली. शाळा स्वच्छ होऊं लागल्या. मास्तर भाषणें शोधूं लागले मुलें आपापली संभाषणें उतरून घेऊं लागलीं. लेले हेडमास्तरांनीं तांबे यासहि साहजिकपणेंच एक मेकॉलेचा इंग्रजी भाषेच्या स्तुतिपर उतारा पाठ करावयास दिला. परंतु तांबे तो पाठ करीनात ! ते म्हणत कीं, ' मास्तरसाहेब , मला संस्कृत भाषेच्या स्तुतिपर असा एखादा उतारा असल्यास द्या; तो मी पाठ करीन !" लेले यांनीं खटपट करून पाहिली पण तसा उतारा कांहीं त्यांस सांपडला नाहीं व म्हणून तो इंग्रजी उतारा पाठ करण्याचा मास्तरांनीं हट्ट धरला. अर्थात् तांबे यांस हें खपलें नाहीं ! त्याच रात्रीं बारा वाजण्याच्या आंत गीर्वाण भाषेच्या गौरवपर त्यांनीं २५ । ३० श्लोक लिहिले व सकाळीं मोठ्या डौलानें ते गुरुजींस नेऊन दाखविले ! झालें. ते श्लोक वाचून गुरुजींचा आनंद गगनांत मावेना ! आमचें दुर्दैव कीं ते श्लोक आपल्याला उपलब्ध नाहींत व भास्कररावांना ते सगळे आठवत नाहींत! जे एकदोन आठवत आहेत ते परिशिष्ट 'आ'मध्यें दिले आहेत. ते त्यांच्या वयाच्या मानानें त्यांना बरेच भूषणास्पद आहेत असें कोणीहि कबूल करील. त्या वेळेस लेलेमास्तरांना मात्र एक दोन दिवस उद्योग नव्हता.कारण ते एकसारखे "ही

पहा आमच्या भास्करानें लिहिलेली कविता" असें म्हणून ती सगळ्यांना दाखवीत फिरत होते.

श्रीयुत तांबे यांचे थोरले बंधु गोपाळरावजी हे अतिशय निस्पृह गृहस्थ आहेत. हे कॉलेजमध्यें बी. ए. च्या वर्गात असतांना भास्करराव प्रवेश परीक्षा पास झाले. गोपाळरावजींचें शिक्षण चालावें म्हणून भास्कर रावांनीं हौस असूनहि स्वार्थत्यागपूर्वक कॉलेजचें शिक्षण सोडलें. या स्वार्थत्यागाचा परिणाम असा झाला कीं, गोपाळराव यांस बी. ए. होतां आलें व आज ते इंदूरमध्यें कर्तृत्ववान, इंग्रजी भाषेवर प्रभुत्व गाजवणारे व अत्यंत निःस्पृह गृहस्थ म्हणून प्रसिद्ध आहेत.

कॉलेजमधील शिक्षणाचा प्रयत्न करण्याचें ज्या वेळेस भास्कररावांस सोडावें लागलें त्या वेळेस घडलेला एक महत्त्वाचा प्रसंग देणें अप्रासंगिक होणार नाहीं. इंदुरहून देवास येथे भास्करराव परत आल्यावर आपल्या नशिबीं उच्च शिक्षण नाहीं असें वाटून उदासीन व खिन्न असे घरांत रहात असत. हें त्यांच्या प्रेमळ आजीच्या म्हणजे मथुबाई डोंगरे यांच्या लक्षांत आल्यावांचून राहिलें नाहीं तिनें सरतेशेवटीं एकदां विचारिलें. "कायरे भास्कर, तुला कांहीं होतें का ? तू असा खिन्न कां दिसतोस." त्यावर भास्कररावांनीं उत्तर दिलें "नाहीं ग आई, मला आतां पुढें शिकतां येत नाहीं ह्मणून वाईट वाटतें." हें ऐकून मथुबाई पुढें म्हणाल्या "हा वेड्या, तू असें वाईट वाटून घेऊं नकोस! तूं शिकलास काय आणि न शिकलास काय तुला कांहींहि कमी पडणार नाहीं. भैय्यासारखें तुझेंहि सगळें नीट होईल. संसारांतील सुखदुःखें केवळ विद्येवर अवलंबून नसून दैवावरहि आहेत" या शब्दांनीं भास्कररावांना समाधान वाटलें. आजीचा आशीर्वाद खराच फळास आला. आपल्या प्रेमळ आजीच्या त्या शब्दाची आठवण होतांच प्रेमाश्रूंच्या धारा भास्कररावांच्या डोळ्यांतून अजून कशा वाहूं लागतात, हें सांगणें वर्णनातीत आहे.

भास्कररावांस दोन धाकटे बंधु आहेत. यांपैकीं सर्वांत धाकटे हे इंदुरास रेव्हिन्युखात्यांत नोकर आहेत. दुसरे गणपतराव; यांचा इतिहास मी जरासा विस्तृतपणें सांगणार आहें. गणपतराव हेही प्रवेशवर्गापर्यंत सारखे पास होत गेले. परंतु कॉलेजमध्यें गेल्यावर त्यांचें अभ्यासा-

कडे लक्ष लागेना. व ते बावरल्याप्रमाणें करूं लागले. फार काय; लवकरच ते कॉलेज सोडून देवाशास परत आले. दोघांहि वडील बंधूंनीं त्यांनीं कॉलेजमध्यें जावें ह्मणून आग्रह चालविला; पण रोग एक, निदान दुसरें व उपचार तिसरा अशी स्थिति झाल्यामुळें वेड कांहीं केल्या हटेना. याही प्रसंगीं काशीनाथपंत लेले यांनीं रोगाचें कारण ओळखलें व तो रोग दूर करणाऱ्या चतुर हकीमाची ते वाट पहात बसले. कर्मधर्मसंयोगानें त्याच वेळेस बलभीमबुवा नावांचें सत्पुरुष देवाशास आले. व त्यांच्या वाणींतील रामदासी तेज लेले यांनीं ओळखून एके दिवशीं या बुवांची व गणपतरावांची गांठ घालून दिली. थोडक्याच दिवसांत गणपतरावांचें वेड दूर झालें. तेव्हांपासून त्यांच्या वृत्तींत फरक पडून ते हरिगुणचिंतनांत निमग्न राहून संसार चालवीत असतात. यांनींहि परमार्थ विषयपर बरीच कविता लिहिली आहे.

भास्कररावांच्या कवितेंत जो ईश्वराकडे विलक्षण ओढा दिसतो तो या बलभिमबुवांच्या सांनिध्याचा परिणाम होय. भास्कररावांचा स्वभाव इतका प्रेमळ, समरस होणारा, व वत्सल आहे कीं बलभीमबुवांनीं " कन्या सासुऱ्याशीं जाये । मागें परतोनी पाहे ॥ ऐसें झालें माझ्या जीवा कधीं भेटसी केशवा ॥ " हे शब्द उच्चारले कीं भीतीनें गांगरून जाऊन, प्रमादाबद्दल पश्चात्ताप पाऊन, एखाद्या अतंर्यामीं चुकल्याचुकल्याप्रमाणें वाटणाऱ्या कोंवळया मनाच्या सुकुमार मुलीप्रमाणें ते कळवळून जात असत. हा प्रेमाचा पाझर, हा कोमल कळवळा, व हें अनन्य प्रभुगुणगान हा बलभीमबुवांच्या सहवासाचा परिणाम नाहीं असें कोण ह्मणेल ? आपल्या धाकट्या भावास वेड लावणारे ह्मणून बुवांची प्रथम निर्भर्त्सना व अपमान करणारे भास्करराव या बुवांच्या ईश्वरी व अमोघ प्रेमळवाणींत पुढें इतके रंगून जाऊं लागलें कीं, तुकाराम नामदेवांचे अभंग ऐकून यांनीं भक्तिरसानें अंतःकरण ओथंबल्यामुळें तासतास आनंदाश्रू वाहवावे !

१८९३ सालीं भास्कररावांस काशीनाथपंत लेले यांनीं पुण्यास, मुंबईस व इतर ठिकाणीं नेलें, तेथलि शाळा, किल्ले, लेणीं व इतर सृष्टि-

सौंदर्याचे अनेक महत्त्वाचे प्रदेश त्यांच्या नजरेस आणिले व या प्रवासानें ज्ञानाची पूर्तता करून दिली !

भास्कररावांचा संसार सर्वांगसुंदर करण्याचें बरेंच श्रेय ज्या साध्वीस आहे त्या म्हणजे रतलाम येथील त्र्यंबकराव आळतेकर यांची कन्या वारूबाई या होत. यांचा विवाह भास्कररावांबरोबर १८९६ सालीं झाला. या विवाहामुळें भास्कररावांच्या जीवनक्रमांत ओलावा उत्पन्न होऊन त्यांचें जीवित किती प्रेममय व सुखमय झालें आहे हें माहीत असूनहि वर्णन करतां येण्याजोगें नाहीं. परंतु जातां जातां एकदोन गोष्टींचा उल्लेख केल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. करारी, निस्पृह व दृढ स्वभावाच्या भास्कररावासारख्या वृक्षाला या प्रेमळ वल्लीचा विळखा पडला नसता तर हा वृक्ष कदाचित् कधींच नीरस, शुष्क व जीर्ण झाला असता. तांब्यांच्या जीविताचें सार केवळ प्रेमजीवनावरच आहे, असें म्हटलें तरी चालेल. "ताना या परि पावल्या जनन गे प्रेमीं तुझ्याची तरी" या कवीच्या उक्तिप्रमाणें प्रस्तुत संग्रहांतील पुष्कळशीं सुमनें या प्रेमांतच विकास पावलीं आहेत.

भास्कररावांस एकंदर नऊ अपत्यें झालीं. त्यांतील एक मुलगा व दोन मुली एवढीं तीन कालवश झालीं. व आज तीन मुली व तीन मुलगे हयात आहेत. यांची वडील मुलगी सौ. मथुबाई ही छिंदवाडा येथें रा. उमाकांत बालकृष्ण घाटे या तरुण व होतकरू वकीलास दिली आहे. प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणासाठीं हिनें एक नाईटक्लास चालविला आहे. इतर देशसेवेच्या प्रसंगींहि ही हौसेनें पुढाकार घेत असते.

श्रीयुत तांबे यांचें स्नेही म्हणजे प्रो. पाटणकर प्रो. शांताराम अनंत देसाई, रा. बाळकृष्ण अनंत देव रा. नाराय राव दुबे. प्रो. गं. वा. गरूड, रा. नरहर शंकर रहाळयर व रा. वासुदेव गोविंद आपटे हे होत. भास्कररावांचें व माझें नातें गुरुशिष्याचें आहे, हें मागें आलेलेंच आहे.

भास्करराव हे देवासच्या खासेसाहेबांस लहानपणीं शिकवाथास होते. त्यांनाच हीं सुमनें प्रेमळपणानें व कौतुकानें अर्पण केलीं आहेत भास्कररावांनीं देवास, इंदूर, पिपळजा वगैरे संस्थानांत मोठमोठ्या हुद्यांचीं कामें केलीं आहेत. ते सरळपणानें वागतात. ते खऱ्याचे अभिमानी

व निस्पृह आहेत. यामुळें ते अप्रिय बोलत असले तरी प्रिय वाटूं लागतात. खऱ्या गोष्टी संस्थानांच्या राजांपुढेंहि बोलण्यास त्यांनीं कधीं माघार घेतली नाहीं. फार काय पिपळजाच्या संस्थानांच्या राजकीय हक्कासंबंधीं सरकाराशीं झगडा उपस्थित झाला असतांना संस्थानाचे हक्क त्यांनीं निर्भीडपणानें एक तास भांडून मिळविले. याचा परिणाम म्हणजे पिपळजाच्या महाराजांनीं भास्कररावांस बक्षीस म्हणून रुपये एक हजार व भास्करराव दरबारांत आले असतां पिपळजाच्या राजवंशजांनीं उठून खडी ताजीम देण्याची सनद दिली आहे. हे गेलीं तीनचार वर्षे राजपुतान्यांतील प्रतापगड संस्थानांत मुख्य न्यायाधीशाचें काम पहात आहेत.

भास्कररावांना हिंदी, संस्कृत, इंग्रजी व उर्दू या भाषा चांगल्याच अवगत आहेत. साहित्यशास्त्राच्या नियमांस धरून संस्कृत काव्यनाटकांचा परिचय करून देण्याचें काम भास्कररावांचे गुरुजी काशीनाथपंत लेले यांनीं केलेंच होतें. भास्कररावांनीं तुळसीदास रामायण लहानपणींच पाठ केलें होतें, त्यामुळें हिंदी वाङ्मयाबद्दल गोडी उत्पन्न होऊन त्यांनीं तेंहि बरेंच वाचलें आहे. हीं सुमनें छापण्यापूर्वीं मी प्रतापगड येथें मुद्दाम गेलों होतों. तेथील लोकांनीं भास्कररावांची तुळसीदासाचें रामायण सांगण्याची हातोटी कांहीं अजब आहे असें सांगितलेलें मला स्मरतें. राजपुतान्यांत मुसलमानी प्रजा बरीच असल्यामुळें उर्दूचा प्रसार तिकडील संस्थानांत विशेष आहे न्यायसभेंत या भाषेचा तर हरवडी उपयोग करावा लागत असल्यामुळें भास्करराव उर्दू शिकले व त्या भाषेंत त्यांनीं सुंदर गजलही लिहिले आहेत. त्यांपैकीं कांहीं माझे संग्रहींहि आहेत. परंतु मराठी वाचकांस ते दुर्बोध वाटण्याचा संभव असल्यामुळें या पुस्तकसंग्रहांत ते छापले नाहींत. इंदूर येथील कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्यापुढें वर्डस्वर्थटेनिसन वगैरे आंग्लकवींचे विशेष भास्कररावांनीं अनेकदां मांडले आहेत. त्या वेळीं एका प्रसंगीं हजर असलेले मिशनकॉलेजचे किंगसाहेब यांनीं भास्कररावांस इंग्रजी कवींचें हृद्गत इतकें कळतें व सुंदर तऱ्हेनें मांडतांहि येतें याबद्दल त्यांचा आपल्यास हेवा वाटतो अशा अर्थाचे उद्गार काढले होते.

भास्कररावांनीं ' कवितेचें मूळ अथवा महाश्वेतेचें निवासस्थान ' वगैरे पनपन्नास पानांचे तीन निबंध लिहिले आहेत ' ' भयंकर प्रमाद ' म्हणून एक नाटकही त्यांचेजवळ लिहून पडलें आहे.

भास्कररावांचें शील व चारित्र्य दाखविणाऱ्या खासगी गोष्टीहि सांगण्याच्या भरीस मी पडलों म्हणून कित्येक वाचकांचा रोष माझ्यावर होईल, हें मी जाणून आहे. परंतु कवितेचें स्वारस्य पूर्णपणें लक्षांत येण्यास कवीचें खासगी व्यक्ति या नात्यानें जेवढें म्हणून कळेल तेवढें आवश्यक आहे; खासगी गोष्टींनीं कवीच्या कवनांतील आभासात्मक विचारांवर पुष्कळच प्रकाश पडतो; इतकेंच नव्हे तर कवीची विचारसरणी व यथार्थ योग्यता ध्यानांत येण्यास वाचकानें त्या जाणण्याचा यत्न केला पाहिजे, अशा मतांच्या लोकांपैकीं मी एक असल्यामुळें विस्तारभय वाटत असूनहि कांहीं गोष्टी मी लिहिल्या आहेत. आतां येथून भास्कररावांच्या सुमनांकडे वळूं.

' गेली ज्योति विझोनियां मग फुका फुंका तयाला किती ' ही चतुर्दशपदी वाचून केशवसुत प्रसन्न झाले व रहाळकराजवळ ' भास्करराव हे जीवंतवाणीचे निसर्ग कवि आहेत ' अशा अर्थाचे उद्गार त्यांनीं काढिले. हे केशवसुतांवरील रहाळकरांच्या निबंधांत पुष्कळ वाचकांनी वाचलें असेल. अशा अधुनिक काव्यक्षेत्रांतील भीष्माचार्यांचें ज्यांना पदस्पर्श [illegible] आहे, त्यांच्या काव्यसुमनांचे गुणवर्णन करण्याची विशेष आवश्यकता नाहीं; तथापि विशेषतः सामान्य वाचकास या सुमनांत विशेष गुण कोणते आहेत हें थोडक्यात आधींच कळल्यास थोडासा तरी उपयोग होण्याचा संभव असल्यामुळें या मीमांसेकडे आतां मी वळतों.

मराठी वाङ्मयाचा हा काल म्हणजे नवजीवनाचा काल आहे असें म्हटलें तरी चालेल. हल्लींच्या मराठी वाङ्मयावर अनेक भाषांचा अनेक प्रकारें परिणाम होत आहे. इंग्रजी, संस्कृत, हिंदी, उर्दू वगैरे भाषातील पद्धति, विचार, संकेत, छंद वगैरे सर्व बाबींची थोड्याबहुत प्रमाणांत तरी मराठी वाङ्मयावर छाप दिसत आहे. फार काय जुन्या मराठी वाङ्मयांतील अभंग पोवाडे लावण्या यांतील प्रेमळपणा, वीररस, झोंकनोक या सर्वांचीहि झांक हल्लींच्या कवनांतून दृष्टीस पडत आहे. भास्कर-

रावहि आधुनिक कवि असल्यामुळें या वातावरणांत वावरत असलेल्या विचारगंधाचें अस्तित्व त्यांच्याहि काव्यांत भासमान होतच आहे. तथापि सर्व बाबींत भास्कररावांची आपली छाप वठविण्याची कला किती सुंदर आहे हें क्रमानें पुढें येईल.

रसाच्या दृष्टीनें भास्कररावांच्या सुमनांकडे पाहूं लागल्यास तीं ' होय श्रृंगारा करुणरसा थारा ' अशींच आहेत. हें कोणीहि कबूल करील. हे दोन्ही रस या सुमनांत ओथंबलेले आहेत. हा श्रृंगाररस दोन तऱ्हांनीं पुष्ट झालेला दिसतो. या सुमन संग्रहांतील पुष्कळशीं सुमनें त्यांनीं आपल्या पत्नीस अनुलक्षून लिहिलीं आहेत. दोन्ही तऱ्हेच्या श्रृंगाराची जरी त्यांत उदाहरणें सांपडलीं तरी हा सर्व शृंगार भारदस्त, प्रौढ अथवा शुद्ध असाच आहे. संसार म्हणजे सुखाचे हिरवेगार दिन होत. ते तसें करण्याचें सामर्थ्य एका प्रेमळ पत्नींतच असतें. गोड मुलांचा लाभ, आप्तांचा मनमिळाऊपणा, जिवास जीव देणाऱ्या मित्रांची प्राप्ती, व्यवहारांत समाधानासारख्या पैशाचा लाभ, ईश्वरावरील श्रद्धेचा परिपोष, या सर्व गोष्टी चांगल्या पत्नीच्या लाभानेंच अनुकूल होत असतात. वरील सर्व गोष्टी अशाच प्रेमळ पत्नीच्या सांन्निध्यानें भास्कररावांसहि लाधल्यामुळें त्यांच्या बऱ्याच कविता शुद्ध प्रेमसुधेनें ओथंबलेल्या आहेत. या तानांचें जनन भास्कररावांनीं आपल्या प्रेमळ पत्नीच्या सहवासांतच आहे असें स्पष्ट सांगितलें आहे हें वांचकांस (नं. ११) प्रियेस या कवितेंत पहावयास सांपडेल. या खासगी परंतु शुद्ध शृंगाराच्या कविता हिंदु पतिपत्नीचें अंतःकरण कसें एकजीव असतें निदान असें असावयाला पाहिजे—हें चांगलेंच ध्वनित करितात.

शृंगाराशीं समरस असलेल्या प्रेमरत्नाची प्रभा क्षणोक्षणीं नवी नवाई कशी दाखवीत आहे हें यांतील कांहीं सुमनें चाळणाऱ्याच्या लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं. / लहानपणीं लहान भावाबहिणींत चालणारी गोड मस्करी (५७); स्वार्थत्यागी तरुणांत आढळून येणारें धाडसी प्रेम (२८); प्रेमानें भारून गेलेल्या प्रणयसुंदरीची गुलाबी थट्टा (४९); वीरपत्नीला वाटणारें आपल्या शूर पतीबद्दलचें अद्भुत प्रेम(२७); पत्नीप्रेमांत दंग झालेल्या प्रणयीजनाचें कूजन(२२);क्षणभर हृदयसुंदरीबरोबर मांडलेली विरोधभक्ति

(२०);किंचित्कालहि विरह सहन न होण्याची अवस्था(१०);प्रेमपूर्ण पत्नीचें कोड न पुरवितां आल्यामुळें वाटणारा विषाद(१२);प्रेमवस्तूच्या सहवासाभावी जीवित्याची भयंकरता (९); प्रेमवस्तु लोपल्यावर होणारी जीवाची दुःखद स्थिति (४८); या एकाच प्रेमाच्या विविध बाजू कवि मांडीत नाहीं असें कोण म्हणेल ?

विषयप्रस्ताव, भाषासौष्ठव आणि अर्थगौरव या तीनहि कसोट्यांच्या दिव्याला उतरून भास्कररावांचीं सुमनें करुणरस पुष्ट करितात. पोरकें पोर, आईला बोलविण्यासाठीं बापास विनविणारीं बाळें, विधुराचा विलाप, विधवेचें स्वप्न, मुलाच्या विवाहकालची विधुराची विलक्षण स्थिति, कुढून जीविताचा चोळामोळा करणारी पापभीरू विधवा बाला, दुष्काळांत मरणारीं माणसें, अज्ञानानें वंचिलेला जीव हे सर्व विषय कोणाहि सहृदय मनुष्याच्या मनांत करुणेचा पाझर फोडतील असे आहेत. हा करुणरस उत्पन्न करण्याचे भास्कररावांचें बेमालूम हत्यार म्हणजे विरोध होय. आनंदाच्या सागरांत तरंगवतां तरंगवतां कटु कालाच्या विचित्र वाऱ्यानें रसिकाची हृदयनौका हेलकावून बुडविण्याची कला भास्करराव विरोधानेंच साधतात. हीं सुमनें वाचीत असतांना वाचकास शब्द असे खेंचित नेत असतात कीं काव्य संपतांच जगांतील सुख 'कीं काय तें स्वप्नचि सर्व होतें' असें वाचकास वाटावयास लागून या सुखदुःखमिश्रित जगाची जाणीव जागी होते; वाचक डोळे उघडतो व या विपरीत गोष्टी कां घडतात, हें कोण घडवतें, त्या घडवणाराचा हेतु तरी काय वगैरे कूटें भुताप्रमाणें त्याच्या मनापुढें नाचूं लागतात !

जगांतील अनिवार्य विषमता सर्वांसच दुःखद होते. विधवा, काल-मुखीं गेलेल्या स्त्रिया, त्यांची पोरकीं झालेलीं मुलें, सृष्टींत आढळणाऱ्या शांतीशीं विसदृश असा मानवजातींतील कलह, मनुष्याचें अज्ञान, बुद्धीची विशिष्ट मर्यादा या सर्व गोष्टींबद्दल कोणाला दुःख वाटत नाहीं ? सर्वांस वाटतेंच. त्याप्रमाणें भास्कररावांसहि तें दुःख टोंचतें यांत शंका नाहीं. पण बापांनीं निजमांसास बाजारांत विकण्यास जावें, निरपराध अबलांना 'कां रे जासी मज त्यजुनी' म्हणण्याचा प्रसंग यावा, राज वाड्यांत कुवासनांचा धिंगाणा चालावा, लोकमान्य देशभक्ताची निंदा

करण्याचा प्रसंग टीचभर खांच भरण्यासाठीं लोकांवर यावा व नागविलें जाऊन ' राहूं दे न अन्नहि खाया ' अशी त्या लाघवी मायेनें स्थिति आणावी याबद्दल त्यांना फारच खेद होतो. या कविता म्हणून दाखवीत असतांना त्यांच्या डोळ्यांतून सारख्या अश्रुधारा चालतांना मी पाहिल्या आहेत. म्हणून वरील सर्व बावी त्यांच्या अंतःकरणास पीळ पाडतात व म्हणूनच त्यांनीं त्या लिहिल्या आहेत असें मला तरी वाटतें. विधवेचें दुःख वर्णन करणाऱ्या पांच चार तरी चांगल्या अशा आधुनिक कवींच्या मीं कविता वाचल्या आहेत. पण त्यांपैकीं एकासहि आत्मयज्ञाची बरोबरी करितां येणार नाहीं. मला तर करुणरसाची परमावधि या कवितेंत झाली आहे असें वाटतें. हें म्हणणें विचारांतींच वाचकांस पटेल. आंग्ल टीकाकार स्टॉपफर्ड ब्रुकच्या म्हणण्याप्रमाणें शब्दयोजनेपेक्षां अपूर्व कल्पनेची महती जास्त आहे. या आत्मयज्ञ कवितेंतील छंद साधा, भाषा सोपी, गोष्टी नकाराच्या पण यांतील ध्वनि किती अद्भुत आहे ! अधार कोठडींत हवेच्याहि अभावीं गुदमरून जाणाऱ्या जीवाप्रमाणें पापाच्या कल्पनेचें आभासिक वातावरण उत्पन्न करुन, ही पोर कुढून कुढून झुरते व लोकवश होते ! ! या कवितेंत तर चातुर्याची सीमा आहे असें वाटतें.

वरील विवेचनावरून भास्करराव हे निराशावादी आहेत असा मात्र कोणी ग्रह करून घेऊं नये. जग हा कांहीं त्यांना तुरुंग वाटत नाहीं तर ती शाळा आहे. प्रत्येक व्यक्तीनें आपल्यावर असलेली जबाबदारी ओळखून ती तर पाळलीच पाहिजे परंतु तो भार पुरुषास एकट्याला सोसणें शक्य नाहीं, तो अनिवार आहे. सहवासाशिवाय या जगांतिल जिणें भयंकर आहे; पतिपत्नींनीं, सुनासुतांनीं आनंदानें रहावें. प्रेमसाम्राज्यांत राष्ट्रांतील मुलामुलींनीं स्वाभिमानानें व स्वातंत्र्यानें वागावें. श्रमानंतर त्यांना व्यवहारास लागणाऱ्या गोष्टींची कमतरता पडूं नये. मात्र केवळ या जगांतील विचारांवरच जीवांनीं सर्व भिस्त ठेवलेली नसावी निवृत्तीच्या अद्भुत ठेव्याचें, भक्तीच्या जिव्हाळयाचें व परमेश्वरावरील श्रद्धेचें त्यांना विस्मरण नसावें, एवढीच त्यांची इच्छा आहे. तेव्हां आधीं नेटका प्रपंच करून परमार्थाचें ध्येय न विसरतां सदाचरणानें वागून उत्तम स्थिति मिळवावी हा त्यांचा हेतु आशावादाचाच द्योतक आहे.

'वाचे बरवें कवित्व । कवित्वीं असावें रसिकत्व । रसिकत्वीं परतत्व । स्पर्श जैसा' या ज्ञानेश्वरांच्या उक्तीप्रमाणें काव्य नेहमीं परतत्वस्पर्शी असावें असें मानणाऱ्या लोकांनाहि हीं सुमनें वाचून आनंद होईल. 'आलें तुझ्या रे दारीं नृपा' 'मानसहंस' 'प्रभु तुज कवणेंपरि ध्याऊं' वगैरे कविता कित्येक अस्सल वारकऱ्यांनाहि आवडूं लागल्या आहेत. त्यांतला करुणरस हि असाच हृदयस्पर्शी असल्यामुळें त्या परतत्वाच्या साक्षात्कारा-भावीं झुरणाऱ्यांनाहि तीं काव्यें अतिशय सुंदर वाटतात.

'दुंदुभी दुमदुमे भारी' मध्यें वीररस आहे. पण एकंदरींत भास्कर-रावांचा कल सामान्य जनांकडेच विशेष आहे. राजेरजवाड्यांच्या आचार-विचारांबद्दल त्यांना फारसा आदर नसल्यामुळें ते विषय कवितेंत त्यांनीं घेतलेले नाहींत. गरीबांचे हाल, त्यांच्या अडचणी, त्यांवर कोसळणारे प्रसंग हेच लोकांपुढें मांडून एकमेकांबद्दल सहानुभूति, प्रेम, दया हीं प्रत्येक व्यक्तींत वाढावीं व यानें महाराष्ट्र काय पण आपला सर्व देश एक-जीव व्हावा असें त्यांना वाटतें. आधुनिक कवितांत फारच थोडा विनोद आपणांस आढळतो. परंतु 'गारुडी' राजकन्या व दासी', 'आतां गडि फू दादाशीं, वगैरेंतून सुंदर विनोद साधून हास्यरसहि चांगलाच साधला आहे आत्मयज्ञाच्या मोठ्या कवितेंत शांत रस असून ईश्वराबद्दलच्या सर्व सुमनांतून भक्तिरसाचा पूर्ण परिपोष झालेला आहे.

('या सुमनांत वीररस फार थोड्या प्रमाणांत असल्यामुळें ओज हा गुण या काव्यांत आढळत नाहीं. परंतु प्रसाद व माधुर्य या शब्दांच्या अर्थांची वास्तविक व्याप्ति लक्षांत घेतां हे गुण कोणत्या आधुनिक कवींत जास्त आहेत हें पाहूं गेल्यास भास्कररावांचा दर्जा बराच वरचा लागेल) याबद्दल मला संदेह वाटत नाहीं.

काव्य व गान या दोन कलांचा अतिशय निकट संबंध आहे. नुसत्या अक्षरगणवृत्तांतील भावनांपेक्षां मात्रागणवृत्तांतील भावना ज्यास्त उत्कटरीतीनें वठतात, हें अभंग, पदें यांवरून मराठी वाचकांस तरी मान्य असेल. या मात्रावृत्तांना सुस्वर चालींची जोड मिळाली असतां तीं अतिशय गोड वाटतात. तांब्यांची संस्कृत वृत्तांतील जुन्या धर्तीची कविता वगळली असतां बाकी सर्व गळ्यावर म्हणण्याजोगी आहे. निदान या

सुमनांचें स्वारस्य हीं सुमनें मोठ्यानें म्हणून जितकें लक्षांत येईल तितकें मनाशींच वाचून खात्रीनें होणार नाहीं. अक्षरगणवृत्तांतील कविता गाऊन वाचण्याची इतकी जरूरी नसते. परंतु या कवनांना त्याची फारच आवश्यकता आहे. ठोमरे, मोगरे, विनायक, केशवसुत यांच्या कवितांचें मर्म उकलावयास गायनाच्या जोडाची उणीव पडेल अशा कविता फारशी नाहीं. परंतु तांब्याच्या कवितेचें स्वारस्य कळण्यास हें गायन आवश्यक आहे असें माझें मत झालें आहे.

जुन्या वृत्तांत भास्कररावांनीं कांहीं सुमनें गुंफलीं आहेत हें खरें. पण केशवसुतांनीं नवीन चालींची तुतारी फुंकल्याबरोबर त्या संप्रदायाला पुष्टी देण्याचें काम उत्कृष्ट रीतीनें केलें आहे. गेली ज्योति विझोनियां, ही चतुर्दशपदी उज्जेन कॉलेजचे प्रो. पाटणकर, भास्कररावांस पुनः पुन्हां म्हणावयास लावीत. याचें कारण प्रो. पाटणकर असें सांगत कीं, त्या कवितेचें सर्वांगसौंदर्य एकदम माझ्या ध्यानीं येत नाहीं. विचार नवीन त्यांची मांडणी नवीन, छंदही नवीन. चांगला संप्रदाय तर त्यांना आवडलाच पण या आधुनिक मराठी कविताबाळीला वयपरत्वें शोभणारे नवीन धर्तीचे पोषाख जुन्यांत किंचित् फरक करून त्यांनीं तयार केले शिक्षक या नात्यानें भास्कररावांस काम करावें लागल्यामुळें मुलांना कोणते विषय झेंपतात हें त्यांना चांगलेंच अवगत झालें आहे. ते विषय कोणत्या चालींत घातले असतां त्यांना ते आवडतील हे त्यांनीं बरोबर ओळखून 'आतां गडिफू दादाशीं' 'चिवचिव चिमणी' 'वारा' वगैरे कविता लिहिल्या आहेत. पोवाड्याचें अनुकरण पुष्कळांनीं केलें आहे. पण पोवाड्यांतील आत्म्यास व शरीरास लागणारा धांवता अर्थ व त्यांची मांडणी इतकी उत्कृष्ट कोणत्याहि मराठी आधुनिक कवीच्या पोवाड्यात झालेली मला तरी माहित नाहीं. 'बिजली जाशि चमके स्वारी' च या सर्व कवितेचा झोंकनोक बिजलीसारखाच मनोहर आहे. वरील सर्व विवेचना करून विषयास अनुकूल वृत्तरचनेकडे कवीनें लक्ष दिलें पाहिजे हें तत्त्व भास्कररावांना मान्य आहे एवढेंच दिसत नसून त्याची सुंदर अंमलबजावणीहि त्यांनीं करून दाखविली आहे.

त्रुटित काव्यें लिहिण्याची पद्धत आपल्याला गेल्या पन्नास

पाउणशें वर्षांतच ज्यास्त कळली. हृदयाच्या उमाळ्याबरोबर भावनांचा पूर वाहविण्याचें त्रुटित स्वरूप जरी आपल्याला अभंगांत पहावयास सांपडतें तरी विषयाची विविधता तिथें सांपडत नसून फार तर एका ईश्वरभक्तीचीं निरनिराळीं रूपें पहावयास मिळत. भास्कररावांनीं एका इंग्रजी कवनाचें रूपांतर केलें आहे. व वंगकवयित्री तोरु दत्तच्याहि दोन कवनांचें भाषांतर केलें आहे. भास्कररावाच्या भाषांतर व रूपांतर शब्दांच्या कल्पना काव्याच्या आत्म्याकडे लक्ष दिल्यामुळें कशा व्यापक आहेत हें मार्मिक वाचकांच्या ध्यानांत येईल.

थोड्या वेळांतच या सुमनांचा गंध चोंहोंकडे पसरेल. त्यांतील विचार लोकांना पटतील, आवडतील व ते कांहीं काळानें साहजिकच गुणगुणूंहि लागतील, असा मला तरी विश्वास वाटतो. याचें कारण आज महाराष्ट्रापुढें असलेले प्रवृत्तींतील डावच भास्कररावांनीं आपल्या सुमनांत गुंफिले आहेत हें होय. भास्कररावांनीं राजांच्या अर्थशून्य स्तुति, हृदयशारदेचे ताबुदासारखे पोकळ प्रेमपाठ, निर्जीव तत्वज्ञानाची भावनात्मक नामांनीं मांडणी, लाथेसरशीं स्वर्गाची जगांत व जगाची स्वर्गांत मिसळ, नकाशांत हिमालय अथवा सागर पाहून त्यांचीं स्फूर्तिहीन वर्णनें केलीं असतीं तर त्यांच्याहि काव्याकडे महाराष्ट्रांतील रसिकांनीं दुर्लक्ष करूनच बोळवण केली असती. अस्तु; रसिकांच्या हवालीं हा सुमनसंग्रह करून कुरकुरूं तर नकाच पण वागवा हृदयीं हीं सुमनें अशी त्यांची प्रार्थना करून हा लांबलेला कविपरिचय संपवितों.

हिंगणें.
१।१०।२०

वा. गो. मायदेव.

श्री ग्रंथ संग्रहालय
नं. ........
ता. ........
ठाणे.

# प्रस्तावना.

लहानपणीं लग्न झालें म्हणजे सासरीं जातांना मुलीला अवघड वाटावें, ' आपलें घर सोडून कोठें परक्या ठिकाणीं आपल्याला पाठवीत आहेत कोणाला ठाऊक ' ! या भावनेनें तिनें व्याकुळ व्हावें आणि रडून आकांत करावा हें साहजिक असतें, आणि तिची समजत करण्याकरितां पाठराखणी म्हणून कोणी तरी माहेरचें माणूस तिजबरोबर देणें हेंही ओघानेंच येतें. परंतु बहुतेक स्वयंवरासारखेंच लग्न करणाऱ्या प्रौढ, समंजस, नवोढा नवरीनेंही पाठराखणीकरितां हटून बसणें कितीसें शोभेल ? तें शोभत नाहीं, इतकेंच नाहीं तर हल्लींच्या शिकलेल्या मुलींना तसें कोणी केलें तर हंसू कोसळल्याविना राहात नाहीं ! खरेंच नाहीं तरी. त्यांचीं तीं जाणतीं झालेलीं एकमेकांचीं एकमेकांकडे जात असतां तिसरें कशाला त्यांचे बरोबर ! आपल्या जन्माच्या पाठीराख्याकडे जात असता सांगातें दुजवी पाठराखणें हवें कशाला ? हें आम्हांला समजतें, पण अजूनही तें सगळ्यांनाच उमजतें असें नाहीं. अजूनही मुलगी प्रथमच सासरीं धाडतांना तिच्या बरोबर कोणी तरी माहेरचें किंवा माहेरच्या वतीनें पाठवावें असें कित्येक आईबापांना वाटतें, त्यांची वेडी माया त्यांना सांगते.

भा. रा. तांब्यांच्या कवितेला प्रस्तावना लिहिण्याचा प्रकार त्यांतलाच आहे, म्हणायला हरकत नाहीं. वस्तुतः तिला प्रस्तावनेची मुळींच जरूर नाहीं. ती आणि तिच्या सासरची मंडळी एकमेकांना आजच पहाताहेत अशांतला भाग नाहीं. ती आतां चांगली जाणती झालेली आहे. कांहीं नाहीं तरी आज पंधरा वीस वर्षें रसिकांना ती ठाऊक आहे. कधीं येथें, कधीं तेथें ती त्यांच्या दृष्टीस पडत आली आहे. तिची चालचलणूक, तिची विद्या, तिचा स्वभाव, तिचें वळण रसिकांना मुद्दाम सांगण्याचें कारण उरलें नाहीं. तिचा स्वभाव किंवा वागणूक यापुढें बदलण्याचा फारसा संभव नाहीं. तेव्हां तिच्या सासरच्या माणसांना तिला संभाळून घेण्याची विनंति करायाची किंवा तिच्या गुणावगुणांचें खुलासे-

वार वर्णन करण्याची जरूर उरली नाहीं. तिलाही सासरीं कसें वागावें, सासर हेंच तुझें घर, तेथेंच तुला जन्म घालवायाचा आहे 'वगैरे उपदेश करण्याची गरज नाहीं. तरी पण माया वेडी आहे. तिच्या वडिलांनीं नाहीं, तरी एका अर्थी तिच्या 'काकांनीं' तिची सासरीं पाठवणी करितांना तिजबरोबर जायाला निदान तिला सासरीं पोंचती करून तिची थोडीशी पाठराखणी करायाला मला सांगितलें आहे. त्यांना आपलें वाटतें; चाल आहे ती सोडूं नये, ती पाळल्यानें नुकसान तरी होणार नाहीं. झाला तर फायदाच होईल. अर्थात् त्यांच्या आग्रहास्तव हें नाजूक व प्रस्तुत ठिकाणीं थोडेंसें अवघडच काम मी करीत आहें. मुलीच्या माहेरच्या मंडळीच्या वेड्या मायेकडे लक्ष देऊन तिच्या सासरचीं माणसें माझ्या लुडबुडाटाचा राग तिच्यावर काढणार नाहींत अशी आशा आहे.

कवि, कविता आणि रसिक यांचा संबंध दाखल्यानें वर दाखविला आहे तसाच कांहीं अंशीं आहे नाहीं का ? आपल्या कवितेसंबंधीं कवीला अपत्यप्रेम असतें. ती दुसऱ्या कोणाला कशीही दिसली—वाटली तरी त्याची त्याला गोडच असते. ती त्याचेपाशीं लाडवाळपणानें खेळत बागडत–हट्ट करीत असते. परंतु मुलीचीच जात ती. ती का नेहमीं बापाच्या घरीं राहायाची आहे ! बापाला तरी ती तशीच घरीं राहिलेली आवडायाची आहे ! मायेचा ओढा आवरून त्याला ती केव्हां तरी रसिकांना सादर करावी लागते. तसें केल्याशिवाय–ती रसिकांना अर्पण केल्याशिवाय त्याला चैन पडत नाहीं. किंबहुना रसिकांनीं तिचा स्वीकार केल्याशिवाय तिच्या जन्माचें सार्थक होणें नाहीं अशीच त्याची समजूत असते. त्यामुळें तो तिला मधून मधून रसिकांच्या नजरेस पाडण्याची व्यवस्था करीत असतो. शेवटीं सर्व जुळलें, देण्या घेण्याची व्यवस्था लागली म्हणजे तो तिचें विधिपूर्वक कन्यादान करितो आणि तिला कायमचें रसिकांचे स्वाधीन करितो व स्वतांस धन्य मानून घेतो. सगळ्यांनाच हें भाग्य लाधत नाहीं. पुष्कळांना तिचें कन्यादान झालेलें पाहण्यापूर्वींच इहलोकींची यात्रा आटपावी लागते, व त्यांची पोर उघडी पडते. आ. रा. तांब्यांचें भाग्य मोठें आहे. त्यांच्या मित्रांनीं त्यांच्या मुलीच्या कन्यादा-

नाची सर्व व्यवस्था केली आहे, आणि आतां ही त्यांची कन्या आनंदानें रसिकांस सादर होत आहे.

हें कन्यादान एका दृष्टीनें महत्त्वाचें आहे. यांत नवयुगाचें आणि गतयुगाचें मिश्रण झालें आहे. तें कन्येच्या गुणस्वाभावादींस अनुरूपच आहे. कारण तांब्यांची कविता जरा निराळ्या परिस्थितींत वाढलेली आहे. तिच्या वडिलांनीं तिला तिच्या आजीच्या सांनिध्यांत राहूं दिलें, तसाच विदेशी पाहुणीच्या संगतींतही तिचा कांहीं काल जाऊं दिला आहे. त्यामुळें तिच्या अंगीं कांहीं जुन्या काळचे गुण आहेत, तर कांहीं नव्या युगाचे ढंग आहेत. तिचे आईचे कांहीं गुण तिच्यामध्यें उतरले असल्यास नवल नाहीं. प्रथम तर तिला पाहून कित्येकांची समजूत झाली कीं ही कांहीं आज कालची—चालू मनूतली व या प्रांतांतली किंवा देशांतली, निदान लौकिक व्यवहाराच्या नेहमींच्या प्रांतांतली मुलगी नाहीं; कोठें तरी एकीकडे, रानांवनांतल्या एकाद्या बंगलींत बाहेरच्या जगापासून अगदीं अलिप्त, पण आपल्या बापाच्या संगतींत वाढलेली, ही मुलगी आहे. तिला देशांत व लोकांत चाललेल्या चळवळींशीं, जागी असलेल्या आचारविचारांशीं कांहीं करायाचें नाहीं; ती आपली स्वतंत्र, आपल्याच नादांत आणि आपल्याच छंदांत गढून गेलेली आहे. परंतु तिची जसजशी अधिक ओळख होत गेली तसतसें तिचें खरें स्वरूप रसिकांना दिसून आलें व तरी—बाह्यतः आपल्याच नादांत गुंग असणारी तांब्यांची कविताही भोंवतालच्या तडाक्यांतून सुटलेली नाहीं अशी त्यांची खात्री झाली. ती जरा दूरच्या पल्ल्यावर रहात असल्यामुळें तो तडाका तिला तितका भोंवला नाहीं इतकेंच. प्लेगाच्या प्राबल्यामुळें घरोघर निघणारा विधवेचा आर्त स्वर तिच्या कानीं पडला आहे आणि तिचें हृदय त्यानें पिळवटलें आहे. गतकालाच्या इतिहासाचें संशोधन होऊं लागल्यामुळें पूर्वींच्या वैभवाची पुसट कल्पना तिलाही आली आहे. तीही त्याची आठवण काढून उसासे, एकादे वेळीं तरी, टाकितांना दिसते. देशाच्या नष्टचर्यानें आंतडीं तुटल्यामुळें ज्या देशभक्तांनीं मातृभूमीचे हाल दूर करण्याचा चंग बांधिला त्यांच्यावर आलेल्या प्रसंगाची वार्ता तिच्यापर्यंत पोंचली आहे व तिलाही त्यांच्याबद्दल अभिमान आणि स्वतांच्या दुर्बळतेचा खेद

वाटल्यावांचून राहिला नाहीं. वरचेवर पडणाऱ्या दुष्काळांची रखरख आणि लोकांची अन्नान्नदशा तिच्याही दृष्टीस पडली आहे व त्या वणव्याचे चटके बसल्याप्रमाणें तिला रडें कोसळत आहे. भोंवतालच्या लोकस्थितीचा पडसाद तांब्यांचे काव्यांतही मधून मधून ऐकूं येतो; तरी तो दुरून आल्यासारखा वाटतो. ते जगाहून भिन्नच आहेत. बहुधा ते आपल्या प्रियेला आळविण्यांत, तिच्या सहवासांत भोगिलेल्या सुखाच्या आठवणी काढण्यांत, तिच्या रागाचें आणि अनुरागाचें अभिन्नत्व निरखण्यांत, तिची समजूत काढण्यांत किंवा तिजशीं समरस होण्यांत गढलेले असतात. कधीं कधीं ते तिला बरोबर घेऊन एखाद्या टेकडीवर किंवा ओढ्याच्या कांठीं जाऊन बसतात, तर कधीं 'संध्या तारक', 'शुक्राची चांदणी' किंवा 'क्षिप्रा चमळा संगम' पाहून त्यांतही आपल्या व आपल्या पत्नीच्या प्रेमाची साक्ष पहात असतात. पत्नीप्रेमाच्या उत्कटतेमुळें आणि अपूर्व प्रत्ययामुळें त्यांचें अंतःकरण स्त्रीहृदयाहून हळुवार झालें आहे. त्यामुळें त्यांच्या प्रेमाला स्त्रीच्या प्रेमाला येणारे सर्व रंग येतात, आणि स्त्रीप्रेमाच्या सर्व रूपविकासांचा त्यांच्या प्रेमालाही अनुभव येतो. परदुःखानें कळवळणाऱ्या व चटकन् डोळ्यांतून पाणी काढणाऱ्या कोमल स्त्रीप्रमाणें तेही दुसऱ्याचे विशेषतः स्त्रीजनांचे, हाल पाहून विव्हल होतात व त्यांची कहाणी सांगूं लागतात. परंतु स्त्रीप्रेमाचें अत्यंत प्रसन्न, अत्यंत पवित्र, अत्यंत मधुर रूप जें वात्सल्य, तें तांब्यांच्या ठिकाणीं विशेष प्रकट झालें आहे. त्यांच्या सर्व काव्यरचनेमध्यें मुलांच्या सहज सुंदर स्वभावासंबंधाचीं काव्यें फार बहारीचीं आहेत असेंही कित्येकांस वाटण्याचा संभव आहे. 'आईकडे न्या' 'चिमणी' 'आतां गडी फू दादाशीं', 'शिशुवंचन', 'आनंद' हीं त्यांचीं काव्यें साधीं आहेत, सरळ आहेत, मुलांच्यासारखीं गोड आहेत. असलींच गाणीं जर त्यांनीं आणखी लिहिलीं असतीं तर महाराष्ट्रकाव्यवाङ्मयांत त्यांच्या कवितेला कदाचित् एक स्वतंत्र जागा मिळाली असती !

आणखी एका दृष्टीनें तांब्यांच्या कवितेचा व त्यांच्या कालाचा संबंध लागण्यासारखा आहे. त्यांच्या कवितेचें सूक्ष्मरीतीनें अवलोकन करणाराला बहुधा असें आढळून येईल कीं; तिला शब्दांची वाण नाहीं, विचारांची

तितकी वाण नाहीं, भावनांच्या रसाचा ओलावा कमी नाहीं, कविसंकेत कविसमय, इत्यादींचा भरणा तिजपाशीं आहे. प्रसंगवैचित्र्यही कामापुरतें आहे. असें असून, कांहीं अपवाद वगळल्यास, त्यांचीं काव्यें आटपशीर, सुसंबद्ध, एका शरीराचीं अंगें जशीं तशीं स्वयंसमन्वित आहेतशीं दिसत नाहींत. त्यांतल्या कल्पना, त्यांतलीं रूपकें, त्यांतले भाव एकमेकांच्या सूत्रानें चालण्यापेक्षां स्वैर वृत्तीनें चालल्यासारखे वाटतात. याचें कारण काय असेल बरें! त्यांच्या वाचनांत आलेले कवि व त्यांना आवडणारे ग्रंथ, त्यांना अवगत असलेल्या भाषा आणि त्यांच्या परिचयाचीं वाङ्मयें, त्यांच्या व्यवसायाचा त्यांच्या स्वभाववृत्तीशीं विसंवाद आणि तज्जन्य परिस्थितीचा संकुचितपणा इत्यादि गोष्टी त्याला कारणीभूत झाल्या असतील. या गोष्टींचा परिणाम त्यांच्या काव्यावर झाला आहे यांत संदेह नको. 'उसासे भरी', 'फोड आला' चे ऐवजीं 'फोड झाला' वगैरे प्रयोग पाहिले म्हणजे त्यासंबंधानें कोणाचीही खात्री पटण्यासारखी आहे. परंतु तेवढ्यानें त्या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर मिळाल्यासारखें होत नाहीं. कदाचित् सध्याच्या कालमाहात्म्याचाच तो गुण असावा. महाराष्ट्राच्या गेल्या वीस वर्षांतल्या लौकिक संसाराचें, व हालचालींचें निरीक्षण करणाराच्या एक गोष्ट लक्षांत येईल. ती ही कीं, महाराष्ट्राच्या चळवळींना, हालचालींना, विचारांविकारांना, चैतन्यव्यापारांना एक केंद्र नाहीं. आगस्ट किंवा नवंबर महिन्यांत रोज रात्रीं शेंकड्यांनीं तुटणाऱ्या आणि खालीं पडणाऱ्या उल्कांप्रमाणें किंवा धूमकेतूंप्रमाणें ते सैरावैरा चालले आहेत. एका शरीराचे ते निरनिराळे पण एकाच सूत्रानें होणारे व्यापार आहेत असें म्हणण्याला आधार नाहीं. सगळ्यांना एकत्र बांधणारें, एकाशीं सगळ्याचें नातें जोडणारें, एकाच सामर्थ्याचे निरनिराळ्या अंगांनीं वाहणारे ते प्रवाह आहेत असें सिद्ध करणारें केंद्रीभूत तत्त्व कांहीं नाहीं. महाराष्ट्राच्या लौकिक आयुष्याची घडी विस्कटलेली आहे. समाज—जिवंत, निरोगी, निकोप समाज हा जिवंत शरीरासारखा असतो. शरीराचीं अंगें इंद्रियें अवयव अनेक खरे. त्यांचे व्यापार, त्यांचे धर्मही अनेक खरे. तरी त्यांचें केंद्र एक असतें. त्यांचे क्षेम चालविणारी आणि त्यांना नाचविणारी शक्ति एक असते. तसेंच समाजाचें किंवा राष्ट्राचें असलें पाहिजे. तरच त्या समा-

जाचा संसार सुसंघटित होतो. तसें महाराष्ट्रांत सध्या दिसत नाहीं. त्याच्या प्रत्येक अंगांत जिवंतपणा आहे. प्रत्येक अवयवांत थोडेंफार सामर्थ्य आहे. परंतु त्याचा उपयोग सर्वात्मकतेनें होण्यास कळसूत्र एक लागतें तें नाहीं. त्यामुळें त्याच्या संसाराला विस्कळितपणा आलेला आहे. महाराष्ट्राची जी अवस्था तीच महाराष्ट्राच्या वाचस्पतींची—कवींची. महाराष्ट्राच्या आजच्या अवस्थेचें हें अंग, मला वाटतें, तांब्यांच्या कवितेंत पर्यायानें प्रतिबिंबित झालें आहे. इंग्रजी, मराठी, संस्कृत, फारसी, उर्दु या सर्व वाङ्मयांतून गोळा केलेल्या कल्पना, निरनिराळ्या प्रसंगांनीं उद्भूत केलेले विचार, निरनिराळ्या देखाव्यांनीं जागृत केलेल्या भावना, त्यांच्यापाशीं आहेत, पण त्या अजून एकजीव झालेल्या नाहींत. त्यांचें मिश्रण आहे, मिलाफ झालेला नाहीं. त्यामुळें त्या छंदांनीं बांधिल्या तरी तरंगत विकळत राहिल्या आहेत असें वाटतें. हा त्यांचा दोष नाहीं. हा कालमाहात्म्याचा पायगुण आहे महाराष्ट्राच्या पोटांत सध्यां अनेक लोक, अनेक धर्म आणि अनेक जाती यांचा समावेश झाला आहे. भाजणीचें मिसळण तयार करतात का नाहीं, तसें हें मिसळण आहे. तें भाजून निघालें पाहिजे. जात्यांत घालून भरडून-दळून निघालें पाहिजे. मग त्याचा एकजीव होईल. मग खुसखुशीत भाजणीचें खुसखुशीत फराळाचें तयार होईल, आणि महाराष्ट्राच्या दिवाळींत महाराष्ट्राच्या मुलांमुलींस त्यांवर ताव मारितां येईल. पण त्याला आजून अवकाश आहे. सारख्या संकटांच्या जात्यांत तें आतां पडलें आहे. सारख्या मनस्तापाची व भौतिक आणि लौकिक तापांची आंच त्याला लागत आहे.

चिन्हें आहेत. या लक्षणांचें कौतुक करावयाचें तें त्यांच्या त्यांच्या गुणास्तव तर खरेंच. परंतु त्याहीपेक्षां त्यांचा एकजीव झाल्यावर पदरांत पडणाऱ्या खुसखुशीत फराळास्तवही तें करावयाचें. कोणाला ठाऊक ती दिवाळी केव्हां येईल तें! आज तिची पूर्वतयारी होत आहे खास.

भा. रा. तांब्यांचे मित्र आणि त्यांच्या कवितेचे काका रा. मायदेव यांनीं परिश्रम घेऊन तांब्यांची कविता वस्त्रालंकारभूषित करून रसिकांस सादर केली याबद्दल त्यांचे आभार मानणें त्यांना पसंत नसलें तरी

अभिनंदन करणें अवश्यक आहे. रा. मायदेवांच्या या प्रयत्नाचें एक विशिष्ट वैशिष्ट्य लक्षांत घेण्यासारखें आहे. रा. तांब्यांची कविता त्यांनीं संकलित केली इतकेंच नव्हे, तर मुद्दाम त्यांची भेट घेऊन प्रत्येक कवितेच्या जन्मकाळाचा इतिहास त्यांनीं टिपून घेतला. तांब्यांच्या तोंडून तीं काव्यें म्हणवून वाचवून घेऊन प्रत्येक काव्याचा भावार्थ खुद्द कवीपासून त्यांनीं काढून घेतला आणि या सर्वांच्या बळावर त्यांनीं तांब्यांच्या काव्यांना टिपणें जोडिलीं. म्हणजे रसिकांना ही सादर करितांना तिला बाह्याभरणांनीं जितकें मंडित करणें त्यांना शक्य होतें तितकें त्यांनीं केलें आहे. त्यामुळें रसिकांना तिच्या गुणांचें चीज करायाला अडचण पडणार नाहीं; किंबहुना तिचे गुण ओळखायालाही सोपें जाईल. हें तांब्यांच्या कवितेचें खरोखर मोठें भाग्य आहे. तिच्या बरोबरीच्या तिच्या मैत्रिणींना या बाबतींत खरोखर तिचा हेवा वाटण्यासारखीच स्थिति आहे. पण या गोष्टी काय आपल्या हातच्या आहेत? तिच्या मैत्रिणींपैकीं बऱ्याच जणी अनाथ पोरक्या झाल्या आहेत. त्यांच्या जन्मदात्यांना कालानें ओढून नेल्यामुळें त्यांचा वाली आतां कोणी उरलेला दिसत नाहीं! अशा त्यांना कोणी हाताशीं धरून नीट संसाराला लाविलें तर तेवढें देखील उपकाराचेंच काम होणार आहे. तेव्हां रा. तांब्यांनां रा. मायदेवांसारखा कवि मित्र लाभल्याबद्दल त्यांचें, त्यांच्या कविता--कन्येला प्रेमळ चुलता मिळाल्याबद्दल तिचें आणि नुसती अष्टपुत्री नेसलेली वधू स्वीकारावी न लागतां नाना वस्त्राभरणांनीं सजविलेल्या लक्ष्मीचा लाभ झाल्याबद्दल रसिकांचें अभिनंदन करून मी रा. मायदेवांची व तांब्यांच्या कवितेची रजा घेतों.

पुणें.
ता. २०।११।१९२०

वासुदेव बळवंत पटवर्धन.

भास्कर रामचंद्र

# तांबे यांची कविता

[ १ ]

## कुस्करूं नका हीं सुमनें !

कुस्करूं नका हीं सुमनें !
जरि वास
नसे तिळ यांस
तरी तुम्हांस
अर्पिलीं सु-मनें !
कुस्करूं नका हीं सुमनें ! १

मधु जरी
नसे तिळभरी
अंतरीं तरी
करीं हीं धरणें !
कुस्करूं नका हीं सुमनें ! २

यां वर्ण
नसे सोवर्ण
जों न हीं शीर्ण
तोंवरी धरणें
कुस्करूं नका हीं सुमनें ! ३

घ्या करीं
क्षणाभीतरीं
वाळतिल तरी
तयांना जपणें !
कुस्करूं नका हीं सुमनें ! ४

हीं वन्य
फुलें मधुशून्य
तुम्हांकारें धन्य
मानतिल सजणें !
कुस्करूं नका हीं सुमनें ! ५

वारे मुलें
तशीं हीं फुलें !
हूड वत्सलें !
लोचनें वघणें !
कुस्करूं नका हीं सुमनें ! ६

अंगुली
कठिण लागली
तरी संपली !
हळुच यां शिवणें !
कुस्करूं नका हीं सुमनें ! ७

हृद्वनीं
फुलें कोठुनी ?
जशीं उपवनीं
विलसती नयनें !
कुस्करूं नका हीं सुमनें ! ८

मालती,
बकुल, जुइ, जाति
हीं जरी हातिं,

हींहि असुं देणें !
कुस्करूं नका हीं सुमनें ! ९

अंजली
धरुनि अर्पिलीं
भक्तिनें दिलीं
म्हणुनि तरि घेणें !
कुस्करूं नका हीं सुमनें ! १०

—रतलाम.

---

[ २ ]

## जगाहून भिन्न !

चाल—(ही कामाची तलवार०)

ज्योत्स्नेनें नभ व्यापिलें, विश्व माखिलें
पयें जणुं सारें—हृदयांत तिमिर या भरे ! १.

नभिं नक्षत्रें तळपती, रत्न-मणि किती
विखुरले दिसती—कोळसे तरंगति चित्तीं ! २.

वर्षतो सुधा शीतला, निवावि भूतला,
चंद्र या समयीं—काळकूट भडके हृदयीं ! ३.

शीत हा पवन संचरे, सुवासें भरे
व्योम हें सारें—निःश्वास ऊन मी वितरें ! ४.

सलिलांत फुले कमलिनी, मृदुल जी जनीं
मनीं परि भरती—ते तरंग कंटक रुतती ! ५.

गुंजारव कुंजांतरीं, भ्रमर हा करी
जगीं मोदानें—भेसुर मी रडतों गाणें ! ६.

प्रियसखीवियोगामुळें—हृदय हो खुळें,
जगाहुनि भिन्न—तें चूर सुखीं, हें खिन्न ! ७.

---

[ ३ ]

## झरा !

-:o:-

( वृत्त—द्रुतविलंबित. )

वन पिता मम, जो नटवी धरा :
मम असे जननी गिरिकंदरा;
जननिच्या शरिरीं बहु नाचतों
खदखदां हंसतों आणि खेळतों ! १.

जलनिधी मम थोर पितामह
सतत त्या सरिता भगिनींसह
त्वरित भेटुं म्हणोनिच धांवतों
तरि वनस्पतिला तटिं पोसतों ! २.

गगनचुंबित हे तरु लागती
मम सुतावलि तीरिं मदीय ती !
पुजुनियां निज कोमल पल्लवें
मजवरी तरुराजि शिरिं लवे ! ३.

हरित घालुनि वस्त्र तटीं स्वतां
प्रणयरूपवती युवती लता
हरित पल्लव शालुस लेउनी
नटुनियां दंव-मौक्तिकभूषणीं ४

विविधवर्णि अलंकृत होउनी
तरुपतीस अतो कवटाळुनी

सु-तनु त्या हंसती सुमनें किती
  मम तटीं रमती पतिशीं अति ! ५.

प्रणय त्यांवरिही मम निश्चितः
  मम जलांतरिं होउनि बिंबित.
जरि विलोल तरी, हृदयीं पहा
  वसति त्या मम संततही अहा ! ६.

कनकगोल रवी उदयाचलीं
  सहज नाशित येइ तमावली;
तरुतुनी कर घालुनि तो वळी
  बहु सुवर्णसुमें उधळी जळीं ! ७.

नवनवंश निकुंजि शिरोनियां,
  श्रुतिमनोहर गान करोनियां,
उठवितो द्विज, वृक्ष-लतादिकां
  म्हणतसे ‘ प्रभुगान करा न कां ? ’ ८.

खळखळाट तयीं मम ऐकुनी
  जळहि निर्मळ हें मम पाहुनी,
पिक, मयूर उडोनहि नाचुन
  करिति रम्य विभुस्तवगायन ! ९.

सळसळां तरती बदकें जिथें
  अचळ हो जळ दर्पणतुल्य तें;
उसळती जळिं चंचळ मासळ्या,
  तृपति त्या बक, धीवर पंक्ति या ! १०.

तरुतुनी नृपनीसम वाहुनी
  चमकतोंहि कुठें कुरणांतुनी !
कृषक लावित या तटिं शेत नो
  मधुनि मी विभवें स्थिर वाहतों ! ११.

जिथजिथें वसतों, मज पाहतां
  प्रमुदिता दिसते वनदेवता !

सुमफलांसह सज्ज सदैव ती ,
सुखविण्यास समा सकलां सती ! १२.

थकुनि, भागुनि पांथ कधीं जरी
दुरुनि येइ तृषातुर या तिरीं
निववि ताहन मी अपुल्या जळें
निववितातहि मूक तरूफळें ! १३.

रविकरें गिरि, कानन तापती
करभयें परि या जळिं कांपती !
रवि कसा मग तापद हो तया ?
पथिक जो कुणि ये मम आश्रया ! १४.

मम तटीं पसरे घन सावलीः
कधि न वास करी कलि या स्थलीं.
झुळझुळू स्वन मंजुळ गाउनी
निजवितों पथिकां मन मोहुनी ! १५

मग कसा तरि होइ न तुष्ट तो ?
स्वसदनीं सुत, पत्निस सांगतो—
' कितिक रम्य असे तरि निर्झर !
अमित धन्य जगांत खरोखर ! ' १६.

कधि कधीं रमणी रमणासह
क्रमिति या तटिं काल सुखावह
कर करांत अशंकधि घालुनी
वसति वंशनिकुंजिं सुखी मनीं ! १७.

नयनिं ते निज जीवित अर्पुनी
प्रणय-कूजनिं मग्न इथें वनीं !
पवन दे सुख शीतल वाहुनी,
सुखवितो पिक मंजुळ गाउनी ! १८.

विरहिणी विरहानलतापिता
कृशतनू बसते तटिं दुःखिता;

म्हणतसे ' सुख देसि जना खरा,
  मजसि दुःखद कां मग निर्झरा ? १९.

नव तटीं रमती तरुशीं लता,
  कधि रमेन तशी पतिशीं अतां ?
नव सुमें फुलती तव या तिरीं
  मदन सायक तीव्र उरीं तरी ! ' २०.

उटज बांधुनियां तटिं तापसी
  सु-तप आचरती सुखि मानसीं
सतत चिंतन ते करिती इथें
  कितिक सेविति ते सुख-शांतितें. २१.

जळ मृगेंद्र तसे मृगही पिती:
  द्विज तसे अतिशूद्र पिती किती !
लघु व थोर असा मुळिं भाव तो
  मम मनांत कधींहि न राहतो ! २२.

किति युगें असती तरि लोटलीं
  नृपकुलें किति मीं तरि पाहिलीं
विकृति जाहलि या जगतीं किती !
  पलटली मनुजा तव ही स्थिति ! २३.

दिवस वा रजनी; सुख-दुःखही:
  जनन-मृत्यु घडो जगिं कांहिंही;
सतत वाहतसे स्फटिकासम,
  खळखळाट न हो स्थिर हा मम ! २४.

मम पिता मज ये जधिं भेटण्या
  बहुत गर्वभरें करि गर्जना !
परि गढूळ वहू जळ पाहुन
  मम तिरस्कृति तें करिती जन ! २५.

---

[ ४ ]

# मार्गप्रतीक्षा !

( वृत्त—कामदा. )

कृष्णवस्त्र हें भयद घेउनी,
अखिल विश्वही त्यांत झांकुनी.
रमणि-संगमा हृदयिं उत्सुक
जाइ अष्टमी-कुमुद-नायक. १.

रजनि पातता सदनिं धांवती
मजविना तयीं पळ न राहती
तरिहि यावया आज यांजला
उशिर कां वरें फार लागला ? २.

कपट साधुनी राजशासनीं
फसविलें कुणी वैर साधुनी ?
यांवरी धरी शस्त्र का अरी ?
काय जाउं मी पाहण्या तरी ? ३.

भुरळ घालुनी यांजला कुणी
छळि समंध का नेउनी वनीं ?
मंत्र घालुनी घोर यांवरी
पशु, पतत्रि का यां कुणी करी ? ४

कालसर्प यां—परि नको नको
अगइ ! कल्पना भयद या नको !
मम विदीर्ण हें होइ काळिज
हुडहुडी भरे भीतिनें मज ! ५.

कडिवरी कडी चढविली किती
बुडविला जळीं मींहि गणपती:

राहुनी उभी दारिं पाहतें
वाट मी जरी भीति वाटते. ६

पाळण्यामधें बाळ सोनुलें
एकटें असें आंत झोंपलें;
त्यास पाहुं कां आंत जाउनी ?
वाट पाहुं कां येथ राहुनी ? ७

दूर ऐकुनी कांहिं चाहुल
वाजतें गमे काय पाउल
म्हणुनि पाहिलें नीट मीं जरी
दिसति ना करूं काय मी तरी ! ८

बाह्य वस्तु या शांत भासती,
चित्त अंतरीं क्षोभलें किती !
अखिल विश्व हें झोंप घे जरी,
चैन या नसे अंतरीं तरी ! ९

धनिक-सुंदरी रम्य मंदिरीं
मंचकावरी मुदित अंतरीं;
कृषक-योषिता काम सारुनी
निजति तान्हुलें जवळ घेउनी. १०

तरुशिरावरी अखिल पक्षिणी
स्वस्थ घोरती फार भागुनी;
धन्य अन्य या पुण्यवंत कीं,
तळमळेंच मी एक पातकी ! ११

विझवुनी दिवा ही नभोऽगणीं
सुप्ति सेविली सर्व सुरगणीं;
तरि दिसेल तो मार्ग केंवि यां ?
गहन या तमीं सदनिं यावया ! १२

फिरफिरुनियां भयद कल्पना
टाळतें तरी जाळिती मना;

काव काव कां करुनि कावळे
भिवविती मला आज ना कळे ! १३

समयिं रात्रिच्या शकुनि-शब्द ते
अशुभ मानिती म्हणुनि मी भिते.
आइ अंबिके ! असति ते जिथें
पाळ त्यां तिथें हेंच विनवितें ! १४

तुजवरी अतां भार टाकितें
तुजविणें अम्हां कोण राखितें !
तूंच धांवसी विनत-पालना !
तुजविना रिघूं शरण मी कुणा ? १५

आण त्यां घरीं तूं सुरक्षित,
पाळ आइ तूं आपलें व्रत;
त्यांस आणण्या तुज असे बळ
वाहि मी तुला चोळि नारळ ! १६

---

[ ५ ]

## रोखुनि मज पाहुं नका !

चाल—( डोळे तुमचे जादुगिरी— )

डोळे हे जुलमी गडे रोखुनि मज पाहुं नका !
जादुगिरी त्यांत पुरी ! येथ उभे राहुं नका !
घालूं मी कशिदा कशि ! होति किती सांगु चुका !
बोंचे सुइ फिरफिरुनी ! वेळ सख्या, जाय फुका !

खळबळ किति होय मनीं !
हंसतिल मज सर्वजणी !

 सं-काव्य०८४०

येतिल त्या संधि बघुनि.
आग उगा लावुं नका !
डोळे हे जुलमी गडे रोखुनि मज पाहुं नका ! ६

—देवास. १८९१ (?)

---

[ ६ ]

## विधवेचें स्वप्न.

( वृत्त—इंद्रवज्रा. )

" सखे अगे ऊठ रवी उदेला
झोंपेत तूं हांससि गे कशाला ?
गे ऊठ. गे ऊठः बहूत होई
गंगेस जाण्यास उशीर बाई !" १

" गेली कुठें ती सरिता, कुठें ती
उद्यान-शोभा, नवचंद्रकांती !
गेले कुठें प्राणचि सौख्यदाते
नेल्याविना हाय ! अगाइ मातें !  २

कीं काय तें स्वप्नचि सर्व होतें
हो स्वप्नचीः मी निजतें पुन्हा तें
पडोः मला तें सुख देइ फारः
वाटे मला जागृति ही असार ! ३

स्वप्नीं नरो ही सहवास कांता !
सदा घडो हीच विनंति आतां
कोठूनियां ही सुख जागृतीं तें
लाभेल दुर्भाग्यवतीस मातें ! ४

भेटा मला मी निजतें पुन्हा या,
कां गे सखे जागवितेस वायां ?
ही नीजतें मी न पुन्हां उठेन;
स्वप्नींच त्या सौख्यभरें असेन !" ५

" गडे भ्रमिष्टासम आज कां गे
तूं बोलसी यापरि नीट सांगें
झोंपेंत कां गे वद हांसलीस ?
झालें असें काय तुझ्या मनास ?" ६

" स्वप्नांत उद्यान नदी विशाला
ज्योत्स्ना सुरम्या, वदतां प्रियाला
तेथें तृषार्थी नयनीं पिऊनी
आनंद होतां हंसलें तयांनीं—" ७

' रहूं नको सांग सखे पुढें तें '
" बोलाविलें खूण करोनि हातें
ही नीजतें मी न पुन्हां उठेन
स्वप्नींच त्या सौख्यभरें असेन " ८

---

[ ७ ]

## ठावा न सुखाचा वारा !

जिवलगे ! सांग मम सारा
दुःखाचा मात्र पसारा !
झुंपलिस सदा संसारा,
ठावा न सुखाचा वारा !
सांखळी, सरी, पाटली
आणुं कोठली ?

तुझ्या शृंगारा !
ठावा न सुखाचा वारा ! १.

कोठला जिवलगे शालु
तुला मी घालुं ?
विसर मणि-हारा !
ठावा न सुखाचा वारा ! २.

पातळ जरी, पैठणी
तुला कोठुनी ?
नसे यां थारा !
ठावा न सुखाचा वारा ! ३.

दिन-रात्र मात्र काळजी !
सदा व्याळि, जी
ओति विषधारा !
ठावा न सुखाचा वारा ! ४.

हृदयाहुनि दुसरें काय
द्यावया ? हाय !
नाहिं अंगारा !
ठावा न सुखाचा वारा ! ५.

—देयास, ( १९०० मार्च.)

---

[ ८ ]

## गुराख्याचें गाणें.

चाल—( भला जन्म हा )

कृष्णावरती वडाखालतीं गाइ वळत बैसतों—
मजेनें गाइ वळत बैसतों ।
स्फटिकापरि निर्मळ हा खळखळ झरा जवळ वाहतो ॥ ध्रु० ॥

पांवा फुंकुनि मंजुळ नादें रान भरुनि टाकितों—
हिरवें रान भरुनि टाकितों !
आनंदानें डोळे भरतां प्रभुजीला प्रार्थितों !

गाईमागें रानोमाळीं शीळ भरत हिंडतों—
कधिंकधीं शीळ भरत हिंडतों !
दऱ्या खोऱ्या गाई ओहळावरी मौज मारितों !

उन्हाची भीती कवणाला ?
पाउस काय करिल तो मजला ?
भीतों कोठें मी थंडीला ?

श्रीमंतापरि गरिबा कोठें वारा तो दुखवितो ?—
गरिबा वारा नच दुखवितो !
देवाजीवरि सदा हवाला टाकुनि मी राहतों !

तृषा लागतां नीर झऱ्याचें ओंजळिनें मी पितों—
निर्मळ ओंजळिनें मी पितों !
क्षुधा लागतां कांदा-भाकर यथेच्छ मी जेवितों !

फिरतां फिरतां करवंदें हीं तोडुनि मी भक्षितों—
रानीं तोडुनि मी भक्षितों !
काठीनें मी कांटे दावुनी बोरें हो तोडितों

धनिका नाट रुप्याचें जरी
पांचही पक्वान्नें त्यावरी
नाहीं गोडि मुखाला परी !

गाईसंगें हिंडुनि रानीं थकुनि सुखें जेवितों—
जाडें भरडें खाउनि धनिकाहूनि अधिक तोपतों !

पुच्छ उभारुनि थवा गाईंचा ज्या वेळीं नाचतो—
मजेनें ज्यावेळीं नाचतो.
मोर मुगुट वन्सीवाल्यापरि मौज उभा पाहतों !
ओहळावरतीं थवा गयांचा पाणी जेव्हां पितो—

निर्मळ पाणी जेव्हां पितो
उभा राहुनी प्रेमें त्यांना शीळ अहा घालितों !
कशाला मंदिल मज भरजरी ?
घोंगडी अवडे काळी शिरीं !
दंड करिं गाइ राखण्या परी !
कुवेरसना घालिति धिंगा तो महाल मी टाकितों—
नृपाचा महाल मी टाकितों !
गाईसंगें हवेंत ताज्या नित्याचि मी राहतों ! ३
क्रोध, काम, मद, मत्सर यांहीं गांव सदा गर्जतो—
भांडणें गांव सदा गर्जतो !
दूर टाकुनी त्यास शांतिनें सुख दिवस लोटितों !
समाधान हा परिस अहा मज रानांतचि लाभतो—
अहा मज रानांतचि लाभतो
दुःखाच्या लोहास लावितां सुख-सोनें बनवितो !
चढल्या पडावयाची भिती
गरिबा अहंकृति काय तो ?
काय करि त्याचें खोटी स्तुती !
परवशतेच्या बिड्या रुप्याच्या पायांत न बांधितों—
मृदुल तरि पायांत न घालितों !
निज हृदयाचा धनी धरणिचें धनित्व अवमानितों ! ४

---

## [ ९ ]

## तुजविण !

चाल—( तूं जरी, मंचकावरी पहुडलिस० )

१

वेणूंत नादसम नित्य, सखे, हृदयांत
प्राणशी विहरसी ! उगम सुखाचा आंत !

आधीं तो जाय फुटोनी-जेधवां,
लोपतो नाद तेथोनी-तेधवां,
शवसमान त्यावांचोनी-तेधवां,
हे त्रास, सखे नेत्रांस, निरस तो वांस.
काय मग त्यांत ?
तुजवीण निरस मी वांस तसा जगतांत !

२

रस जसा भरे जीवसा मधुर कवनांत,
त्यापरी विहरसी सखे सदा हृदयांत !
रस जातां कवनांतून-सुंदरी,
जाल शब्द त्यावांचून-सुंदरी,
सुख काय तयावांचून ? - सुंदरी.
तें जाल, लया जाईल, कोण पाहील ?
शवच अनिलांत !
तुजवीण जाल हा देह सखे जगतांत !

३

ज्यापरी, मधुप सुंदरी ! मधुर कमलांत,
त्यापरी गुंतलें हृदय तुझ्या प्रणयांत
मधुलोलुप झाला लीन-त्या स्थळीं
उन्मत्तचि छळबळहीन-त्या स्थळीं,
स्थळ-काळ तयां राहो न-त्या स्थळीं—
जगताचा स्वामी पूर्ण तया कमळांत !
धुंद मी प्रणयि तव काय बाह्य जगतांत !

---

[ १० ]

# संध्यातारक !

( चाल–दिंडी. )

रवी जातां जातांच मंदिरातें
कोण डोकावुनि नभांतुनि पहातें ?
नभः–सलिलीं कां नील, करीं केली
रती येई ? एकटी कशी आली ? १

काय फुलली नलिनीच वरि सरीं हे ?
काय मधुपाची वाट पाहताहे ?
देवललनामणिहार गळोनीयां
मणी पडला एकला अंगणीं या ? २

रत्नकंदुक कीं काय हा स्मरानें
दिला झोंकुनि गगनांत विहारानें ?
रोवली कां ही भरजरी पताका ?
रजनि अंमल राणिचा सुचवितें का ? ३

अहा संध्यातारका ! द्युलोकीं तूं
वससि, परि तूं भूतलीं सौख्यहेतु:
एकवटला अनुराग तुझ्या ठायीं,
अहा प्रीतिज्योतीच पाजळे ही ! ४

प्रणय-तारक तूं तुला गगन–लोकीं
नयन वळवुनि सोत्कंठ जन विलोकी:
विरहपीडित युवतीस निजपतीसीं
जुळुनि आशीर्वच नित्य लाभतोसी ! ५

आणिसी तूं मधुपास कमलिनींत,
तसा हंसा आणिसी हंसिकांत:

धेनु हंबरडे देत घरा येती
वघुनि वत्सातें मुदित मनीं होती ! ६
कृषक उत्सुक तो वाट तुझी पाही
वघुनि तुजला गगनीं न हर्ष राही;
ठेवुनीयां आउतें तो प्रियेला
श्रांत लंघित पथ येइ भेटण्याला ! ७
विलोकोनी सप्रेम कां वरोनी
बोलसी तूं सकलांस मधुरवाणीः--
“ चला थकलां बहु झटुनि दिवस सारा,
सर्वांसह घ्या विश्रांति सौख्यसारा ! ८
हल, तराजू, लेखणी, अतां ठेवा;
ढोल, मुरली, आणखी वीन सेवा !
त्यजुनि, वटवट गा मधुर मधुर गाणें,
रमुनि रमणीसह झोंप सुखें घेणें ! ” ९
हाय ! जाऊं मी कुठें परी सांग ?
असे माझा कोणता सांग मार्ग ?
असे सुंदरि येथोनि दूर हाय !
मला सदनीं जाउनी लाभ काय ? १०

—इंदूर, (२० मे १९२०).

---

[ ११ ]

## प्रियेस !

[ नं. १२ ते १७, हीं पुढील सहा सुमनें श्रीयुत तांबे यांनीं आपल्या पत्नीच्या सहवासांतील प्रेमळ प्रसंगांना अनुलक्षून लिहिलीं आहेत व तीं सहा, हें ११ वें सुमन लिहून तिलाच समर्पण केलीं आहेत. ]

( वृत्त—शार्दूलविक्रीडित. )

त्वेषानें घनघोर घर्घर रवें गर्जे महासागर !
संदिग्ध ध्वनि दुंदुमे नगर हें टाकी दणाणोनियां;

जाई दूर दिगंतरा पवनिं हा आरूढ होवोनियां,
वेंची हा बळ सर्वही वध कसा फँसाळला हा वर !
याचा हा वरचाच गे ध्वनि, परी. हाले जरी अंतर
दावूं कोंवि शके अगाध हृदयीं जें चाललें याचिया.
नाना या भरल्या कशा तरि, सखे, वेड्या तशा वांकड्या
गेहीं या घुमती सदा जरि, सखे, संदिग्ध या बेसुर !
जाया दूर दिगंतरा बळ न यां, हा भेद आहे परी,
वेंची मी बळ सर्वही, हृदय हें न्हातें द्रवानें किती !
हा सारा वरचाच गे ध्वनि परी हालें जरी अंतरीं,
दावूं प्रेम कसें तुझ्याविषयिं जें संदिग्ध या दाविती,
नाना या परि पावल्या जनन गे. प्रेमा तुझ्याची ! तरी
घे घे अर्पितसें तुलाच म्हणुनी, चारू, प्रिये पार्वती !

—इंदूर, (१९०२).

---

[ १२ ]

( वृत्तः—शार्दूलविक्रीडित. )

कांते ! या जगतां किती मिरविती लावण्यगर्वाप्रती,
कोट्यादी युवती तरी न तव ती लाभे तयांना मितीः
नेत्रां या दिसती न त्या तुजपरी लाजे जरी त्यां रती,
प्रेमांधत्व म्हणोत या जन रुचे अंधत्व ऐसें अती ! १
लोकीं मोहरिती शशी, कमलिनी, रत्नें असें सांगतीः
ओंवाळीन तुझ्यावरोनि सकलां, नाहीं तयांची क्षितीः
त्वत्प्रेमें कमलास ये कमलता, इंदूस इंदुत्व ये,
रत्ना रत्नपणा, तुझेविण असें निःसत्त्व सारें प्रिये ! २
'जादूनें जन वेड लाविति नरां' ऐसें कुणी बोलती
सारे ते चुकती जरी न नयनीं जादू भरे या अती;
कांते ! तूं असशी खरी कमलजा अन्या न मी ओळखीं
सारा सद्गुणसंघ बिंबत तुझ्या आदर्शरूपीं मुखीं. ३

द्यावें आयु मला तुझ्यास्तव करीं ऐसा प्रभूचा स्तव !
त्वद्भिन्ना वसुधा न योग्य बसण्या कीं उग्र हा विस्तव !
कांते ! तूं अधिदेवताचि गमसी रम्याकृतींची मला
दृष्टिक्षेपिं यदीय काव्यरस हा प्रत्येकिं ओथंबला ! ४

दिव्ये काव्यमयी प्रिये ! सुहृदये ! मज्जीवितेश्वरी !
मच्चिंता-श्रम-खेदनाशिनि ! सखे ! मत्सौख्यतेजःसरी !
ती सप्रेम विलोकितां, वदत हें कांता उरीं लाविली.
त्याचें तत्त्व कळे तुलाच सख्या ! ज्या सुप्रिया लाभली ! ५

—इंदूर, (१२ मे १९०२).

---

[ १२ ]

( वृत्तः—शार्दूलविक्रीडित )

चंद्रानें गगना पयोधवलशा वाटे रसें व्यापिलें;
कांतेनें पहिल्या रसेंचि हृदया या टाकिलें व्यापुनी;
नक्षत्रें गगनीं वरी तळपती रत्नें-जुईचीं फुलें—
तेजःपुंज विचार शीतल, मृदू या द्योतती मन्मनीं ! १

ऐशा रम्यमयी प्रमोदसमयीं सौधावरी, मंचकीं
बाहू घालुनि बाहुमाजि बसलों दोघें अम्ही एकदां;
नेत्रीं प्रेममयीं विलोकुनि बहू आलिंगुनी तें सखी,
बोलें मी ' प्रियवल्लभे ! हृदय तूं, तूं जीव, तूं संपदा ! ' २

माळा घालुनि बाहुची मम गळां बोले तदा अंगनाः—
' नाथा प्रीति सदा अशीच असुं द्या दासीवरी नम्र या
आहे ही इतुकी विनंति, दुसरी कांहीं नसे याचनाः
शालू प्रीतिच, शाल ती, कनक ती, रत्नें हिरे ती, प्रिया ! ३

आम्हां स्त्रीस पतीच दैवत खरें सर्वस्व तें आमुचें !
  नाथा ! जाइल काळ हा निघुनियां: जाईल हें यौवन:
घाली मोह तुम्हांस सांप्रत असें कांहीं न राहील जें,
  चंद्राला क्षय लागणार समजा आतां उद्यांपासुन ! ४

कांता ! वृत्ति नसो म्हणोनि तुमची सौख्य-क्षण-प्रेरित:
  जावो ती विलया न जाइल जसा वेगें सख्या हा क्षण !

नेत्रीं प्रेमळ अश्रु पाहुनि सखी एकाकि मी चुंबित:
  लावीं घट्ट उरीं: वदे न: मुख हें मद्भाव सांगे पण ! ५

नक्षत्रें गगनीं जधीं तळपती, ये दिव्य तारापती,
  तेव्हां मत्स्मृतिदेवता प्रकटवी आजूनिही तो क्षण—
ती रम्या रजनी—पयोधवल तें आकाश—ती सौध—ती
  प्रीतिज्योति सखी-विलोलनयनीं तें वारि-तें चुंबन ! ६

—इंदूर, (१५ मे १९०२).

१८७.२

[ १४ ]

( वृत्तः—स्रग्धरा. )

पोताळांतूनि येतां धरधर गगनीं सिंधुमार्गीं जहाज,
  पाही कांता वियुक्ता धवलतर अती शीड, आशा मनाची
जागे, कीं. कांत आतां खचित मजसि दे गाढ आश्लेष आज:
  आशा येतां निराशी, मम मनिं चमके तेंवि त्वत्संगमाची! १

साहारीं चंडतर्मीं अविरतचि सदा हिंडतां खिन्न गात्रीं.
  श्रांता पांथा तृषार्ता झुळुझुळु रव तो मोहवी निर्झराचा
तैसा त्वन्नूपुराचा श्रुतिमधुर अती शब्दही मध्यरात्रीं
  ओढी मच्चित्त मार्गे श्रवणगत करी इंद्रियें पंच साचा ! २

प्राची येतां उष:श्री पळपळ उमले पद्मिनीतुल्य रम्या
  रागें व्यापोनि टाकी कनकसम नभा श्रीस नाहीं तुला ती!

कांते ! त्वन्मूर्ति येतां अनुपम शयनागार लागे खुलोंया
जों अंतर्बाह्य सारें कनकमधुर हो फुंकुनी दिव्य कांती ! २
—इंदूर, ( २६ मे १९०२ ).

---

[ १५ ]

( वृत्तः—शार्दूलविक्रीडित. )

नाहीं ज्या सुमनीं मधू, न फिरत्या घे भृंग गुंगोनियां,
सौंदर्यातिशयें खुलो, परिमळें व्यापूनि टाको वनः
नाहीं प्रीति अशा सुरम्य नयनीं गुंते न माझें मन.
सौंदर्यातिशयें खुलो, जन भुलो त्यालागिं पाहोनियां !
जीं नेत्रें प्रणयाश्रुपूरित तिथें मच्चित्त पावे लयाः
नेत्रांची अनुरक्तता झकमके अश्रूंतुनी लाडकें
प्रातःस्नान दवें मनोहर अशा पुष्पामधें कौतुकें
गुंतोनी रसिकाग्रणी मधु पितो तो भृंग गुंगोनियां !
नाना वर्णिं विचित्र पुष्प नटलें गर्वें अफूचें जरीः
' मोहीं घालिन भृंग ' हें चघळतें मांडे मनाचे किनीः
जाणे तो भरलें जलाल गरलें कीं पुष्प हें अंतरीं
पाही ढुंकुनियां कधीं तरि नया कीं काय तो सन्मती ?
' कां मी आवडतें ' म्हणोनि पुससी कां गे मला सुंदरी !
सांगावें तुज काय तूं जिवलगे, विद्यावती जाणती !
—इंदूर, ( ३१ जुलै १९०२ ).

---

[ १६ ]

( वृत्तः—शार्दूलविक्रीडित. )

" झाले जे कवि वंद्य त्यां जन गणां, ते मूढ कीं वाटती
मूढां सत्य न यां असत्य रमवीः आराध्य या कल्पना !

नाहीं यां शिर ! काय तें हृदयची सर्वस्व ऐशा जनां !
प्रेमाच्या महिमा फुका फुगवुनी भारूड हे सांगती !
प्रेमा कल्पुनि भूप सेवक दुजा वृत्ती असें जल्पती
प्रीतिप्रेरित सागरीं नर उडी टाकी, भया लेखिना !
मारी इंद्रपदास लाथ ! विष पी ! सेवी महाकानना !
" हे कवि जल्पती ! अमर हे होती ! कशी ही कृती ! "
तत्त्वज्ञानमदें असे बरळती त्यांना असो ही नती !
नाहीं त्यां शिवला उदार नृप तो ये कींव त्यांची खरी
कोठें सागर, शैल, कानन, सखे, जे तूझिया संमतीं
देती ना सुख या जना ? विष सुधा तूझेविना सुंदरी !
ज्या तूझे नयनांत तो नृप उभा ह्यचित्र दावी सती
त्यांना पाहुनि काय हो हृदयिं या सांगूं कसें तें तरी !

—देवास, (६ फेब्रुवारी १९०३).

---

[ १७ ]

( वृत्तः—शार्दूलविक्रीडित. )

जेव्हां हो अति तीव्र शीत, सरिता होतें हिमाच्छन्न ती !
भासे घोर शिळाच का पसरुनी गेली नळापासुन !
वाहे निर्मळ त्या हिमांतरि परी गंभीर तें जीवनः
यत्नें तो थर भेदितां वर निघे वेगें फवारा अती !
मद्दोषें घन मौन सेविसि सखे जें माझिये संगतीं
होसी निश्चळ त्या हिमापरि परी ठावें तुझें गे मन !
जाणें मी प्रणयें अगाध भरलें कांते ! असें आंतुनः
त्यायोगें विनवीं परोपरि तुला मानी जरी मी अती !
लावीं दोष सखे स्वतांसचि तुला पाहूनि मी निश्चलः
पीतां मी अपुलेंचि रक्त मुख हें होई अती पांडुर,
तेव्हां तो वरचा कठोर थर गे तें भेदितां आंतिल
प्रेमाब्धी बहु कालवे नयनिं ये वेगें फवारा वर !

कांते ! लोचन हे तुझे रमविती नानारिती निर्मल,
जेव्हां अश्रुंतुनी सखे ! झळकतां सर्वांत चेतोहर !

—देवास, (७ फेब्रुवारी १९०३).

---

[ १८ ]

## घटोत्कच-माया !

—:o:—

( चालः—" सगुण गुण माया० " )

घटोत्कचमाया पसरली हिंद-देशीं या ॥ ध्रु० ॥

" जुनें जुनें तें सर्वहि द्या द्या !
नवें नवें तें पाहुनि घ्या घ्या !
आलें दुरुनी चालुनी वुद्धया
तुम्हां सुखवाया ! निरभिलाष झिजवी काया ! १

जुनें जुनें तें सर्वहि द्या द्या !
द्या द्या कुजक्या गिर्द्या गाद्या !
काढा कचरा साऱ्या चिंध्या, !
कागद घ्याया-तुळतुळित साफ पाहुनियां ! २

हाडें आणि कातडिं द्या द्या !
चाकू, वटन, फण्या हीं घ्या घ्या !
जिनें, पाकिटें बूटहि वाद्या !
किती सुंदर या-झकझकीत वस्तू साऱ्या ! ३

कापुस, लोंकर यांचे भारे
काढा देशांतुनियां सारे !
द्या, द्या, आणा हे पोतेरें,
तनू सजवाया-शेले, अणि शालू, घ्याया ! ४

वस्त्रें देशी जाडींभरडीं
जैसी बुरुडाघरची परडी !
रुतती कांट्यापरि अति हाडीं !
शिणवितां वांया-कां कोमल सुंदर काया ? ५

काठीला बांधोनी सोनें
काशीहुनि रामेश्वरिं जाणें !
शस्त्रें भार ! शिरीं कां घेणें ?
कांहो वांया धडपडतां तनु झिजवाया ?" ६

मंत्र या सारखा पेरोनी,
नजरबंदिची करुनी करणी
गारुडिणी ही वेड लावुनी
नागवि साऱ्यां-राहुं दे न अन्नहि खाया ! ७

घाली ऐसें मोहिनिअस्त्र !
घोरूं दिवसा अह्मि सर्वत्र !
जाणुनि उमजुनि निजतों ! चित्र
काय याहुनियां-? ये कोण जागृती याया ? ८

आलस्यीं अह्मि झालों चूर !
चढला डोळ्यांवरतीं धूर !
माजे देशभरी काहूर !
नेत्र फिरवुनियां-कोणासी सवड पहाया ? ९

ऐसी वेतालिनिची स्वारी
थयथयाट माजविते भारी !
सह अक्काबाईची फेरी:
विकट करि हास्या,-निज अस्त्र विजयि पाहुनियां ! १०

लाभ कोणता येथें रडुनी ?
कोण ऐकती कान देउनी ?
वाग्देवी गे बसलिस रुसुनी

कोणत्या ठायां?–ये धांवुनि स्वगृहीं समया!
घटोत्कचमाया पसरली हिंद–देशीं या! १२

—इंदूर, (२४ मे १९०२).

---

[ १५ ]

# कां रे जासी मज त्यजुनी!

( एका गृहस्थास आपल्या पत्नीच्या पावित्र्याबद्दल संशय येऊन तो तिला अकस्मात् कारण न कळवितां टाकून जाण्यास तयार झाला आहे. )

( रागः—पिलू. )

कां रे जासी मज त्यजुनी? ॥ ध्रु० ॥

तुजसाठीं मीं
जनका त्यजिलें,
त्यजिली माझी प्रिय जननी
कां रे जासी मज त्यजुनी? १

तुजसाठीं मी
स्वसुखा भुललें,
जपलें तुजला दिनरजनीं
कां रे जासी मज त्यजुनी? २

विश्वासानें
हृदय दिलें हें;
कैसी करिसी ही करणी?
कां रे जासी मज त्यजुनी? ३

वैभव–कालीं
जमलिं पांखरं

स्थिर मी; गेलीं तीं उडुनी !
कां रे जासी मज त्यजुनी ? ४

तव सुखदुःखीं
स्थिर जी अबला
त्या मज टाकिसि कां म्हणुनी ?
कां रे जासी मज त्यजुनी ? ५

धरिली तुझी
कांस सख्या मीं,
तन मन अर्पियलें चरणीं
कां रे जासी मज त्यजुनी ? ६

अपराधहि तरि
काय असा मम ?
लोटिसि मजला तमिं गहनीं !
कां रे जासी मज त्यजुनी ? ७

प्रथम पेरिली
साखर कैसी !
हा ! हा ! फसलें तव वचनीं
कां रे जासी मज त्यजुनी ? ८

कठिण कसें हें
हृदय तुझें रे
नाहीं माया काय मनीं ?
कां रे जासी मज त्यजुनी ? ९

निश्चल गिरिसम
कोंवि उभा तूं ?
जाती माझे असु निघुनी !
कां रे जासी मज त्यजुनी ? १०

प्राणसख्या ! कां
फिरविसि डोळे ?

ओढिति असु ने कुडिमधुनी
कां रे जासी मज त्यजुनी ? ११

फोडुनि पाहीं
हृदय अर्धी हें
भरलें प्रेम किति अजुनी !
कां रे जासी मज त्यजुनी ? १२

आंत, पाज विष,
भीसि कशाला ?
याहुनि वधणें काय जनीं ?
कां रे जाशी मज त्यजुनी ? १३

तुजवांचुनि मी
कवि जगुं जगीं ?
बुडविन दुःखा मी मरणीं !
कां रे जाशी मज त्यजुनी ? १४

—इंदूर, (१७ जुलै १९०२).

---

[ ३० ]

## सुंदरीस !

( रागः — भैरवी. )

हृदय सांग चोरिलें कशास ? सुंदरी !
दे दे ! न देसी तरी दे तुझें तरी ! ॥ ध्रु० ॥

नयनिं धूळ घातली,
गुंतवोनि कुंतलीं !
दडविलें तिथोनिही हळुच कां उरीं ?
दे दे ! न देसी तरी दे तुझें तरी ! १

मदननृपापासुनी
दाद घेइं लावुनी
वसुनि लोचनांत तुझ्या न्याय जो करी
दे दे! न देसी तरी दे तुझें तरी! २

मदन-मंत्रि कुमुदरमण
न्यायवळें कांतिमान
अनलधार ओतवोन मी नया करीं
दे दे! न देसी तरी दे तुझें तरी! ३

वसंत कोतवाल हा
मज्ज गे उभा पहा!
कुसुमबाण मोडवोन मी तुझ्या उरीं
दे दे! न देसी तरी दे तुझें तरी! ४

—इंदूर. (२६ जुलै १९०२).

---

[ २१ ]

## तारुण्यांतील एक प्रसंग!

( चालः—"चंद्रकांत राजाची०" )

मधुमासामधिं बहार येतो मधुमालतिला गे
पुष्पवती ना प्रथम तूं तशी अधिक खुलों लागे!

स्तनाकार या पीनमुखाशीं लाल फळें लवती
आम्र जशीं तूं निधानगर्भा लज्जावति युवती!

नूतनपल्लव रम्या लतिका बहुवर्णी फुलती
नूतनवसना मणिमंडित तूं तेंवि अधिक खुलती!

ताम्र अपांगीं सलिलीं कमलें तुषार ज्यांवरतीं
प्रणयाश्रूंनीं नयनें तव तशि अधिक मना हरती !

गुलाबतरूचीं प्रणयवर्ण हीं लाल फुलें नवीं
अधिकचि खुलती लाल गाल तव रागानें जेवीं !

मदिरा मधुरामोदें मोदें गुंजत कुंजांत
श्वशुरगृहीं जामातसम रमे भ्रमर मरंदांत !

कोकिल, बुलबुल, मयुर हळुहळू मधु गाना वळती
तरुण जनांचे तरंग तैसे स्मरविषया कळती !

स्वैरगती संचरतो मारुत जेंविं अंतराळीं
हेतुशून्यही गुंगत बुलबुल विहरे या काळीं !

अशा प्रसंगीं प्रणयतरंगीं रंगत, गुंगत मी
खुळ्यासम तसा एके दिवशीं फिरतां आरामीं

सरस्तटाकीं टाकीं हिरव्याचार तृणीं अंग
मनोभिरामीं आरामीं जें अनंग प्रबलांग !

भरलें होतें नयनीं हृदयीं रूप कुणाचेंसें
वेड लागलें होतें त्याचें स्वानाला जैसें !

कोकिल गाती, वाटे हृदयीं तीच मूर्ति गाते
उपवनपवन सुटूनी शीतल स्पर्शे अंगातें. !

कुसुमविकासीं तिचेंच भासे विलासहास्यच कीं
प्रफुल्लकमलीं विलोल लोचन तिचेच अवलोकीं !

असो यापरी तन्मय दिसलें उपवन तें मजला
सहज विलोकित बसलों असतां दर्पणसम सलिला:

सलील सलिलीं कमलें उमलति मुकुलित किति दिसती
झुलती, डुलती, खुलति, पंचमीयात्रेंतिल युवती !

असतां यापरि धुंद कशी तैं चमत्कृती घडली
अनुपम, सुंदर अवचित पडलें बिंब सरःसलिलीं !
चकित जाहलों वरी पाहिलें, निशा नसुनि आली,

दिवसा कैसी मूर्ति शशीची बिंबित जलिं झाली !
मागें वळतां दिव्य मूर्ति मज अनुपम बहु दिसली
तुच्छ वाटलें कमल उमललें मृदुल रुचिर सलिलीं !
त्या कमलाहुनि मृदुल गवसतां कमल मला तेथें
भान हरपलें दृढालिंगनीं काय वदों ये तें ?
चित्र कोण तें रेखिल, सुंदर कोण लिही गानें ?
कां गे पण तूं लाल जाहलिस ऐसी रागानें ?
प्रस्फुरिताधरपल्लव, लोचन, लोल तरल कमलें:
क्षुब्ध मारुतें वीचितरल जल तैसें हृदय हले !
पाहुनि हें किति सुंदर स्मरतें तेंच्र जलाशय गे !
भ्रुकुटि कुटिल या कुटिल यापुढें मदनधनू सांगे !

* * * * *

खुळे ! खुळे ! परि विफल तुझी ही मत्सरमति सारी
मूर्ति तूंच जी हृदयीं भरुनी बिंबे कासारीं !
पुरे पुरे, करि स्मरण शांत हो काय न आठवतो
कमलाकर बाळाचा तुजला वाढदिवस वदतो ?
अशिच पहावें तुजला म्हणुनी वदलों संदिग्ध
नेत्रबाण पण सहन न होतां आतां विषदिग्ध !
किती जहाली खोल जखम हें कैसें सांगावें ?
सदय विलोकन आलिंगन हें मलम लाव, धांवें !
कडकडुनी आलिंगुनि चुंबुनि सजल कपोलाला
धन्य असा हा को-पण कुठें लेखनि लिहिण्याला ?

—इंदूर, (२० सप्टेंबर १९०२).

[ २२ ]

# वदन मदनकेलिभुवन !

पद ( रागः-जिल्हा-झिंझोटी )

वदन मदन-केलि-भुवन
हें त्वदीय सुंदरी
नयन रंगभूमि तिथें
नटत तो नटापरी ॥ ध्रु० ॥
पापण्याचि पट नटवर
नर्तनपटु करुनि दुरी
नवरस तो नर्ति तिथें
थक्क तो मला करी ! १
विविध तो करी विलास
भूषवोनि त्या करीः
चमकत कधिं चपलेसमः
स्थिर कधीं ध्रुवापरी ! २
हांसे कधिं, कधिं रुसेहि,
स्तब्धता कधीं धरी.
मृदुल किरण सोडि कधीं,
बाण कधिं अम्हांवरी ! ३
कधिं झोंकी तो गुलाल
विनोद यापरी करी,
अमृतधार कधिं वर्षी
अश्रुधार कधिं वरी ! ४
होतां विधि-नभ घनयुत
तिमिर वर्धतां परी
वितरि विमल तेजः कळे
योग्यता तदा खरी ! ५

—इंदूर, (१८ जुलै १९०८).

[ २३ ]

# चिरंजीव कोण ?

( वृत्तः—उपजाति. )

तेची चिरंजीव जगीं जहाले
हाले जयांचे मरणें धरा ही,
राही जयांचें यश शुभ्र येथें
येतें जयांचे स्मरणें दगंवू ; १

झंझानिला वा अशनिप्रपाता
पाताल-भेदीहि नदी-पुरांना;
रानांतल्या वा वडवानला जे
लाजेप्रती लाविति हिंस्र जीवा ! २

ऐशा महाक्रूर नराधमांना
मानार्थि, केव्हां न जुमानुनीयां
मानूनियां केवल देशमाता
माथां तिला वंदुनि मात्र लोकीं ! ३

वेल्हाळ कांता गृहिं सोडुनीयां
तोडूनियां जे घनमोहजाला
ज्याला रुची अन्न असें त्यजोनी
यजोनि तेजा निजदेशकार्यी ४

उग्रारिसीं झुंजुनि झुंजुनी जे
नीजेस ठेले समरांगणांत !
गणाग्रणीं सेवुनियां ध्वजातें
ज्यांतें अरीही स्तविती मनांत ! ५

ये वास त्यांचा जरि त्या शवांस
शिवा शिवो क्षुद्रहि भक्षणार्थ

क्षणार्ध भीत्यार्त अरी तयांना
यानांस बांधोनि निघो स्वदेशा ! ६

हालाहलप्राय अरी शिरांनां
रानांत फेको स्वपुरा हरो वा
रोवावयालागिं शिरें स्वदुर्गीं
दुर्गावली त्यांस करो खुशाल ! ७

अरीस होवो बघुनी प्रमोद
आमोद त्यांचा तरि सर्वदाही
दाही दिशा व्यापुनियां उरेल
भरेल चित्तीं निजदेशजांच्या ! ८

विभूति त्यांच्या धरणीप्रदीप,
प्रदीपतील स्वसुनीं स्वतेजां
ते ज्यां करीं होति विदेहधारी
धारीं असीच्या चिरण्या अरी ते ! ९

न मानवां केवल ते सजीव
निर्जीव वारी, गिरि, पादपाशीं
पाशीं उभे ते गमती सदैव
सुदैव त्यांच्या जननी–पित्याचें ! १०

ज्यां पूत केलें निज–वारि–पानें
पानें दुरी सारुनियां करांनीं
रानीं झरे ते अति दीनवाणी
वाणी करोनी रडती तयांनां ! ११

तत्पादधूली शिरिं पुष्पमाना
मानावली ज्यां गिरिराज ते ज्यां
स्वजातवारिप्रवलां रवांनीं
वानीत गातील सदैव त्यांच्या ! १२

छायेंत ज्यांच्या बसुनी कदा ते
दाते सुखाचे गमले जयांस
जयांस त्यांच्यासह आसवांनीं
वानीत गातील तरु प्रभातीं ! १३

आश्चर्य तें काय जरी प्रबंधीं
बंदीजनें गाउनियां यशाला
शाला स्वभू केलि गुणां शिकाया
विनाशि काया झिजवावयाच्या ? १४

रणार्क राणा मृत का प्रताप ?
प्रताप तापप्रद यद्रिपूंतें;
पूतें रिपूनें प्रबलें जयाच्या
याश्चा करोनी बहुमान केला ! १५

तो काय वॉशिंग्टन आज मेला ?
मेळा जयांच्या धरणीसुतांचा
त्याचात्र आत्मा जगनाम दावी
सदा चितो ज्योति अजून त्याची ! १६

तेजोबलौदार्यगुणानुपेत
न पेटते ज्योति अजूनि कां ती ?
कांती तयांची तनुजांतरंगीं
तरंगिलेली न दिसे कुणाला ? १७

अशांस ये मृत्युहि मृत्युहीन !
हीनां अम्हां मृत्युच जीवनांत !
वनांत थोडें तृण होय तें का ?
तें काय हाले न डुले न किंवा ? १८

—इंदूर, (सप्टेंबर १९०२).

[ २४ ]

# सत्प्रीतिमार्ग !

( चालः—" घुमव घुमव० " )

कड कड कड कड तडित् कडाडे, जळतें नभ कां तरी !
तद्घातें कडकडोनि पडती तरु मोडुनि भूवरी !
प्रचंड हा घनघोर डुमडुमे ध्वनि व्योमाभीतरीं.
प्रळयकाळ ओढवला वाटे भयाण ही शर्वरी !
कोण असे अंधेरीं झुकली घन ही गगनांतरीं
कोसळतें नभ काय ! पडति जळधारा मुसळापरी !
जिकडे तिकडे जळमय झालें दिसे !
भू, सरिता यांचा भेद न उरला असे !
नच पर्णहि हाले भ्याले तरुगण जसे !
त्वेषानें अति फों फों शब्दें फोंफावति निर्झरी
फूत्कारिति का कुटिल नागिणी जग गिळण्या स्वोदरीं ! १

जेव्हां दडती सिंह, व्याघ्रही भिउनी गिरि-गह्वरीं.
घूक, ससाणे पक्षी दडती पुराण-तरु-कोटरीं;
घोर भयंकर, मध्यरात्रिच्या ऐशा या अवसरीं.
कोण झपाझप पाउल टाकित चाले विपिनांतरीं ?
रेखाग्र न या प्रळयभीतिची छाया वदनावरी,
खांचा, कांटे, सर्प गणींना कोण असावें तरी ?
कां वनदेवी ही निर्भय वनिं संचरे ?
कां चपला मूर्तिच भूवरि या अवतरे ?
कां वृष्टिदेवता निजकृति पाहत फिरे ?
झमकन् चपला चमके. परि वरि घन, भूवरचे गिरी-
दैत्य कसे अंजति दावी—नच मार्ग दावितें परी ! २

जीस उपवनीं फिरतां कुसुमें रुतती कांट्यापरी,
श्वान भुंकतां दूर भयें जो होय घरीं घाबरी;
केवळ नाजुक, भीरु, अबल ती, गृहभूषण–सुंदरी
निजवल्लभ-शोधार्थ चालली भयाण या अवसरीं !
कां चपले ! व्यर्थचि शिणविसि तूं आपणा ?
कां घना ! विफल तूं करिसी रे गर्जना ?
कां भिवबुं पाहतां ऐसे प्रणयीजना ?
रोधूं नका सत्प्रीतिमार्ग, व्हा दूर तुम्ही झडकरीः
काय कळेना तुम्हां जगीं या काय प्रीति न करी ? ३

—इंदूर, ( १० जुलै १९०२).

---

[ २५ ]

## बुलबुलास !

——:o:——

( रागः–पिलू. )

उगिच काय बुलबुला ! शिणविसी गळा ॥ ध्रु० ॥

भरुनि तान कोमला
रिझवितोस कां मला !
दगड रिझव जा तुला
साधना कला ! १

उगिच कंठ फोडिसी
हृदय मात्र फाडिसी !
रमणि-वाणि आणिसी
स्मरणिं मंजुळा ! २

उकलिते इथें कळी
नच गुलाबपाकळी
सांठवील हृत्स्थळीं
गीति कोमला ! ३

मधुर येथली कळी
कधिंच जाण वाळली !
चुकलि दृष्टि का खुळी ?
वघांसि कां मला ? ४

वघासि कंटका मला !
रुतुनि मात्र विह्वला
तनु करीन कोमला !
पळ; न हो खुळा ! ५

प्रीतिच्या सुके झरा
हृदयिं; देइ उत्तरा
कवण ? जा करी त्वरा
उडुनि सुस्थळा ! ६

उपवनीं जिथें किती
नव गुलाब हांसती;
दे झराहि हुंकृती
'झुळुझुळू' तुला ! ७

सदन हें श्मशान; गा !
काष्ठ मी; रहा उगा;
भुलुं नको; न येथ गा;
परत आपुला ! ८

तुझी कट्यार चोंच ती !
हृदयिं तीव्र खोंच ती !
पोंचवी जिथें सती,
झणिं सख्या मला ! ९

—इंदूर, (२० जुलै १९०२).

ग्रंथ संग्रहालय. नं. ता. ठाणे.

[ २६ ]

## सखये या स्थानीं बसावें वाटे दिनरजनीं !

[ ही कविता पचमढी येथील अनुपम सृष्टिशोभा पाहून लिहिलेली आहे . ]

( रागः—पूरियाधनाश्री )

सखये या स्थानीं
बसावें वाटे दिनरजनीं !
पर्ण-कुटी बांधूनि तरुतळीं !
गिरिवरि हरिभजनीं
बसावें वाटे दिनरजनीं ! ॥ ध्रु० ॥
वनदेवींची रम्य भूमि ही
सकल इथें जमुनी
समंत्र गायन करिति, घालिती
फेर चपल चरणीं !
वन-सुमनांची माळ गळां तव
घालिन स्वकरांनीं !
स्नात मुक्तकच पाहुनि तुज त्या
गणितिल निज राणी !
बसावें वाटे दिनरजनीं ! १
कविहृदयांतुनि मंजुळ कवनें
तत्सम गिरिमधुनी
खळखळुनी आवेशें निघती
निर्मळ निर्झरिणी !
देतिल निर्मळ जळ त्या प्याया
मधुर सुधेहुनी !
प्रति घोटीं ते स्मरणिं आणितिल
प्रभुजीची करणी !
बसावें वाटे दिनरजनीं ! २

दाट लागले पहा मनोहर
तरु खोऱ्यांमधुनी !
कंद मुळें आणि फळें अर्पितिल
अशना स्वकरांनीं
पापशून्य तीं मधुर भक्षुनी
वसतां या विपिनीं

निर्मळ, निश्चळ, तृप्त मनानें
लागूं हरिच्चरणीं !
वसावें वाटे दिनरजनीं ! ३

सूर्योदयीं गातील तरुवरी
पक्षि एकवटुनी
उदात्तरस तो भरतिल हृदयीं
येइल जल नयनीं !
मधुर रवें आळवितां हरिला
गिरिशिखरीं वसुनी

दिसशिल तूं भैरवी रागिणी
रमणी रविकिरणीं !
वीणा घेउनि करीं रवें नव
टाकुं दऱ्या भरुनी !

अदृश्यरूपें वनदेवी मग
डुलतिल परिसोनी !
वसावें वाटे दिनरजनीं ! ४

कविकुलगुरु उभयतां प्राच्य अणि
पाश्चात्यहि मिळुनी
वर्षाचें पळ करितिल मंत्रें
गुजगोष्टी कथुनी !

सखे ! अशांची संगति मिळतां
काय उणें विपिनीं ?
नको नको ते मधुमुख विषहृत्
नगरमित्र फिरुनी !
वसावें वाटे दिनरजनीं ! ५

पहा ! पहा ! गंभीर धीर हे
गिरिवर चहुंकडुनी
मूक कसें वक्तृत्व वोपिती
श्राव्य दिव्य कर्णीं !
प्रभुजीचे उपदेष्टे वितरति
ज्ञान इथें वसुनी !
काय भरे त्यापरी श्रुतींचें
दुकान घालोनी ?
वसावें वाटे दिनरजनीं ६

शांत, रम्य या पुण्यभूमिचें
दर्शन लाभोनी
महापातकी पवित्र होउनि
रत हो हरिभजनीं !
नको नको प्रासाद नृपांचे
दूषित रक्तांनीं
कुवासनांचें अकांडतांडव
सदा नगरसदनीं !
वसावें वाटे दिनरजनीं ! ७

—देवास, ( फेब्रुवारी १९०३ ).

[ २७ ]

# बिजली जशि चमके स्वारी !

( चालः—पोवाड्याच्या धर्तीवर )

दुंदुभी दुमदुमे भारी
नभमंडल भरती भेरी !
धूळिनें धुंद दिक् चारी
सेनाहि दिसेना सारी !
रणकंदन माजे भारी !
बिजली जशि चमके स्वारी ॥ ध्रु० ॥

गडगडाट या तोफांचा !
खणखणाटही टापांचा !
ऐकुं ये त्यांत स्वारीचा
ध्वनि वीरां देत हुषारी !
बिजली जशि चमके स्वारी ! १

लखलखाट तलवारींचा,
चिलखतें आणि भाल्यांचा,
तिकडील तुझ्या तोड्यांचा,
कशि वाह ! मूर्ति मल्हारी !
बिजली जशि चमके स्वारी ! २

झुंजती वीर वीरांशीं !
तळपे मधिं स्वारी खाशी !
पाडीत अरींच्या राशी !
खणखणा झडति तल्वारी !
बिजली जशि चमके स्वारी ! ३

जळ झुले जसें वाऱ्यानें
तिकडील तशा शब्दानें,
कशि वाइ झुलति हीं सैन्यें !
देईल विजय मल्हारी !
बिजली जशि चमके स्वारी !

हां, दिली पाठ सेनांनीं !
परि कशी स्वारि मागोनी
गंभीर, धीर, शब्दांनीं
अरिवरी फिरवि माघारीं !
बिजली जशि चमके स्वारी ! ५

हो अरिची दाणादाण !
लोटलें सैन्य मागुन !
चमुशिरीं वारुवर कोण ?
तिकडीलच वाइ भगगी !
बिजली जशि चमके स्वारी ! ६

—देवास, (५ फेब्रुवारी १९०३).

---

[ २८ ]

# ये पहांटचा वर तारा !

——:o:——

( चालः—"जिवलगे संगिं मम०" )

जागसी जरी सुकुमारी
हे कुमरि ! उघड या दारा !
शेवटला देत पहारा
ये पहांटचा वर तारा ! ॥ ध्रु० ॥
तोडोनि मोहमायेतें,
करिं घाइ वनीं जायातें,
राहुं दे शालु-शालींतें,

राहुं दे तुझ्या माणिहारा !
ये पहांटच्या वरि तारा ! १

पळ खरा कठिण मज कळतें
सोडुनियां नातेंगोतें
जायाचें घोर वनातें !

कळ सोस करूनि विचारा !
ये पहांटच्या वर तारा ! २

विकतिल तुज दादा आई !
गृह शून्य, गृहिं न या राहीं !
येथें सुख पळभर नाहीं !

सोड ही मनोहर कारा !
ये पहांटच्या वर तारा ! ३

नरमांसा टपती रानीं
पशुः बरे राक्षसांहूनी
विकती जे जरठा तरुणी

निजमांस नेति बाजारा !
ये पहांटच्या वर तारा ! ४

तुजसाठीं सोडुनि माया
जाहलों सिद्ध टाकाया
गणगोत मित्र सर्वां या

सुंदरी ! तशा घरदारा !
ये पहांटच्या वर तारा ५

तूं जिथें, सदा सुख तेथें !
तूं जिथें, नगर वनही तें !
तूं जिथें, दरी घर मज तें !
चल वनीं थाटुं संसारा !
ये पहांटच्या वर तारा ! ६

नभ निर्मळ जीवित्वाचें
जरि भाळीं नाहीं अमुचें !
हरि-चाप वादळावरचें
चल होऊं तरि कांतारा !
ये पहांटचा वर तारा !

---देवास, (२० फेब्रुवारी १९०३).

[ २९ ]

## देईं वचन तुला !

——:०:——

[ चालः—"नाहिं सुभद्रा०" ]

तीनी सांजा सखे मिळाल्या
देईं वचन तुलाः—
आजपासुनी जिवें अधिक तूं
माझ्या हृदयाला ! ॥ ध्रु० ॥

कनकगोल हा मरीचिमाली
जोडी जो सुयशा;
चक्रवाल हें पवित्रः ये जी
शांत गभीर निशा
त्रिलोकगामी मारुतः तैशा
निर्मल दाहि दिशा
साक्षी ऐसे अमर करुनि हे
तव कर करिं धरिला !
तीनी सांजा सखे मिळाल्या
देईं वचन तुला !

स्वकरें तरुवर फुलें उधळिनी
प्रीति अक्षता याः
मंत्रपाठ हा झुळुझुळु गातो
निर्झर या कार्या !
मंगलाष्टकें गाति पांखरें
मंजुळ या समया;
सहस्रकर हा दिनकर स्वकरें
उधळि गुलालाला !
तीनी सांजा सखे मिळाल्या
देई वचन तुला ! २

नाद जसा वेणूंत; रस जसा
सुंदर कवनांतः
गंध जसा सुमनांत; रस जसा
बघ या द्राक्षांत;
पाणि जसें मोत्यांत; मनोहर
वर्ण सुवर्णांत;
हृदयीं मी सांठवीं तुज तसा
जीवित जों मजला !
तीनी सांजा सखे मिळाल्या
देई वचन तुला ! ३

—इंदूर, (१८ जुलै १९०२).

---

[ ३० ]

## जीवन !

—:०:—

थापरी असे जीवन
सखे गे चंचल अमुचे क्षण !

ते संध्यामेघावरी
चमकती किरण क्षणभरी
परि जाति कुणिकडे सांग अम्हाला चटका ते लावुन !
यापरी असे जीवन
सखे अम्हि मोह घालतों पण ! १

घन राइमधें कवडसा
तरु हलतो डुलतो कसा
परि जाइ कुणिकडे सांग सखे रवि कलतां स्थानांतुन ?
यापरी असे जीवन
सखे अम्हि हलतों डुलतों पण ! २

दलदलीमधें ज्योति ती
बहुवर्णी ठुमकते किती
ती निजते उठते सांग कुणिकडे जाइ गुप्त होऊन ?
यापरी असे जीवन
सखे अम्हि नटतों थटतों पण ! ३

घनपटल किरण भेदुन
तसि ज्ञानकिरण तेथुन
तो दिसेचि न दिसे पुन्हां घनतमें टाकि नभा व्यापुन !
यापरी असे जीवन
सखे त्यावरी भरंवसा पण ! ४

तेजाच्या ज्या सागरीं
लीन तेज काथिलें वरी
जायचें अम्हां त्या घरीं तरि न बघुं असुन अम्हां लोचन
यापरी असे जीवन
वरि सदा डेव म्हणुन लोचन ! ५

[ ३१ ]

# –प्रत, मुलाच्या निधनकालीं !

(वृत्तः—द्रुतविलंबित.)

१.

विमल या कलिका लतिकांवरी
उकलती नच, भूवरि तोंवरी,
गळुनियां मळतीः मिळती धुळीं,
झुळवितां तुज येतिल कां मुळीं ? १

झुळवितां कधिं जें तुज येइना,
तळमळूं न तयास्तव दे मना.
अनय काय कधीं हरिही करी ?
धरुनि भाव असा मन आंवरीं ! २

तव करीं हरिनें जरि ठेविली
परत ठेवचि ही बघ घेतलीः
तुज दयाघन देइल तो पुन्हा,
धरुनि भाव असा धरिरे मना ३

२.

सहज हें मज येथुनि सांगणें !
कठिण दुःख परी तुज सोसणें
कळ तयास खरें, कळते खरी,
भिनत ज्या अति तीव्र उरीं सुरी ! ४

कठिण रे किति बाळक टाकणें
जड धुळींत करीं निज लोटणें !
दगड बांधुनियां हृदयावरी,
गिळुनियां निज दुःख कसें तरी ! ५

कठिण मोह पळांतरिं सोडणें
कठिण फार कठीणचि सोसणें २०
कठिण तो बघणें मग पाळणा,
अति भयाण उदास अतो सुना !
मधुर मंजुळ जो घुमला रवें
मग मुकाच-मुकाच न पाहवे ! २१
मधुर, मंजुळ खासचि तो ध्वनी
मधुर काय धरेवर त्याहुनी ?
मधुर वेणुनिनाद ?– न त्यापुढें
मधुर कोकिलकूजन ?–छे, रडें ! २२
वसन तें बघणें मग दुःख दे
छबुकलें खुललें बहु ज्यामधें
स्मरण देतिल वस्तु अशा किती ?
विसर होइल तो कवण्या रिती ? २३
नयन हे मिटतां शयनांतरीं
उकलतां कमलें नयनें खरीं !
चिमुकलेंच गुलाब मृदू मुख
उकलतां किति हो हृदया सुख ! २४
पसरतां कर आंवळण्या तया—
उचलतां मुख चुंबन घ्यावया—
उघडतां इतुक्यांतच लोचन,
तिमिर दाटचि दाटचि पाहुन, २५
उगिच चांचपतांच•चहूंकडे,
अगइ ! हा ! हृदयास कसें घडे ?
हळुच काय डसे हृदयास या ?
धगधगे उर तें मग कासया ? २६
भ्रम भरे हृदयांत जसें पिसें,
तनयदुःख न जों कळतें डसे !

मग झराझर वाहति लोचन;
नयनिं नीज शिरे मग कोठुन ? २७

चहुंकडे भरलें वघुनी तम,
मन म्हणे ' न शिरे उरिं कां मम ?
स्मृति तमीं तरि पाउच मज्जन ! '
तरिहि जागति आंतर लोचन ! २८

तमिंहि तेंच दिसे फिरुनी मुख,
तरि न दे हृदया फिरुनी सुख;
श्रवणिं तें हंसणें, रडणें पडे !
परि मना तुजलागिं कसें घडे ? २९

चपल तें कर हालविणें दिसे,
समयिं एकचि ये रडणें हंसें !
हळुहळू रडणें विसरे हंसें,
फिरुनियां हृदयांत भरे पिसें !— ३०

तनयसौख्यचि तें मग भोगतां
दिन, निशा विसरे मन हें स्वतां;
विसरतां निजभान मुलासवें,
कटुक कुक्कुट तो मग आरवे ! ३१

तडफडोनि उठे मग हें मनः
हलवितें शरिरा जड भेदुन
हृदयिं भार धरोनि भयंकर
दिनकृतींत फिरे मग हा नर ! ३२

जरि हंसे स्वजनांत फिरोनियां
हळुच कांहिं तरी डसतें तया.
सकल हें अति दुःसह दुस्तर,
कठिण फार कठीण खरोखर ! ! ३३

मृदुल फार सख्या तव हें मन,
दिसति ते भरले तव लोचन;
बघुनियां तव रे मुख हें फिकें,
हृदयिं कांहिं गमे मम ही चुके ! ३४

न कळतां गळुनी नयनांतुनी
हळु उरीं वितळे जळ येउनी,
न कळतां हृदयांतुनि हें पहा
श्वसित ये मिसळे पवनांत हा ! ३५

अगइ ! काय तरी उरिं वोंचलें ?—
ममहि आठवती मजला मुलें !
खचित दुःसह दुस्तर हें सख्या,
विसर कैविं म्हणूं तुज तान्हुल्या ? ३६

विसर बाळ कधीं न म्हणेन मी
बुडव दुःखचि विस्मृतिचे तमीं;
प्रणयरत्न मळे चिखलीं, तया
धुवुनि निर्मळ, दिव्य करीं सख्या ! ३७

खचित दुःसह दुःख कळे मज,
चिरड दुःख; तरी प्रणयध्वज
फडकुं दे ! सुविचार करीं जरा
बघ अफाट विशाल सख्या धरा ! ३८

उगवला रवि कां कधिं मावळे ?
नयनभूत जळें नच जो मळे !
तनयहीन किती जनकां करी
रडवितो किति भूवरि सुंदरी ! ३९

हरिस जें रुचतें, सखया खरें !
खचित नीटहि, योग्यचि तेंच रे
विसर यास्तव शोक सख्या परी
तनय तो स्मर तूं वरचेवरी ! ४०

४

भगिनि ! मीं तुजला नच पाहिलें,
तरि तुला स्मरतां मन हें उले;
तुजसि शांतवुं सांग कसा तरी ?
हरि करोच दया तुझियेवरी ! ४१

५

दिवस जातिल हेहि निघोनि गे;
—जगतिं काय असें नच जें निघे !—
हृदय होइल शांत तुझें जयीं
निज मना म्हणशील असें तयीं— ४२

अगइ ! आठवतें मज तान्हुलें !
हरिस तें रुचलें मम सोनुलें !
उचलिलें पदरीं निज घेतलें,
अति दयानिधिनें हरिनें भलें ! ४३

कुटिल, पातकपूर्ण धरा दिसे,
वदन निर्मळ कां असतें तसें ?
उचलिलें हरिनें म्हणुनी तुला
मुख मळो न, अशा धरि हेतुला. ४४

सदन हें मम दुःखतमोन्वित
सदन तें सुखशांतिविराजित !
हरि निजांकिं तुला रमवी वरी,
अति दयाघन तो नय आचरी ! ४५

६

धगधगे उर-स्थंडिल हें तुझें,
अति पवित्रहि निर्मळ पुण्य जें !
कुसुम हें मम अर्पि तयावरी;
जरि जळे तरि तेथ जळो तरी ! ४६

——देवास, ( १२ फेब्रुवारी १९०३ ).

---

[ ३२ ]

## आलें तुझ्या रे दारीं नृपा !

( रागः——तिलक कामोद. )

आलें तुझ्या रे दारीं नृपा !
घालीं भिकेला करिं रे कृपा ! ॥ ध्रु० ॥
नांव ऐकुनी तुझें वाट दूर चालुनी,
आलें उपाशीं थकुनी भागुनी ! १
मूठ घालितां मला हीन दीन याचका
भांडार सारें रितेंच होय का ? २
ताट दाटलें तुझें अन्न त्यांत राहिना
उच्छिष्ट घालि रे उपाशि या जना ३
ज्ञानिया, जनार्दना, जनीस घातली न का
केला कुबेरापरि न का तुका ? ४
मीच काय एकली दारिं तुझ्या येउनी
जाईन विन्मुखी निराश होउनी ? ५
घाल घाल रे नृपा ! वेळ काय लाविसी
जीव चालला किती अंत पाहसी ! ६

---

[ ३३ ]

# दुष्काळानंतरचा सुकाळ !

( चालः—" कडकड कडकड ताडित्० " )

घुमव घुमव एकदां फिरुनि तो गोड तुझा पांवा
सोनें झालें शेत पिकुनि हें करितें मीं धांवा ! ॥ ध्रु० ॥

लक्ख पसरलें शेतावर या निर्मळ बघ ऊन,
पसर तसा तूं जादु तुझाही पांवा फुंकून !
त्या जादूनें वनदेवींची भूमि बने शेत !
कीं स्वर्गाचि तो ओढुनि आणी क्षणामध्यें येथ !
मोत्यांचे दाणे भरले कणसांत या-रे सख्या !
लवलीं हीं खालीं किति तरि भारें तया-रे सख्या !
आनंदें डुलतिल पांवा परिसोनियां-रे सख्या !
होति विलक्षण वृत्ति मनाच्या भुलति दुष्ट भावा
फुंकाऱ्यासह जाति उडोनी क्रोध, लोभ, हेवा ! १

डुलुनी धुंदित बैल डुकाऱ्या करिती कुरणांत !
बागडती या गाइ सख्या रे हंबरडे देत !
शिंगें ताडुनि शिंगांवरतीं देती ताल म्हशी !
सळसळती हीं कणसें पवनीं खळखळते नदि जशी !
पंचमांत गाते झाडावरि कोकिला !—रे सख्या !
नाचोनि मोर हा उंच ओतितो गळा-रे सख्या !
हा ओढा गाउनि खळखळ भरतो मळा-रे सख्या !
लोट ! लोटरे ! ओघ जादुचा पाव्यांतुनि तेव्हां !
सकळ मिळोनी एक स्वरानें गाउं देवरावा ! २

कनवाळू तो या गरिबांचा कळवळला देव !
दूर पळाला काळ घातला खोल जरी घाव !

धरणीमाता प्रसन्न झाली–कणसें हीं पिकलीं !
हाय ! कशी मी तुकड्याकारण बइ माझी विकिली !
हीं बाळें आतां दूर नको व्हायला– रे सख्या !
जाशील न टाकुनि तूंही आतां मला– रे सख्या !
तें अभक्ष्य नलगे पोटां जाळायला– रे सख्या !
नको नको तें स्मरण, स्फुरण हो आठवतां घावा !
बुडवाया तें दुःख जिवाला पांवा हा ठावा !!

—देवास, (फब्रुवारी १९०३).

---

[ ३४ ]

# मुलाच्या विवाहकालचे एका विधुराचे उद्गार !

[चालः–"तस्कर हातीं०"]

चवघडा झडतो
झडतो दुमदुमुनी
धडधडे उर हें कां म्हणुनी ?
सनइ ही घुमते
घुमते मंजुळ ती !
मला कां गमे निधन-गीति ?
मधुर या गाती
गाति वारयुवती !
पिशाची क्रीडारत दिसती !
झुलति गज दारीं
दारिं जरी डौलें
गमति कां अवसेचे पुतळे !
चमकती युवती
युवति जशा चपला
पिळति कां माझ्या हृदयाला !

उसळली दाटी
दाटी चौकांत ?
मला कां भासे एकांत ?
वधुवरां बघुनी
बघुनी तोष सकलां
बाळ वर माझें, सुख न मला !
गाती पंक्तींत
पंक्तित वरमाय,
हा कुठें परि ती वरमाय ?

—देवास, (फेब्रुवारी १९०३).

---

[ ३५ ]

## प्रीतीचा वास !

[ एका किल्ल्यांच्या वेशीजवळ चढणीवर उभा असलेला, एक तरुण, कुलीन पण गरीब गृहस्थ, उंच खिडकींत उभ्या असलेल्या रूपयौवनसंपन्न अशा आपल्या प्रीतिविषयक कुमारीप्रत म्हणतोः— ]

( रागः—"झिंजोटी" )

प्रीति ना वसे कधींहि उंच त्या गडावरी !
उतर उतर ! ये
प्रीति हवि तरी,
रुचति खालच्यांचि तिला मोकळ्या, निळ्या दरी !॥ध्रु०॥

चंद्र एकलाच वरी
चांदण्या किती तरी !
झुरति कोपऱ्यांत दुरी,
प्रीति काय ही खरी ?
प्रीति ना वसे कधींहि उंच त्या गडावरी ! १

पक्ष पक्ष भेट दे न,
येतो तें रागवून !
पडति फिक्या वक्त्र बघुन,
भीति त्यां भरे उरीं !
प्रीति ना वसे कधींहि उंच त्या गडावरी ! २

राया, गुहा, झरे
प्रीतिचीं खरीं घरें !
अदृश्य येथ संचरे
देवि तृप्त अंतरीं !
प्रीति ना वसे कधींहि उंच त्या गडावरी ! ३

नीरस ते वरि महाल,
सरस या दऱ्या विशाल !
रक्तें ते लाल लाल !
विमल या दऱ्या परी !
प्रीति ना वसे कधींहि उंच त्या गडावरी ! ४

कारंजें कृत्रिम वरि,
वारिपात येथ परी
झोंकतो हिरे तुषारि !
प्रीतिवसति ही खरी !
प्रीति ना वसे कधींहि उंच त्या गडावरी ! ५
वेश्यांचें गान वरी;
पक्षि गाति गोड स्वरीं,
त्या नादें घुमति दरी !
उतर उतर सुंदरी !
प्रीति ना वसे कधींहि उंच गडावरी ! ६

हार जडाचे तेथ तुला,
बाहु सजिव आपुला

अर्पिन सप्रेम गळां !
अधिक काय गे ! सरी ?
प्रीति ना वसे कधींहि उंच त्या गडावरी !
उतर उतर ! ये
प्रीति हवि तरी,
रुचति खालच्याचि तिला मोकळ्या, निळ्या दरी ! ७

—देवास, (२२ फेब्रुवारी १९०३).

---

[ ३६ ]

## हा—तो !

( वृत्तः—"इंद्रवज्रा०" )

हा श्री विलासांत सदैव लोळेः
तो नित्य दारिद्र्यदशाच सोशी.
हा या जगीं मात्र खरा दरिद्री !
तो ?–तो खरा श्रीसुख भोगणारा ! १
हा मानपानांत निमग्न लोकीं
तो मात्र निर्माल्य जसा जगांत;
हा मान पावे न कधीं खराच !
तो मान्य, तो पूज्य जगांत होई ! २
हा राहतो तीव्र अशा उन्हांत,
तो राहतो शांत घनांधकारीं;
हा राहतो घोरघनांधकारीं !
तो ?–तो सदा दिव्य अशा प्रकाशीं ! ३
हा केंद्र जेथें मिळतात सौख्यें;
तो केंद्र तीं जेथुनि फांकतात !
हा केंद्रविदूक्तसौख्य, दुःखी !
तो ?–वांपुनी तीं सुख नित्य भोगी ! ४

हा वांचतो शंभर पूर्ण वर्षें;
तो वांचतो मात्र दहाच सारीं
हा वांचतो शंभरहो पळें न !
तो वांचतो कोटि दहाहि वर्षें ! ५
हा तात-दारा-परिवार-युक्तः
तो एकला कोण जगीं तयास
हा एकला, या घर कोठलें तें ?
तो ? मत्र गेहीं वसुधा-कुटुंबीं ! ६
हा पाहतो दूर सभोंवतालीं,
तो ? तो स्वतालाच सदैव पाही !
हा पाहतां सन्निधहो वघेना !
तो पार पाही क्षितिजाचियेही ! ७
हा जिंकितो दुर्बलशा सहस्रां;
तो जिंकितोही ! प्रबलास एका !
हा सर्व जिंकोनिहि जिंकिलेला !
तो जिंकुनी एक सदा यशस्वी ! ८
हा कोण ? तो कोण कळे तुला कां ?
कळावयाची तरि काय इच्छा ?
याला महालांत पहा नृपांच्या
जा-शोध त्यालाहि कुठें दऱ्यांत ! ९

—देवास, (फेब्रुवारी १९०३).

---

[ ३७ ]

## रसिकाप्रत !

( चालः—"अगदिंच तूं वेडी०" )

कळया कळयांत विहार !
करिसि तूं
कळया कळयांत विहार ! ॥ ध्रु०

दिससी तूं वन्सीधर गिरिधर
तुझ्या छबीस न पार !
सख्या रे
कळ्याकळ्यांत विहार ! १

जादु वन्सिचा घुमतां तूझ्या
येइ कळ्यांस बहार
फुगति या !
कळ्या कळ्यांत विहार ! २

काय लभ्य श्रीमान भूप मज
करिति फुलावर प्यार
मात्र, ते !
कळ्याकळ्यांत विहार ! ३

नको नको अभिमानि तेहि मज
घालिति मुळीं कुठार
निर्दयी !
कळ्या कळ्यांत विहार ! ४

मुग्ध कळ्या या मुली तान्हुल्या
पुरविसि कोड अपार
बापसा !
कळ्या कळ्यांत विहार ! ५

खेळविसो त्यां झेलुनि हातीं
लोभ तुझा अनिवार
यांवरी !
कळ्या कळ्यांत विहार ! ६

माळि भिकारी हा पण तूझा
लोभचि यांवर फार
निर्मळ !
कळ्या कळ्यांत विहार ! ७

प्रीतिसूत्रिं गुंफोनि अर्पितों
गळां कळ्यांचा हार
घे सख्या !
कळ्या कळ्यांत विहार !

—इंदूर, (मार्च १९०३).

---

[ ३८ ]

## कुपित अंगनेप्रत !

(चालः—"भूपती खरे ते०")

हे मुरड नेत्र रागांत कि अनुरागांत;
घे, पीळ, पाळ हें हृदय तुझ्या हातांत !
पिळतील तरी ते नवनीताचे गोळे,
पाळतिल तरिहि तेजाळ विशाळचि डोळे !
मउ फूल झोंकिलें काय वाहिलें काय;
सुख सारखेंच ! ये अधिक काय वा जाय !
प्रेमांत तुझ्या गे अधिक उणें तें काय ?

संपूर्ण त्यामधें नाहीं तरतमभाव !
खळ येणें, खुलणें, नेत्रीं वरवर भिन्न,
तरि रंग खरोखर एक लाल आंतून !
मन आंतलेंच तें आंत नीट बघणार,
वर दाब राग, अनुराग काय होणार ?

जरि पिळणें रुचतें पीळ पीळ मुरडोन;
जरि करीन हूं चूं हराम तरि मज जाण !
पाळण्यास डोळे फिरव गरगरा प्रेमीं,
सुख तुला ज्यामधें सुखी तयांतच गे मी !

हे मुरड नेत्र रागांत कि अनुरागांत;
घे, पीळ, पाळ हें हृदय तुझ्या हातांत !
—इंदूर, ( १० मार्च १९०३ ).

---

[ ३९ ]

## क्रुद्ध सुंदरीस !

( चालः—"भूपती खरे ते०" )

सजलीस जरी हें हृदय सखे फाडाया
तरि पहा, सांगतों जपुनि करीं या कार्या.
हें स्वल्प वाटतें काम मानिनी ! कां गे ?
पण वेडे पडसी भ्रमीं खरोखर सांगें !
किति अहा ! फिरविसी डोळे गरगर रागें !
कां घुसळुं पाहसी हृदय सांग त्यायोगें ?
सोन्यांत खचविले हिरे तुझे ते डोळे !
अति मोहक करितिल काम कसें ते भोळे !
किति लाल करोनी ओतिसि कां अंगार ?
हा वेडे ! घेतें प्रेम उडी बाहेर !
किति पुन्हां पुन्हां वांकड्या भोंवया करिसी
त्या उलट पोसती हृदय सांग गति कैसी !
हे लाल करोनी गाल फुगविसी रागें
शेवतींत खुलतो गुलाब अधिकच्च ना ? गे !
किति आव घालिसी असा हृदय फाडाया !
पण नीट पहा गे आंत आपल्या हृदया.
बघ आंत नीट निरखोनि काय तें झालें ?
हें हृदय कसें मिसळोनि त्यामधें गेलें !
तीं दोन्हीं झालीं कशीं एक मिसळोनी
कां करितां येतिल भिन्न तुला परतोनी ?

जरि भिन्न न करितां करिशिल घाई ऐशी
होईल काय परिणाम कळे का तुजशी ?
जळ दुधांत मिळतां काय अधीं फाटावें ?
हें तुम्हां स्त्रियांना काय अम्हीं शिकवावें ?
बघ नीट म्हणोनी हृदय अधीं अपुलें तें
घाईत न फाटो हीच भीति मज कांते !

—इंदूर, ( १३ मे १९०३ ).

---

[ ४० ]

# हाय हाय ती गेली गेली काय अतां उरलें !

:o:

[ वंग कवयित्री तोरूलतादत्त हिनें आपल्या बहिणीस उद्देशून लिहिलेल्या ‘ Though Childhood's way were past and gone ’ या विलापिकेचें भाषांतर.]

( वृत्तः—“अंजनीगीत” )

शैशव दिन जरि गेले निघुनी
निर्मळ किति तरि ती शिशुहूनी
छवि जरि खुलली नसांनसांतुनि
हृदय विशुद्ध अती !
मास, दिवस, सुखि मितचि लोटतां,
होइल विकसित रति मनिं आतां;
गुलाब उकली हृदयमधु, स्वतां
वसंत-मृदु-किरणीं
ऐसें वाटे आम्हांला जरि
तरी हरीची रचना दुसरी;
दिव्य नभोज्योती ती सुंदरि
कैवि धरेस पचे !
बाल्यदशाचि न जोंवरि सरली
तोंचि अहा ! अंतर्हित झाली,

हाय ! हाय ! ती गेली-गेली
काय अतां उरलें !
घनपल्लवयुत तरुराजींतुनि
पाक्षिगानहि जातें लोपुनि
मधुर हास्यही वदनावरुनी
याचपरी वितळे !

—इंदूर, (२१ मे १९०३).

---

[ ४१ ]

## अजुनि लागलेंचि दार उजळे ही प्राची !

[ वंग कवयित्री तोरूलतादत्त हिच्या "Still barred thy door" या कवनाचें भाषांतर. ]

( चालः—"प्रीति ना वसे०" )

अजुनि लागलेंचि दार
उजळे ही प्राची
स्वेच्छ थंडगार झुळुक वाहतसे ताजी ॥ ध्रु० ॥
जागवि जी रम्य वेळ
कमलादिक सुमन सकल,
कां न तुला जागवि परि,
कमलनयन साची ? १
देवि, कांति, गीति, प्रीति
सकल मनीं उत्सुक अति,
दारिं उभ्या वाट बघति
या तवागमाची. २
अरुणराग गगनि कांति,
पक्षिगणीं मधुर गीति
या हृदयीं विमल प्रीति

पुरव हौस यांची.
अजुनि लागलेंचि दार
उजळे ही प्राची ! ३

जीवित तुजवीण विफल,
कां मग हा विधिचा छल
तुजसाठीं मत्प्रीती,
छवि तव या जनाची
अजुनि लागलेंचि दार
उजळे ही प्राची ! ४

ऊठ हे मनोभिराम
तिष्ठतसे मी सकाम
रुदन करी, कोठवरी
मूर्ति ती जीवाची ?
अजुनि लागलेंचि दार
उजळे ही प्राची ! ५

—इंदूर, (२२ मे १९०३).

---

[ ४२ ]

## पाडवा.

(चालः—सुकुमार, अजुनि तूं लहान)

पाडवा
उगवला नवा
पुन्हां सौख्याचा
हा काल कल्पिला कालोदधिभरतीचा ! १

नव लाट
बघाया थाट
भूमि ही करुनी
काशि उभी सजुनियां नवपल्लवें नवसुमनीं ! २

हे काल—
सागरा काल-
रात्रिच्या उदरीं
जी जनन पावली लाट निघे बाहेरी ! ३

आव्हान
कराया गान
मुदित ही वाटे
शतपक्षिमुखानें स्वागत करि तुज लाटे ! ४

किति मंद
शीत सौगंध
श्वासही वितरी;
जणुं उरावरुनि कुणि ओझें ईच्या उतरी ! ५

दुष्काळ
प्लेग विक्राळ
नक्र घेवोनी
किति आल्या लाटेवरि लाटा आदळुनी ? ६

नच दया
स्पर्शली तया
आजवरि बाळें
किति अनाथ गिळलीं,हृदय, यामुळें पोळे. ७

गांजली
किती भाजली
साश्रु नयनांहीं
आशाकुलपणानें दीनवाणि तुज पाही ! ८

गत लाट—
जननिं ही थाट
यापरी केला
परि नायनाट आशेचा शेवटिं झाला ! ९

आंतला
कडाडुनि शिला
उकाळा फुटुनी
हे दावानलिं तशि आस फुटे तव जननीं ! १०

ही आस
कीं स्वतनयांस
सुखद तूं खास
होशील म्हणुनि हा हृदयिं पुन्हां उल्हास ! ११

परि उरीं
काय तूं तरी
घेउनी येसी
हे सांग सांग या शीघ्र दीन भूमीसी! १२

ग्रह नऊ
काय गे खाउ
धाडिती आम्हां
हें सांग शीघ्र आईस गाउं तव नामा ! १३

अति कष्टि
तृषाकुल सृष्टि
वृष्टि देवोनी
धनधान्य धाडिलें काय सांग गे त्यांनीं? १४

ग्रह शनी
कुपित आजुनी
अम्हांवरि काय ?
हें ऊर फाटतें धाय मोकली माय ! १५

सस्नेह
पितामह होय
अतां तरि काय
घाडिलें गदातीं काय अम्हां आरोग्य ! १६

गृहकलह
पिटाळुनि स्नेह
आणिला कां गे ?
ही त्रस्त कारस्थांमुळें भूमि तिज सांगे ! १७

कां दया
बंधुहृदयिं या
दीन भगिनींना
आणिली काय गे सांग भूमिला दीना ! १८

कवि नवे
आम्हांला हवे
आणिले काय ?
टेनिसन् आणिला ? अमर करिल तव नांव ! १९

—धार, (११ जून १९०३).

---

[ ४३ ]

## वियोगिनी !

( चालः—सुकुमार, असुनि तूं लहान )

निर्जनीं
घोर या वनीं
कोण तूं सांग ?
गंधर्वसुता, वनदेवि, मनुज वा कां गे ? १

हा गिरी
वांसुनी दरी
पसरला येथें:
कांतार भयंकर कसें तुला रुचतें तें ? २

वरगळ्या
लांब वांकड्या
पसरल्या असती:
रक्तापरि गिरिच्या काय न देती भीति ? ३

बघ भुजग–
सम उत्तुंग
शिरावळनियां
हे भस्मी ओहळ ! मदाग्नि फुटे गळस्था यां ! ४

तृण कुसें
गांठ हें असे
पीत, तांबूस:
जणुं थरारले हे ह्या दैत्याचे कुंस ! ५

पलिकडे
धारि कडकडे
धवल फेंसाळ,
नरदुःखिं खदखदा अट्टहास विक्राळ ! ६

दे श्वास
कोण श्वासास
अश्रु अश्रूला ?
नच सहानुभूती इथें मनुजयोनीला ! ७

सहवास
वसे जो त्यास
व्याघ्र, सिंहाचा !
नव–पल्लव–कोमल–कुमरि–देश्य का साचा ! ८

तारुण्य
असुनि आरण्य—
वास कां रुचला ?
कां अकाल आली पक्वदशा ही तुजला ? ९

गांजली,
काय टाकिली
वृद्ध तातांनीं ?
तुज विक्रयभीती काय पिटाळी रानीं ? १०

संसार
सुखाचें गार
हरित दिन असुनी
कां वसंत दवडिसि आयुष्याचा विपिनीं ? ११

घन घनीं
जसा लोपुनी
दडावा तारा,
त्यापरी दडसि कां इथें त्यजुनी संसारा ? १२

ज्यापरी
गिरीच्या उदरिं
हिरा लपलेला
पारख्यापासुनी तशी, इथें तूं बाला ! १३

ज्यापरी
वनाभीतरीं
कुसुम वाळावें,
त्यापरी काय संकल्प तुझा ? सांगावें ! १४

वद वृक्षिं
एकटे पक्षि
कधीं कां वसतो ?
सहवासाविण जीवित्व भयंकर जगतीं ! १५

अनिवार
जिवाचा भार
कसा एकानें
सोसावा स्त्रीविण नरें, तयाविण तीनें ? १६

चल पुरीं
म्हणुनि सुंदरि !
वाट तव पाही
मर्पोनि हृदयिं या, तुला आदरें वाही ! १७

... भव्य
मनोहर दिव्य
... बागेत
नगरांत पाहले वाट तुझी चल तेथ ! १८

पुराणां
प्रणयलोचनें
... सगें !
... असें ... सांग कुठें गे सजणे ! १९

... स्थ
... अश्वस्थ
... गाया
अति ... तुजला ' आई ' संबोधाया ! २०

... 
... 
... लोळा...
पतिपत्नि, ... ताटीं जेवावे ! २१

हें ...
तें ... 
नीट ...
स्वीकारो हृदय ... ! २२

का वरें
नीर या भरे
नील तव नयनीं ?
कां कांहिं टोंचतें तुला सांग या वचनीं ? ” २३

“ हा झरा
कसा झरझरा
वाहतो पुढतीं !
का उलट नरु शके कुणी प्रवाहावरतीं ! २४

झरझरा
प्रीतिचा झरा
लागला वाहूं :
त्या उलट झगडलें; दुःख असां किति साहूं ? २५

तरु पहा
उभा येथ हा
गार किति छाया !
तोडोनि डहाळ्या हाय शोधणें वांया ! २६

साउली
मला लाभली
प्रीतिची असुनी
करिं फांद्या छेदुनि वणवण भ्रणलग विपिनीं ! २७

विनविलें
किती प्रार्थिलें
मला तें त्यांहीं
परि नाहिं पाहिलें नयां सदय नयनांहीं ! २८

टाकुनी
बोललें वनीं
चला येथोनी
काशि वाढ अ ची मज कांटोनी ? २९

मत्प्राण
तेच दिनिं जाण
वनाला गेले:
हें शरीर मागुनि शोधित वनिं त्या आलें ! ३०

ते जरी
लाभले तरी
लग्न होवोनी
ये, न, तरि वरं वन पुरश्मशानाहूनी! ३१

त्यांवीण
व्यर्थ कीं क्षीण
पुरीं. जें म्हणतां
तें सर्व फळा ये छाया ती सांपडतां! ३२

सत्प्रीति
जरी भूवरतिं
एक त्या हृदयीं
ज्या स्थळीं दडुनि मत्प्राण निघे त्या समयीं! ३३

तुम्हि खला
कां वरं मला
भुरळवूं वचनां?
गिरिपरी तनू जड काय खुळं तरि वदतां ? ३४

कुणिकडे
पाहुं तरि गडे
तुम्हाला ? नाथा !
या पदर पसरतें; क्षमा करा मज आतां!” ३५

—धार, (१३ जून १९०३).

[ ४४ ]

# सायंकाल.

( रागः—पूर्वी. )

सायंकाळीं मधुपगण
 येतो धांवत नलिनीलाः
 करितो गुंजत ते लीला
होई नष्ट श्रमस्मरण !
सायंकाळिं परत पक्षी
 धांवत येती वृक्षाला
 पिलें लाउनी वक्षाला
गाती कवळुनि निजपक्षीं !
सायंकाळिं परत धेनू
 प्रेमें फोडित हंबरडे
 येती वत्स असति तिकडे
धांवत, उडवित त्या रेणू !
सायंकाळीं फिरुनी मी
 येतों धांवुनि सदनाला
 चुंबुनि तनयावदनाला
विसरें श्रम सारे प्रेमीं !
सायंकाल सदनकाल
 गृहिणी, बालक, कवनाची
 सत्ता न दुजा कवणाची !
विश्वसम दुसरा मग जाल !

—धार, (१४ जून १९०२).

[ ४५ ]

## सृष्टिशिक्षण !

( वृत्तः—पृथ्वी )

‘ किती हृदय ओढिती हरिण ! ’ तो प्रमोदें वदे
नरासम न हे कधीं फुगति जातिच्या दुर्मदें
निषादभयही तयां न वनिं या कधीं कांपवो;
तयांसम निवास या वनिं कसा न तो सौख्य, वो ?
सख्यांसह अपाप या वनिं निवास होवो सदा;
स्वयेंचि वनिं जोडितों सकलशास्त्र सत्संपदा
अहा ! सुखद शांत हें गहन काननीं जीवन
श्रमांति सुख जें जगीं अधिक काय तें याहुन ?
न दुःख नयनां जिथें पडति ते तिथें सोसण्या
वनीं न परिहासही विफल सोसण्या सोडण्या
जडाजड पदार्थ हे गुरु मदीय सारे वनीं,
शिकेन पशु, पांखरें, गिरि, तरु, झऱ्यांपासुनी ! ’

—इंदूर, (२६ जून १९०३)

---

[ ४६ ]

## प्रणयवंचिताचे उद्गार !

( चालः—“भूपती खरें तें०” )

तुज खेळ वाटली प्रीति मना रे ! वेड्या !
हो अतां तरी खातरी ? जासि वाटे त्या ? ॥ धु० ॥

हो झुंजुमुंजु तो कोठें-जें उषा,
ताऱ्यांस दाविली बोटें-दशादिशा !
मिळतील न वाटे खोटें-किति नशा !

कुणिकडे
दडाले पुढें
हिऱ्यांचे खडे
नभांतुनि साऱ्या ?
हो उषा प्रखर माध्यान्ह कुठुनि समजाया ? १

मृदु वसंत जें आयूचा-झळकला,
गुलजारचि सर्व बगीचा-भासला !
मग बहारचि गुलाबाचा-देखिला !

रे जरी
भरारी पुरी
मारिलिस तरी
हाय ! तें वांया !
खरखरित उन्हाळा होय ! उरातें कांटे त्या ! २

ताठेत थाटेत बाळ-लठुलडु,
होउनी प्रबळ भूपाळ-लटुमटु,
जमवोनि बाळगोपाळ-किति वटु

छडि करीं
धरुनि ये जरी
गुरूजी तरी
पळ सुटे मग त्या !
भूपाळ पळे ! हो बाळचि रडवें जात्या ! ३

झळझळित हिरे न डोळे-पाहुनी
डोल्यांत सुखाच्या डोले-मन मनीं,
' उरिं धरिन ' म्हणे मन भोळें-फणिमणि !

भ्रम भरे:
अरेरे हिरे
हलाहल खरे !
कुठुनि समजाया !
पळ सुटे विकारां उग्र पाहतां सत्या ! ४

चंचले विजे गे पोरी !—निर्दये,
केलीस मनाची चोरी—निर्भये,
सरि दिसे ! गळां परि दोरी !—कळुनि ये.
हा ! परी
कडाडुनि वरी
प्रगटलिस खरी:
ठार केलें या !
हा ! काय फायदा अतां कळुनि तुझि माया ! ५

—इंदूर, ( २५ जुलै १९०२).

---

[ ४७ ]

## कालाच्या चढुनी श्रमे वरिवरी चवऱ्यांयशीं पायऱ्या.

( वृत्तः—शार्दूल विक्रीडित )

कालाच्या चढुनी श्रमें वरिवरी चवऱ्यांयशीं पायऱ्या
अत्युच्चीं नरपायरीवरुनि जो ढुंके न मागें पुन्हा:
कोट्यादी तपुनी तपें करुनियां वातांबुपर्णाशना,
जो स्वर्गी चढला वरें तिथुनियां खालील काळ्या दऱ्या !

सेवी जो अमरांगनासवसुखा—गंधर्व कीं किन्नर !—
तेजाचा पुतळा ! अहा प्रभुसभासद्रत्न जो मोहक !
आकाशीं शशिच्या प्रकाशिं शयनीं स्वप्नांत तो तारक
हुंगे मात्र मनें अनीतिमदिरादुर्गंध ये जो वर !—

उन्मादें शिर तें फिरे गरगरा, काळोख नेत्रां मग;—
कोठें कोण न त्या सुचे; डगमगे-हाले-झुले-घर ये;
येई लोळ झळाळुनी तनुंतुनी-पुण्या पिटाळी अघ;
हा हा हा! पडला कडाडुनि कुठें! पाडी जगाही स्वयें!!
'झाले लोचन लाल! काल जळलें कोठें कुणाचें घर?'
ठावा मी असुनी प्रिये पुससि हें! कां कोप हा मत्सर?

—देवास, ( १ आगष्ट १९०३ ).

---

[ ४८ ]

## गेली ज्योति विझोनियां मग फुका फुंका तयाला किती!

:o:

( वृत्तः—"शार्दूलविक्रीडित" )

गेली ज्योति विझोनियां मग फुका फुंका तयाला किती
ओता आंत घृता, रचोनि समिधा, प्रार्था फुलें वाहुनीं;
झालें स्थंडिल थंडगार मृत तें; ज्योती न ये आंतुनी;
चालूं द्या मग वेदघोष तुमचा, ती वेदिशाला रिती!
गेली ती शुचिता, पवित्र झळके कोठोनि कांती तिथें?

लावा दीपशतां मशाल उजळा, कर्पूर जाळा, उठा;
घंटा घूर्ण पिटा; फुका मग फुका शंखा, नगारा पिटा;
श्रद्धा ती मग वस्तुची! सकल ही कीं फोल छायाचि ते!
प्रीतिज्योति विलासिनीच हृदया टाकूनि गेल्यावरी,

सारी भ्रूप्रमदावली मग झटो, पेटेल कां ती तिथें?
गेला जादु-पिशाच्च विश्व मग हें निःसत्त्व छायेवरी,—
इंदू इंदु न तो, पिशाच्च विधुचें! तारे, रचा हीं भुतें!

' जातां मी रवि, चंद्र येतिल जसे तैसेच. ' कां गे अशी
कांते ! निष्ठुर बोलुनी हृदय हें फाडूनियां टाकिसी ?

—देवास, (३ आगष्ट १९०३).

---

[ ४९ ]

# राजकन्या व तिची दासी.

( चालः—"चंद्रकांत रायाची०" )

दा. " प्रेम तयावर होतं, तर मग, तुमचं ना भारी ? "
रा. " छे ! छे ! कसलं ? लेंक नृपाची मी; तो व्यापारी ! "
दा. " कुंवरजीस दावितां जवाहिर तो, तुह्मि त्यावरतीं
दृष्टि रोंखली हलु वरचेवर स्नेहें कां तर ती ? "
रा. " छे, छे, भलतं ! खुळे, तयावर का रत्नावर ग ? "
दा. " खुळीच मी मज कशी कळावीं मनांतलीं बिंगं ?
बोलुं लागतां कान दिला जरि चपापला स्वांतीं,
डोळ्यांवरुनी गालीं कितिदां क्षणि झळके कांती ! "
रा. " कळेचना मज तुझ्याच मनिंचे हे सारे चाळे ! "
दा. " ' खुळीस ' का मज शक्य ' नृपाच्या लेंकिस ' जें जाळे ?
तुम्हास दावावया जवाहिर येतां कां त्याला
' जा जा ' वदलां मुखें—न नयनें लालि खुले गालां !
कां ओशाळया झालां ? लज्जित जणुं कवणा झालां !
कां पाण्याला—रत्नाच्या ? का डोळ्याच्या ?—बोला ! "
रा. " कधिं ग लाजलें ? कधीं पाहिलं मी तेव्हां खालीं ?
नको जवाहिर, म्हणुनि म्हणालें ' जा;' कसली लाली ? "

दा. “ काय अतांशा झालें तर मग तुमच्या जीवाला ?
कोमेजूं कां गाल लागले ?—तो येथुनि गेला !

उगिच्च बसोनी कां वाऱ्याला कान कधीं देतां ?
उगिच्च कुणाच्या भास होउनी किति फुगतां, फुलतां ?

हात ठेवुनी दारावर किति वेळ उभ्या असतां ?
जणुं उघडिल कुणि दार ! गवाक्षीं कां डुंकित बसतां ? ”
रा. “ कधि ग दिला कुणि कान ? कुणाला कधि ग भास झाला ”
दा. “ कळेल कैसें, देउनि चुकतां हृदयाचि दुसऱ्याला ? ”
रा. “ घे घे मटके ! आळ घेसि तर भलता मजवरतीं
जा म्हण बसलं मन त्यांवर, चल निघे येथुन परती ! ”
दा. “ कंवराणीजी ! कां रागवतां ? ही ‘ लोचट ’—दासी !
क्षीण अवयवीं किति तरि खुलते छवि ही आतांशी !

संचरलें तें वारें-स्मर कीं काय म्हणति ज्याला—
बहार उसळे किती चहुंकडे शरीर-वेलीला !

खैरपूरच्या गुणवयरूपें योग्य कुमाराला
राणाजी ते देतां म्हणतां ‘ ना ’ कां मग त्यांला ? ”
रा. “ खैरपूर किति धनाढ्य ! त्यांना योग्य अम्ही कां ग ! ”
दा. “ कंवराणीजी ! किती लपवितां मन ! किती हीं सोंगं ?

किति भोळ्या तुम्हि खैरपुरेशाचि ते ! न व्यापारी !
वेष पालटुनि आले इकडिल बघण्या ही स्वारी ! ”
रा. “ काय ?-पुन्हां !-ते-खैर-तेच-ज्या-का-कुं-वरजी ते ! ”
दा. “ मी खोटी, मी सटवी, लुब्री, उर कां धडधडतें ? ”

—इंदूर, (२३ जुलै १९०४)

[ ५० ]

## शुक्राची चांदणी !

( वृत्तः—"शार्दूलविक्रीडित" )

शुक्राची मृदु चांदणी लखलखे रम्या कुमारी वरी
प्रीति स्निग्ध, सलज्ज हा नयन कां आरक्त, नील क्षणीं!
झाली चंचल वृत्ति,-संचर गमे झाला ! अशा लक्षणीं
वाटे ही रमणी वरोत्सुक असे झाली बहू अंतरीं !
कोणाकारण ज्योत ही उजळली ठायीं इच्या अंबरीं ?
कायावाङ्मनसा कुणा हृदय ही अर्पी अतां कामिनी ?
शोभे निर्मल नील मंडप किती भास्मान् बऱ्हाडी जनीं !
कोणाकारण पूजनीं रत असे गौरीहराच्या तरी ?
प्रीती ही फुलली अहा ! उसळला तद्वर्ण सारा नभीं !
दावा ती निरखोनियां मज सख्या, कोठें अतां ती उभी ?
झालें मंगल सावधान रविशीं अंतःपटा सारितां !
झाली लीन पतींत सागरिं मुरे जैसी नदी भेटतां !
आहाहा ! सुखसागरांत मुरलें या मंगलीं त्या दिनीं !
तेव्हांपासुनि पाहिलें मज सख्या सांगा पृथक् का कुणीं ?

—इंदूर, (१० एप्रिल १९०४).

---

[ ५१ ]

## आनंद.

—:०:—

( चालः—"नव्या मनूंतिल नव्या दमाचा." )

आनंदी आनंद मुलांनो ! आनंदी आनंद
चहूंकडे दशादिशीं दाटला आनंदी आनंद ! ॥ ध्रु० ॥

आकाशीं आनंद वरी,
भरे धरेवरि त्याचपरी,
गिरिशिखरीं, तरुशिखरिं, घरीं
आनंदाचा सागर भरला घ्याचि बुड्या स्वच्छंद ॥ १ ॥

फुलावरुनियां फुलावरि सुखें फुलपांखरुं ज्यापरी झुले,
तसें झुलाया तुम्हां उधळलीं प्रभुजींनें चहुंबाजुं फुलें !
म्हणुनी उडतां बागडतां,
गरगरगर मंडळ धरतां,
सलील हांसत गुणगुणतां,
वस्तुमात्र आनंद दे, तुम्हां काय जगाचे फंद ? ॥ २ ॥

झुळझुळ मंजुळ गातो निर्मळ झरा, युद्ध जुंपोनि तिरीं,
पर्वा त्याची काय झऱ्याला ? जीवन तुमचें त्याचपरी !
घडामोड चाले जगतीं,
किति हंसती, किति आरडती,
काय तुम्हां त्याची गणती ?
तुम्हि तुमचा आनंद, अहाहा ! आनंदांतचि धुंद ! ॥ ३ ॥

किति धडपडतों अम्ही कीं मिळो आनंदाचा लेश तरी,
तऱ्हातऱ्हा किति करितों परि तो फसवि अम्हां मृगजळापरी
अग्निरथीं त्याला बघतों,
शोधित तारांमधिं फिरतों,
व्याप हाच त्या दडपीतो,
दिशाभूलहो अमुची, न मिळे आनंदाचा गंध ! ॥ ४ ॥

पापशून्य अति निर्मळ हृदयीं आनंदाला वास रुचे,
मंदिर सुंदर आनंदाचें हृदय म्हणोनिच तें तुमचें.
खोटी लज्जा, राग तसें
खोटें रडणें आणि हंसें;
काय तुम्हां हें सर्व पिसें ?
आनंदति किति डोळे अमुचे बघतां तुमचे वृंद ॥ ५ ॥

गोड चिमकुल्या छविल्यांनो ! या अखंड आनंदांत वसा,
खरें गमावुनि वेगळ्या मुलाम्यास नच कधीं तुम्ही फसा !
आनंदाचें दास्य करा,
वळकट त्याची कास धरा,
मग न तयाला वाण जरा,
सकल मनोरथ पुरवो तुमचे आनंदाचा कंद ॥ ६ ॥

—(आगष्ट १९०६).

---

[ ५२ ]

## वारा.

( चालः—नदीच्या पैलारू, दामाजी सोनारू. )

नदीच्या शेजारीं । गडाच्या खिंडारीं,
झाडांच्या ओळींत । वळूंच्या जाळींत,
दिवसां दुपारीं । जांभळो अंधारो;
मोडकें देऊळ । त्यावरी पिंपळ
कोण गे त्या ठायीं । राहातें गे आई ?
चिंचांच्या शेंड्यांना । वडांच्या दाढ्यांना
ओढोनी हालवी । कोण गे पालवी ?
कोण गे जोरानें । मोठ्यानें मोठ्यानें
शीळ गे वाजवी । पांखरां लाजवी
सारखी किति वेळ । ऐकूं ये ती शीळ !
वाळलीं सोनेरी । पानें गे चौफेरी
मंडळ धरोनी । नाचती ऐकोनी !
किती मीं पाहिलें । इतुकेंची देखीलें;
झाडांच्या साउल्या । नदींत कांपल्या !

नं.
ना.
ता.

हांका मीं मारिल्या । वांकोल्या ऐकिल्या ।
उरांत धडधडे । धांवतां मी पडें !
पळालों तेथून । कोण ये मागून ?

—इंदूर, ( मे १९०७ ).

---

[ ५३ ]

## क्षिप्रा-चमळा-संगम !

—:o:—

( शार्दूलविक्रीडित. )

या क्षिप्रा चमळा परस्पर कशा आलिंगिती धांवुनी !
आला हा गिरि आडवा वध कशा याला त्रिधा भेदिती;
याचे हे तुकडे तटांवर तसा मध्यें त्रिकोणाकृती,
होवोनी तट भव्य उंच दिसती शोभा प्रिये हो दुणी !
आतां मूक उभे पुकार करिती साऱ्या जगा लागुनी
" प्रेमाचें भरतें अनावर ! वधा ही आमची दुर्गती ! "
आहाहा किती रम्य संगम, गमे श्रीशारदा भेटती,
किंवा या भगिनीच गीत कविता आसक्त आलिंगनीं
सांगूं याहुनि काय ? भिन्न कुलिं गे पावोनियां संभवा
तूं—मी ज्यापरि भेटलों, मिसळलों, गे एक झालों सखे !
येथें रम्य, गभीर, भीषण अशा या सृष्टिच्या वैभवा
वाटे शांति भुलोनियां पसरली, ती ही निजे का सुखें !
आरोळ्या पिटतों मदें शिशुपरी नाचोनि मीं या स्थळीं
येथें स्वच्छ, गभीर, खोल घुमते पैशाच शब्दावली !

—इंदूर, ( १३ मे १९०७ ).

---

[ ५४ ]

## रासमंडळ गोपीचंदन तुलसिकि माला जय्!

( चालः—"नव्या मनूंतिल" सारखी, अंतरा वगळून.)

रासमंडळ गोपीचंदन तुलसिकि माला जय्! ॥ ध्रु० ॥
अफाट पसरे वाळवंट बहु यमुना तीरीं जें,
तिथें गाउनी नाचे कान्हा गोपाळांसंगें;
यमुना देई सूर तयां; वन कांठावर रंगे;
तें गाणें गावोनि नाचुं या देवहि गाती जें:
रासमंडळ गोपीचंदन तुलसिकि माला जय्! १
हिरवें हिरवें गार शेत हें सुंदर साळीचें
झोंके घेतें कसें! चहुंकडे हिरवे गालीचे!
लांब पसरलें ह्या ओढ्याच्या कांठाकाठानें
खळखळ सळसळ मिसळे, मिळवूं या अपुलें गाणें;
त्या ओढ्याला त्या शेताला लाटा किति येती;
ओळी त्यांच्या एकामागुन एक लांब जाती!
त्यांसह लाटा आनंदाच्या करिती मनिं थय्थय्!
रासमंडळ गोपीचंदन तुलसिकि माला जय्! २
पिवळें, तांबुस ऊन कोंवळें पसरे चहुंफेर,
ओढा नेई सोनें वाटे वाहुनियां दूर!
झाडांनीं किति मुगुट घातले डोकिस सोनेरी!
अहाहा! पहा तर सोन्याचा गोळा तो क्षितिजीं!
रासमंडळ गोपीचंदन तुलसिकि माला जय्! ३
सोनेरी, मखमली, रुपेरी पंख कितीकांचे,
रंग किती वर तऱ्हेतऱ्हेचे इंद्रधनुष्याचे,
अशीं अचल फुलपांखरें फुलें साळिस जणुं फुलती!
साळीवर झोंपलीं जणूं कां पाळण्यांत झुलती!

झुळकन् सुळकन् इकडुनि तिकडे किति दुसरीं उडती
हिरे, माणिकें, पाचू फुटुनी पंखचि गरगरती !
उडूं, वागडूं, नाचूं गरगर फिरूं चला मौजे !
रासमंडळ गोपीचंदन तुलसिकि माला जय् ! ४

उद्यां सकाळीं मुलें–मुली त्या खेड्याहुनि येतां
येथें मंडल गोल उमटलें कुरणावर बघतां
टकमक बघतिल परस्परांना, कौतुक हें केवीं ?
म्हणतिल येथें नाचनाचल्या रात्रीं वनदेवी !
पहा पांखरें चरोनि होती झाडांवर गोळा,
कुठें बुडाला पलीकडिल तो सोन्याचा गोळा ?
वाऱ्यापरि या चलूं घराला नाचतची थय्थय् !
रासमंडळ गोपीचंदन तुलसिकि माला जय् ! ५

—इंदूर, ( १६ जून १९०७ ).

[ ५५ ]

# आइकडे न्या !

—:o:—

( चालः—"सुकुमार, असुनि तूं लहान." )

कोंवळीं
फुलें वाळलीं
कोंवळ्या गालीं
" मज आइकडे न्या " म्हणे; आसवें आलीं ! १

उरिं धरा
कांहिंही करा
हंसे ना खेळे
" मज आइकडे न्या " असें सोनुलें बोले ! २

चहुंकडे
घेउनी कडे
फिरविलें त्यास
" मज आइकडे न्या " खळाचि नसे तोंडास ! ३

" सोनुल्या
छान बाहुल्या
आणि घे घोडे; "
" मज आइकडे न्या " गोष्ट न अपुली सोडे ! ४

" खाउ घे
राहिं पण उगें
किती समजावूं ! "
" मज आइकडे न्या " म्हणे; काय त्या खाऊ ? ५

माउची
चिऊ काउचि
कहाणी सांगें;
" मज आइकडे न्या " एक पाठिला लागे ! ६

काउचीं
गाउ वाउचीं
गाइलीं गाणीं
" मज आइकडे न्या " मनीं न दुसरें आणी ! ७

" किति लांब
मुला तें गांव,
जिथें गेलो तो ! "
" मज आइकडे न्या " गोष्ट एक पहिली तो ! ८

" वांकड्या
मध्यें टेकड्या
नद्या किति रानें ! "
घे ऐकुनि " आईकडे न्याच " परि गाणें ! ९

किति किती
योजिल्या रिती
तया रिझवाया !
" मज आइकडे न्या " दुसरें सारें वायां ! १०
भगवान
वांचती प्राण
कसे तरि त्याचे ?
जग सोडुनि जाती आइबाप हे ज्याचे ! ११

—इंदूर, ( १८ जून १९०७).

---

[ ५६ ]

## चिमणी !

[ चालः—भुलाबाईच्या गाण्यासारखी ]

[ १८९३ साली देवास येथें राजपुत्र खासेसाहेब यांना शिक्षक असतेवेळीं एके समयीं राजपुत्र व त्यांची लहानगी बहीण, दोघेंही ७ आणि ५ वयाचीं, आपल्या कोठीमध्यें पुढील मजेदार मौजेंत दंग होऊन गेलीं होतीं.]

चिवचिव चिमणी छतांत-छतांत,
आरसा लोंबे भिंतीला-भिंतीला,
चिमणी पाहे सवतीला-सवतीला,
भरभर आली रागांत-रागांत !
एकः—'चिउताइ चिउताइ ! काय बघतां-काय बघतां ?'
दुसरीः—'हच्च् हच्च्, चिउताइ काय करितां-काय करितां ?'
तिसरोः—'ती तर तुमची पडछाया-पडछाया'
चौथीः—'उगीच शिणतां कां वायां-कां वायां ?'
एकः— 'फुटेल कांच'
दुसरीः— 'तुटेल चोंच'

तिसरीः— 'पडेल खोंच
चोंचीला–चोंचीला'
चौथीः—' काय होइल सवतीला?–सवतीला?'
साऱ्याजणीः—' टाळ्या वाजवुं या चट्‌चट्‌!–या चट्‌चट्‌!
पाउलें फिरवुं या पट्‌पट्‌!–या पट्‌पट्‌!'
भुर्र चिमणी उडाली–उडाली!
छतांत जाउनि दडाली–दडाली!

—इंदूर, (१५ मे १९०७).

---

[ ५७ ]

# 'आतां गडि फू दादाशीं!'

( चालः–"कंकण न सुटे रामाला०" )

" तुझ्या गळां
माझ्या गळां
गुंफूं मोत्यांच्या माळा!"
" ताई! अणखी कोणाला!"
" चल रे दादा! चहाटळा!" १

" तुज कंठी
मज अंगठी!"
" अणखी गोफ कोणाला?"
" वेड लागलें दादाला!"
" मला कुणाचें?–ताईला!" २

" तुज पगडी
मज चिरडी!"

"अणखी शेला कोणाला ?"
"दादा ! सांगूं बाबांला ?"
"सांग तिकडल्या स्वारीला" ३

"खुसूं खुसूं
गालिं हंसूं
वर वर आपले रुसूं रुसूं !"
"चल निघ, येथें नको वसूं."
"घर तर माझें तसू तसू !" ४
"कशी कशी
आज अशी
गंमत ताईची खाशी !"
"आतां गडि फू दादाशीं!"
"तर मग गट्टी कोणाशीं ?" ५

—इंदूर, (२० जून १९०७).

---

[ ५८ ]

## शिशुवंचन !

( चालः—सुकुमार, असुनि तूं लहान० )

"जाउनी
तिला येथुनी
दिवस किति झाले !
बोलवा आइला दादा !" म्हणती बाळें !
किति सरळ
बोल हे विमल
मधुर वदनाचे !
कां विकल होय मग बाप ? काय या वांचे ?

ठेवुनी
झणीं लेखणी
कां मुलां पाही
हा अवचित दचकुनि? जणों डसे या कांहीं !
परि फिरुनि
तेंच आजुनी
बोकती बोल !
बोलवा आइला ! सुटे तयाचा तोल !
झडकरी
उठोनी धरी
उरीं बाळांला
वरिवरी चुंबितो, पिसें लागलें याला !
वरिवरी
घट्ट उरिं धरी
करें कुरवाळी
ते कुरळ कॅस ! कां मोह असा या काळीं ?
परि काय
तयाचें हाय
मुग्ध बालांस ?
पुनरपि तेंच ! हो काय करावें यांस ?
कोंवितो
उरीं धरत तो
उसासे अपुले
त्यां अंकीं घेउनि सकंप कंठें बोले !—
" कां म्हणुनि
आज हो फिरुनि
आठवण झाली
सोनुल्यांस माझ्या तिची अशी या काळीं ?

तिजाविणें
कांहिं का उणें
असे छबिल्यांस ?
मग खंत तिची कां अशी वरें तुम्हांस ?

न्हाणितों
जेवुं घालितों
करविं अंगाई
मग मीच तुमची आइ ! म्हणा मज आई."
" तिजाविणें
कशाचें उणें
पण तुम्ही दादा ! "
तीं म्हणतीं दादा, बाजु आपुली साधा !
" येईल
कधीं घेईल
अम्हांला आई ?
हा घेइल पापा ? देइ दुधाची साई ? "
किति मधुर
मधुर किति अधर !
मधुर ते बोल !
परि उरीं बोंचती सुरी पित्याच्या खोल !
तीं दोन
माउलीवीण
मुलें पाहोनी
भडभडेल हृदयीं असो दगड कां कोणी ?
मग बाप
कसा तो ताप
हे प्रभो ! साही ?
घनमोहतमीं बुद्धकळे, काय नवलाई ?

चुंबुनी
बळें हांसुनी
पिशापरि हास,
तो म्हणे " उद्यां येईल आइ हो खास. "
हे पूर्ण
उमटले जों न
शब्द बाहेर,
तों थरारलें घर आनंदें चहुंफेर !
ज्यापरी
झरा गिरिवरी
खदखदां खिदळे,
तो अहेतु सैरावैरां गोंदू उधळे !
ज्यापरी
सराच्या उरीं
थाटते लाट,
त्यापरी शांतिच्या वागण्याचा थाट !
येईल
उद्यां येईल
आपणा आई;
मग दिवस मजेचा खरा उद्यांचा ताई !
" मी अर्धी
देइनच जधीं
आइला पापा,
मग खुशाल दे तूं ! " अशा चालल्या गप्पा !
" किति किती
अतां गंमती
सांगु आईला ! "
यापरी चिमुकली शांति वदे भाऊला !

अज्ञान
मुलें तीं सान
अनृत त्यां कसलें ?
त्या मनोराज्य-सुखिं दंग जाहलीं अपुले !
अज्ञान
बापही कां न !
अरेरे देवा !
कां दिधला दुःखद बुद्धि-सुखाचा ठेवा ?

स्वप्नांत
राज्य-सौख्यांत
मग्न बहु असतां,
किति मरण वेर हो ! अवचित सर्प डसतां.

नाचती
मुलें साच तीं
सकल हा थाट,
पक्वान्न चितेवर शिजवुनि भरलें ताट !
तो उभा
फांकली प्रभा
उषेची सदनीं !
अंधार कोंदला उरिं पसरे तो वदनीं !
तीं स्वैर
मुलें चौफेर
गरगरां फिरतीं
गरगरां फिरे तो भोंवऱ्यांत जणुं सरितीं !
तीं फुलें
पाहिलीं मुलें
प्रमोदें फुललीं,
हा उभा अचंचल वृत्ति कुणिकडे झुकली ?

गतकाल
सकल तत्काल
वालसा जागे;
घन तमीं शुक्रसा प्रगटे, झळकूं लागे !
पातली
सती त्या स्थलीं
मनोमय युवती;
ती नभोज्योति लखलखे उषेची मूर्ति !

धांवोनि
मुलें उचलोनि
धरिल हातांनीं
तों 'आई आई' ये कोलाहल कानीं !

ज्या परी
सुखी केसरी
तरुतळीं निजला,
खडबडोनि धांवे शर अवचित जरि रुतला !

त्यापरी
स्वप्नसुंदरीं
सुखीं तो मग्न
असतांना, होई अवचित उर तें भग्न !

टाकितो
लांब लांब तो
पाउलें आतां,
घे अहेतु फेऱ्या; हाय पळाली कांता !

" ती उद्यां
तरी होउं द्या
अतां लवलाहीं "
आक्रोशुनि म्हणतीं बाळें " आई ! आई ! "

निर्झरी
गिरीच्या उदरीं
कोंडिली असतां
सळसळोनि उसळे स्थळ तिजला सांपडतां !

कोंविले
उगामिं दाविले
अश्रु आजोनी
खळखळोनि गळती बालवचन परिसोनी !

धुमसतो
अग्नि आंत तो
होय मग भडका
वरिवरी उसासे भरी, येउनी हुंदका !

धांवुनी
मुलें तत्क्षणीं
उरीं तो धरितो,
" ती अतांच गेली येउनि " त्यांना म्हणतो !

" अघनिधी
जाहले अधीं
करीं या घोट;
मी विपाक त्यांचा भोगावा हें नीट!

चिमुकलीं
मुलें सोनुलीं
विमल निष्पाप,
हे दीनदयाळा ! तयांस कां हा ताप ? "

—इंदूर, (२५ जुन १९०७).

[ ५९ ]

# मुषाफिर आम्ही !

( चालः—"चवचवडा झडतो०" )

" मुषाफिर आम्ही
आम्ही वनवासी !
कशास्तव भुललिस आम्हांसी ? "
उभी महालीं ती
ती रजपुत बाला
देशुनी बोले पांथालाः—
" तुमचि हो भरली
भरली मूर्ति मनीं
असा कां परदेशी कोणी !
हृदय हें दिधलें
दिधलें तुम्हांला
इतर जन बंधुबाप मजला ! "
" मुली ! कुलशीला
कुलशीला बघुनी
करावा पति तो युवतीनीं ! "
" महाकुल दिसतां
दिसतां रजपूत !
जाहलें भाग्य जरी अस्त ! "
" वनफळें खातों
आम्ही वनवासी
राहतों किंवा उपवासी ! "
" वनीं पक्वान्नें
पक्वान्नें करुनी
जशी तूं भोगिशि या भुवनीं ! "

" तुम्हांविण अन्न
अन्न जरी अमृत
विषाहुनि कडू इथें खचित !"
" वनीं कोठोनी
कोठोनि कुसुमशय्या ?
टाकितों दगडावर काया !"
" तुम्हांविण शय्या
शय्या कुसुमाची
रुते मज कांट्याहुनि साची !"
" भटकणें अमुच्या
अमुच्या या भाळीं
वणवण करुं रानोमाळीं !"
" तुम्हांविण भुवन
भुवन मनोहर हें
वनाहुनि भयंकरचि आहे !"
" कोठली आई
आई दादा ते ?
राहतों वनपशुंसह तेथें !"
" तुम्हांविण आई
आइबाप असुनी
वाटतें शून्य मला सदनीं !"
" जिवाला धोका
धोका रानांत !
नीट हें आणि ध्यानांत !"
" तुम्हांविण जगणें
जगणें मृत्युच कीं
तयाहुनि दुःसह या लोकीं !"

" कशाचें आम्हां
आम्हां घरदार !
कशाचा अमुचा संसार !"
× × ×
चालला वारू
वारू तेथोनी
धांवली अबला मागोनी !

---

[ ६० ]

## मातृभूमीप्रत !

( वृत्त:—शार्दूलविक्रीडित )

जन्मा येउनियां कुशीं तव तुझ्या स्कंधीं उरीं वाढुनी,
प्रेमाचा नच गोड शब्द वदलों केव्हां तुला आजुनी;
नाहीं एक विचार ही अजुनियां त्वत्सेवनीं योजिला,
ऐशाला म्हणशील काय मजला तूं सांग गे आपुला ? १
जे त्वत्पुत्र उदारधी झिजविती काया तुझ्या सेवनीं
जाळाया निज पोट ही शिणविली वाणी तया निंदुनी;
व्हावा तोष धन्यास यास्तव सदा मी हांसलों त्याजला;
आतां तूं कुरवाळशील वद का ऐशा कुपुत्रा मला ? २
' खोटी ही, दुबळी, गुलाम, भरला वृद्धापकाळीं चळ,'
ऐसा दोष दिला तुला वश परां होवोनियां केवळ;
आतां हें स्मरतां मना, हळहळे तें, गे गळा दाटला;
डोळे तूं पुसशील काय पदरें घेवोनि अंकीं मला ? ३
जें त्वां जीवन हें दिलें सकळ ही सत्ता तुझी ज्यावरी,
जातां तें परसेवनीं न तिळही संकोचलों अंतरीं !
' धिक् धिक् जीवन हें ' असें मन अतां धिक्कारितें गे मला,
त्यातें तूं भरिशील काय हृदयीं पान्हा फुटोनी तुला ? ४

आहाहा ! सुत ते असिव्रत जयां त्वत्सेवनीं पाळतां
धैर्याचे गिरि ते कधीं न डगले आकाशही फाटतां !
नेतां त्यांस दिगंतरास फुटला,आई! उमाळा तुला !
डोळे तूं पुसशील का निज, यमें नर्कास नेतां मला?

---

[ ६१ ]

# एक चित्र.

( वृत्तः—"शार्दूलविक्रीडित" )

काळे भोर विशाळ केश रुळली ज्यांच्या नितंबावरी;
तैसें भाल विशाळ गौर झळके चंद्रापरी तें तिचें;
ते डोळे !-नच हे !-विलासगृह कीं माहेर चिच्छक्तिचें;
किंवा काव्यलतेवरी उमललीं हीं दोन पुष्पें तरी !

ही ही केवल का वसंतऋतुची येई नटोनी खरी !
किंवा मूर्तिमती प्रभात उमले ! कीं फांकली पौर्णिमा
प्रीति ज्योतिच काय ही उजळली ! कीं शारदा कीं रमा !
वाटे ही रचितां विहार कविता चित्तीं विधीच्या करी !

काळा लावुनि तूं तुझी कलम या रूपास याऊपरी
रेखामात्र उणें अधीक करुनी नाशूं नको पूर्णता !
गालीं त्या खुलती छटा चिनळतां साश्चर्य त्या पाहतां
वाटे सांठवलें कळे न किति तें सौंदर्य या अंतरीं !

पाषाणी स्मृति राहिली जर नरा पाहूनि ही सुंदरी
धिक्धिक् ! त्या कळली अगाध हरिची नाहींच कारागिरी !

---

गुदरखेडा, फेब्रुवारी (१९१०)

[ ६३ ]

# गतकाळ

## (१)

( चाल: —"चंद्रकांत राजाची०" )

मध्यरात्रिच्या निवांतसमयीं रे माझ्या हृदया,
गतघटिकांतुनि किती भटकशिल सांग अतां सखया !
गतकाळाचें स्मशान यापरि जागवितां घटिका
भुतें जागतिल, मुखें वासतिल, खेळ परी लटिका !
निज निधनीं निधनातें नेलीं आशांसह रत्नें
वदनीं त्यांच्या दिसोत: मिळतिल काय अशा यत्नें ?
सस्मित वदनें, धवल दंतही, कुरळ केश भालीं,
मधुर, मनोरम नयन, विकसली गालांवर लाली;
प्राणाहुनिही प्रिय हीं रत्नें मृतघटिकावदनीं
दिसतिल तुजला; गोष्ट खरी; परि मिळतिल का वळुनी ?
किंबहुना तें हंसणें, रुसणें, गोडहि ते बोल
नयनीं दिसतिल, श्रवणीं येतिल, सर्व परी फोल !
ऐंद्रजालिकें पेढे केले, मुष्टिं होती माती,
मृतघटिवदनीं तैसीं रत्नें दुःखाचि ये हातीं.
मेल्या गेल्या आशा पडल्या भस्माच्या राशी
त्यांवरि घिरट्या घालुनि ये का कांहीं हाताशीं ?
मनोराज्यसम दृश्य मधुर हें परी भासमान,
परिणामीं हें कासावीसचि करिल तुझा प्राण !
सोडसोड रे नाद तयाचा वास्तव तूं सखया
बघूं नको माघारा पाहीं आगामी सखया

कालाच्या गर्भांत असति ज्या अज्ञात घटि अजुनी
त्यांकडे वघ सखे अतां तूं आशाळू नयनीं
मृतघटिकांहा नेलें तें त्या आणुनि देतिल त्या
हताश होऊं नको फसुनियां नादा तूं भलत्या !

[ ६३ ]

# गतकाल !

## (२)

—:०:—

( वृत्त-शार्दूलविक्रीडित. )

रात्रीं शांत निवांत विश्व वश हें निद्रेस झाल्यावरी,
निद्रा घालिल झांप ये मजवरी तींतें दुरी सारुनी,
कालाचा पडदा वरी उचलुनी गाढांधकारांतुनी
पर्यंकाभंवतीं मुखें प्रकटती निःशब्द जादूपरी !

त्यांतील एक म्हणे, दुजें प्रिय सख्या. बाळा तिजें, त्यापरी
प्रेमें बोलविती मला रिझवुनी तीं मूक संबोधनीं:
पर्यंकावरुनी मला उचलुनी गाढांधकारांतुनी.
मंत्रें मोहुनि पाडुनी भुरळ तीं नेती क्षणार्धीं दुरी:

विश्वांतें गिळतां तमें, उजळती जी ज्योति ती अंतरीं
तेणें विस्मृति अंधकार जळतां, शांत प्रभा फांकुनी.
जी रम्या गतसृष्टि दृष्टिपथिं ये तीमाजि संचारुनी,
मीं माझ्या मृतसंस्मृतींत मिसळें एका क्षणाभीतरीं !

आहाहा ! गतसृष्टि सोडुनि जरी सृष्टींत या येउनी
देवा तीं गुज सांगतील निज का केव्हां मला भेटुनी !

---

[ ६४ ]

# पन्नास वर्षांनंतर

[ एका गृहस्थाचें मन एका स्त्रीवर बसलें. पण तिनें त्याला झिडकारिलें; त्यावरून तो विदेशीं निघून गेला. पन्नासवर्षांनंतर परत येतो तों तिचीच नात गांवाच्या वेशीशीं दत्त उभी ! ]

( चाल:—मुद्रिके राम टाकून आलिस )

तूं हुबेहुब साउली त्याच मूर्तिची—
हरपली दिवंगत झाली आकृती साउली जिची !
भटकतां विदेशीं दीन होन जी मुली
कचिकधीं मनोमय ऐशा स्वप्नभूमधें भेटली !
संपला दिवस गे अतां सांज जाहली;
कचि घोर रात्र ये ऐशी हुरहूर जया लागली
कां चित्र उभेंच मुली तया दाविसी ?
जी जन्मभरी रचिली गे ती घडी अंति मोडिसी !
तें विकासितकमलापरी बिंब तो प्रभा—
सौवर्णशरांसम हा हा ! ते किरण झोंवती नभा !
ते हरित पल्लवीं गान अश्रु भूवरी
उचंबळोनि नयनवेलींचें आंदोलन !—हा आवरी !
आवरी आवरी मुली जाय निर्दये !
जाईल जीव हा माझा पाहतां चित्र तें वये !
लाविलें दार जखडोनि ! कुलुप घातलें !
तें वाद्य उघडुनी हा हा ! कळ फिरवूं मन धांवलें.
तें गान ऐकतां भान न उरलें, मुली
जा पुरे करी तव माया हा हाय ! हद्द जाहली !
च्छळ भरला ह्मणशिल मला खरें तें मुली !
विसरोनि मला मी गेलों पाहुनि तुला या स्थलीं

बालार्क-किरण हे तुला न्हाउं घालती
ह्या संध्या-भेसुर छाया चहुंकडे मला घेरिती;
चढणीवर पाउल तुझें उतरणीवरी
भरभरा पाउलें माझीं पडतात सांवरी नरी !
मंडोळ्या तुज प्रीतिच्या शोभती: परी
वांकलों मृताशाभारें वाहुनि त्या पाठीवरी !
आपरी कोण तूं कोण मीहि आठवे
जें मेलें गेलें त्याचें भूत गे कशाला हवें !
जा जाय इथोनी सुखें मरूं दे मला
ह्या लीला त्यासनव राखी जो प्रीतिमदें झिंगला !
परि दया करी त्यावरी जया भेदसी
नच हत्या करि कवणाची वध दशा होय मम कशी !
तूं नात जिची गे पणत् होउन तिला
रडणार कोण मजसाठीं ? नशिवास नर्क ठेविला !

गुदरखेडा मार्च १९१०

---

[ ६५ ]

## वंचित जीव !

( राग —पूर्वी )

नादीं लागुनि तुझ्या नटक्या ! जारिण मी ठरलें—
—नाटक्या ! जारिण मी ठरलें ॥ ध्रु० ॥
इहपरलोकां आंचवलें रे, तोंडघशीं पडलें ! गारुड्या
तोंडघशीं पडलें !
सोंगाला भाळलें तुझ्या रे नेणुनि रूप खरें—
नाटक्या ! नेणुनि रूप खरें,
भोळि भुरळलें छायेला रे, फसलें प्रेमभरें—
गारुड्या फसलें प्रेमभरें !

सासु, सासरे नणदा जावा,
परोपरीनें धरिती दावा,
तुझाहि अजुनी न कुठे ठावा !
न हें न तें घडलें ! नाटक्या—
नादीं लागुनि तुझ्या चेटक्या ! जारिण मी ठरलें !
—नाटक्या जारिण मी ठरलें? ! १

कधिं चंद्राच्या मिषें घालसी डोळा मजवरती !
नाटक्या ! डोळा मजवरतीं !
कधिं ताऱ्यांच्या मिषें घालसी कटाक्ष तीव्र अती !
नाटक्या ! कटाक्ष तीव्र अती !
रागावुनि कधिं प्रेमकलहिं रे सूर्यमिषें वधसी—
नाटक्या ! प्रेमकलहिं वधसी !
लाल शाल घालोनि कधिंकधीं उषामिषें हंससी !
नाटक्या ! उषामिषें हंससी !
करणी करुनी यापरि हरिलें
मन माझें; तें बहु चाळविलें !
खरें रूप परि कधिं न दाविलें !
कपटचि आचरिलें !—नाटक्या—
नादीं लागुनि तुझ्या चेटक्या ! जारिण मी ठरलें !
नाटक्या जारिण मी ठरलें ! २

कामातुर मी सैरावैरा दाहि दिशा फिरतें—
नाटक्या ! दाहिदिशा फिरतें
पाठ पुरविती भुतें तुझीं रे ! तुजला अंतरतें—
नाटक्या ! तुजला अंतरतें
या दारीं त्या दारिं पाहिलें कोठें दडलासी ?
नाटक्या कोठें दडलासी ?
इथें ढुंकितें, तिथें ढुंकितें, अजुनि न कां दिससी ?
नाटक्या ! अजुनि न कां दिससी ?

लाज सोडली, भीड मोडली !
परोपरी बोलणीं साहिलीं !
वणवण करितां कुडी भागली !
मन हें वावरलें ! गारुड्या !
नादीं लागुनि तुझ्या चेटक्या । जारिण मी ठरलें
नाटक्या ! जारिण मी ठरलें ३
यापरि आतां किती गांजशिल ? करिशिल किति चाळे ?
गारुड्या—करिशिल किति चाळे ?
पुरे सोंग हें ! पुरे खेळ हे ! मन रे कंटाळे—
गारुड्या मन हें कंटाळे !
सत्व पाहणें पुरे: परीक्षा पुरे अतां सखया—
गारुड्या—पुरे आतां सखया !
पाटाचा सोहळा लाभुं दे आतां ये सदया !
गारुड्या ! अतां ये सदया !
नाक घांसतें, पदर पसरतें, !
निजरूपीं ये किति आळवितें !
नातरि देइन प्राणाचि परते !
काय जगीं उरलें ?—गारुड्या
नादीं लागुनि तुझ्या चेटक्या ! जारिण मी ठरलें !
नाटक्या जारिण मी ठरलें ! ४

---

[ ६६ ]

## विधवेचा आत्मयज्ञ !

( चाल:—चंद्रकांत रायाची )

कधीं भेटतां एकांतीं तीं नाहिं कुणा दिसलीं:
कधीं बोलतां परस्परांशीं नाहीं पाहियलीं:

दृष्टादृष्टहि परस्परांची जरी कधीं झाली,
कधीं न लवलें पातें न कधीं छटा दिसे गालीं:
कधीं निमंत्रित भोजनास तो घरीं जरी आला,
हर्ष विषाद न कधीं तिच्या तो शिवला चित्ताला:
गौर मनोरम रूप तयाचें लाजावें मदनें
मोहित सारे, परि न बघे ती एकवार नयनें:
तो दोघांच्या कलवाळू जें भरोनियां डोळे
" या विधवांवरि दया करा हो " कळवळुनी बोले
कानोसा घेतांना भासे एक दिवस बसला
परि पाहुनि मज शांतपणें तो निघोनियां गेला !
कंपित हस्तें लेख लिहित तो नाहीं कधिं दिसला,
बोलि अवेळीं वळचणीतुनी नाहिं पुढें पडला:
तरी सकाळीं एक दिवस मज तीच्या अंगुलिला
डाग दिसे शाईचा: कागद तुकडे झालेला !
त्याच अंगुलीवरी परि दिसे फोडहि झालेला
कधीं पोळलें बोट कशानें ठाउक देवाला !
अंथरुणावरि कधिं रात्रीं नच दिसली बसलेली
तरी कधिंकधीं उशी तियेची दिसली भिजलेली
कोंदण हरपे दोन हिरकणी कोंपऱ्यांत लोळे
असें वाटलें मज दुगडा कधिं बघुनि तिचे डोळे !
ती चंद्राची कोर जिला हो लाजावें रतिनें
कळाहीन लागली दिसाया हाय कालगतिनें
हळू हळू तो गळूं लागली गाल खोल गेले,
ज्वरें जीर्ण त्या कोमल हृदयीं ठाणें वसवीलें
किती वेळ तो समाचारही घ्यायाला आला
नयनीं त्याच्या काळजिचा कधिं भास मला झाला
डाक्तर झाले, हकीम झाले वैद्यहि ते झाले,
निदान होइ न कुणाकुणाची मात्रा नच चाले

'दीनदयाळा मरणा, सोडिव' जपोनि जप हाय !
कारुण्याची मूर्ति मावळे थिजला तो काय !
अकस्मात त्या क्षणापासुनी अदृश्य तो झाला,
कोठें गेला काय जाहलें ठाउक देवाला !

[ ६७ ]

# आत्मयज्ञ !

( वृत्तः—शार्दूलविक्रीडित )

प्रेमोत्कर्षे मनें परस्पर जगीं आकर्षितो भूवरी,
तेव्हां काय घडे महाकविसही तें ये कसें सांगतां ?
जन्मा प्रेमिजनांचियाच वचणें जाऊनियां तें स्वतां
वंध्येला प्रसवांचिया वद कळा कैशा कळाव्या तरी ?
माळा व्याकुळ ही गळ्यांतिल करी, होई पळांचें युग,
सांगूं काय अफाट ये जरि नदी दोघांमधें आडवी !
उत्कंठा ढकली पदोपदिं पुढें. प्रीती उडी घालवी.
ओढोनी जणुं का लगाम फिरवी भीती तयांना मग !
आशा, प्रीति फळा न येउनि जगीं मृत्यूच नेई त्यां.
हा हा हा ! मग काय दुर्गति घडे, योगें उरे त्या उरीं
होवोनी भडका हलाहलचि रे, सांगूं कसें तें तरी ?
देवा रे ! जगतांत शांतविल का दाहास कांहींहि या ?
साऱ्या रौरवयातना पुरविती ! दुःसह्य ही दुर्गती !
वैऱ्यालाहि न दे हरा ! कुणि तरी पाडील का विस्मृती !

प्रतापगड, ता.-(२१ फेब्रुवारी १९१०).

* * * *

कोठें शांति ! तुझा निवास? वससी तूं प्रीति ! कोठें? सुखा
कोठें मंगल धाम रे तव? धरा? कीं स्वर्ग? पाताल कीं?
लोकीं अन्य निवास, का पडतसे छायाच येथें निकी?
ताऱ्यांचा पडतो प्रकाश धरणीभागीं तसें हेंहि का?
विद्युद्दीप, हिरे, विमान, अथवा तारा, सिनेमांतरीं,
किंवा कांचनकामिनींत वसतां? तारुण्यबाल्यांत कीं?
देव्हाऱ्यांत मनाचिया पहुडलां गंभीर निद्रासुखीं?
धुंडूं मी कवणें स्थळीं? कुणि सखा दावील का हो तरी?
किंवा केवळ अर्थशून्य असती हे शब्दची पोकळ?
जैसें सुंदर नील हें नभ दिसे अस्तित्व नाहीं परी.
शोधूं जा तरि दूर दूर पळती हे चक्रवालापरी?
किंवा हो मृगतृष्णिका फसविते भोळया जनां केवळ?
चाले नित्य अकांडतांडव इथें शोधार्थ यांच्या फुका!
देवा! तूं निजलास का? तुज दयामाया मुळीं नाहिं कां?

* * * * *

नितांत झाली शांत निशा ही! गगनाच्या प्रांतीं
गिरिशिखरीं, तरुशिरीं, धरेवरि पसरे ही शांती!
चांदीची चंद्राची नौका क्षीरसागरांत
मूक कशी चालली न करितां सळसळ बघ शांत!
प्राणायामपरायण वायू एकांतीं बसला
मौन धरुनि मुनि निसर्ग, सखया, समाधींत थिजला.
दाहि दिशा ह्या उज्वल सखया न्हाउनि माखोनी
ध्यानीं रतल्या शुभ्र पातळें पवित्र लेवोनी!
सोनेरी हें पानहि गळतां खळबळ सहवेना:
कांटा येई शरिरिं शांतिचा छळ हा बघवेना.
केवळ माझ्या हृदयाचे हे ठोके टिकटिकती,
तेच मात्र कानावर येती, भंगति शांति किती!
मीच पिशाच्यापरि तुझ्यासह सखया रे जागें
नीज शिवेना मज पाप्याला! तळमळ मज लागे

शांत पर्वि या काय पहाया हवा चमत्कार ?
*माझ्या मार्गं येइं; शांतिचें पाही माहेर !*
गिरिमुख बोले, तरुगण हाले, थिजति शिला जागीं !
मुळुमुळु रडती ओहळ परिसुनि त्या काननभागीं.
आवर वस्त्रें, सळसळ् न दे, पाउल वाजोना;
चाल हळुहळू, पानें वाजुनि शांती लाजोना.
मला वचन दे, अर्धी शपथ घे उगा न हलशील;
शद्व कशाचा श्वासहि अपुला ऐकुनि धरशील.
भिंत चालली, रेडा बोले वेद, चमत्कार
तुला वाटती असत्य तरि ये जपुनी परी फार !"
हात ठेवुनि हातीं माझ्या शपथ हि गंभीर
घेउनि बोले सखा, " चळ कधीं ढळे न मम धीर. "
गिरिच्या पश्चिम भागीं जेथें झाडी घनदाट
पाउलही ठेवणें न सोपें अशी विकट वाट.
चंद्राचे कवडसे पडोनी वाट दिसे न दिसे,
असे चालतां जपुनि जपुनि तें स्थळ अंतीं गवसे !
विहिर निमुळती जणूं काय ती गुहा तिथें खोल
बसलों जाउनि गिरिमुख तें मग बोले हे बोलः—
" अनुदिनि अनुतापें तापलों रामराया !
परम दिनदयाळा ! नीरसी मोहमाया
अचपळ मन माझें नावरे आवरीतां
तुजविण शिण होतो धांव रे धांव आतां "
त्रिविध ताप तापवी दयाळा भाजुनि मी गेलों
शांत होइना दाह म्हणोनी शरण तुला आलों
पलीकडे त्या पुरस्मशानीं हाय ! काय चाले !
भुतें घालती पिंगा त्यानें धरणीही हाले !
मायेनें मारितो त्या स्थळीं भाऊ बहिणीला !
बाप कापतो गळा मुलीचा, गिळी स्वमांसाला !

लेकसुनांला शास्त्रें छळिती अपुल्या ज्ञानानें
अज्ञानाला ज्ञान मानती जणों सुरापानें !
मायबहिणिच्या कर्कश ऐशा आक्रोशा राना !
श्रवण-मनोरम गान मानुनी करिती आरामा !
न्याय करी अन्याय आचरी नीति अनीतीला !
प्रीति भीति घे प्रियविषयाची भिऊनि रीतीला
सुखास भाळुनि ते आंवळती उरास दुःखाला !
एक दुजाशीं वैर लाविती शांति मिळायाला !
सत्व सोडुनी माति सजविती सदा अलंकारें !
स्वरूप सोडुनि रूपा भलत्या भाळति ते सारे !
अखंड चाले उदंड यापरि नाच पिशाच्यांचा
घातपात तो कसा कळेना तिथें तयां त्यांचा.
उलटीं त्यांचीं खरीं पाउलें, उलटी ही चाल;
उलटें काळिज, उलटें सारें, घेति करुनि हाल.
चुकुनि दयाळा सुखार्थ त्यांतच जाउनि मी शिरलों,
हाय जळालों ! हाय पोळलों ! सुखास अंतरलों. "
क्षणार्ध पावे विराम ह्यापरि गिरिमुख बोलुनियां;
द्विगुणित वाणे शांति श्वासहि येई श्रवणीं या !
कळवळला मम सखा, लोटला अश्रूंचा पूर;
क्षणोक्षणीं मज वाटे फोडिल किंकाळी थोर—
जी किंकाळी क्षणीं दुभंगुनि शांती, निमिषांत
पुण्यात्म्याचें चिंतन भंगुनि करील कीं घात.
क्षणोक्षणीं मज वाटे आतां पळतचि जाईल,
'नष्ट सखा सांपडला' नगरीं डंका पिटवील.
वचनबद्ध तो स्थळगांभीर्यें, परी स्थळा खिळला;
कंठ निरोधुनि अढळ बसे जरि धैर्यगिरी ढळला.
एकवार तें फिरोनि गिरिमुख लागे बोलायाः—
" प्रभो ! अनन्ता ! दयासागरा ! जगदात्म्या ! राया !

तव सहवासीं शांति खरी, सुख खरें, खरी प्रीती,
म्हणुनि चरण मी धरिले, आलों शरण विविध रीती
तुजसंगें मी करीन हितगुज, तुजशीं गाऱ्हाणें
लोळण चरणीं तुझ्या, तुझ्याविण जिणें दीनवाणें !
बळकट धरिली कास तुझी, हरि, आतां करितील
षड्रिपु माझें काय ? यमाचे पाशहि तुटतील !
धना ! मनाला आतां माझ्या करिशिल तूं काय ?
वळवळ खळवळ तुझी संपली, खरें हायहाय !
तरुवर देतिल फळें मुळें, रे ओहळ जळ मजला !
दिशा पांघरुण, उशा आंथरुण मला शिला मृदुला !
कामा ! गाजव शौर्य तुझें जा भूतांवरि, जाण;
प्रीतिमदें झिंगले तयांवर सोड कुसुमबाण !
लोभा ! आतां खुशाल जागव अमल धरेवर जा,
क्रोधा ! क्षोभव दुर्बलांस जा, तुज येथोन रजा !
फुलांवरुनियां फुलांवरि झुके फुलपांखरुं जेवीं,
प्रीति ! तूंहि जा, नाच सुखानें नगरांतुनि तेवीं.
मोहा ! मोहिव मोहिनिरूपें विष्णुस जाऊन !
शिवास शिव जा नाचव त्याला भिल्लिण होऊन !
मदा तुझा उन्माद काय रे मायेवांचून ?
जा जा आणी रावण कोणी पाहीं शोधून !
अरे मत्सरा ! विजनगव्हरीं काय तुझें काम ?
क्षण न उभा राहीं रे येथें वघतो श्रीराम !
काय अतां कुमत्वाशीं नातें ? सरला संबंध !
बळिया माझा पाठीराखा केवळ आनंद.
मरणाला आणीन मरण मी ! मरेल ब्रह्मांड !
उरेल माझा मोक्ष ! निरसतां सारें थोतांड !”

× × × ×

गिरि-मुख विरमे, तरुगणहि गमे ध्रुवपद हें गाई:—
‘मरणाला आणीन मरून मरण मी’ ! गाति दिशा दाही ! !

प्रतापगड (४–३–२०).

[ ६८ ]

# हंसदूत.

( चालः —मी कुमार तूंहि कुमारी असतांना )

रे मानसहंसा माझ्या, उड्डाण तुझें अनिवार !
वायूहुनि तेजाहुनिही गति तुझी तरल ती फार !
त्रैलोक्यीं गमन तुझें रे, कोठें न तुला अटकाव;
रविकिरण न शिरती जेथें तेथेंहि तुझी रे धांव !
क्षणि नभीं, क्षणीं पातालीं,
दशदिशांत एके कालीं,
कधिं शांति न ठावी झाली !
घेईल वीजही हार !
रे मानसहंसा माझ्या, उड्डाण तुझें अनिवार ! १

सामर्थ्य अतर्क्यचि तूझें, माहिम्यास तुझ्या नच पार
सुख व्हावें मजला म्हणुनी विश्वांत तुझा संचार !
आणिसी सुरासुर सकलां करुनियां तयां बेजार.
विश्रांति न माझ्या कामीं, मजवरी किती उपकार !
सूर्यही चितारी केला !
केलंस फरास विजेला !
सारथी रथीं अग्नीला !
परि यांत कायरे सार ?
रे मानसहंसा माझ्या, उड्डाण तुझें अनिवार २

घालिसी हमामा कां रे ? विश्वांत कुठें सुखलेश ?
पतिवांण पसारा सारा हा फुका ! करिसि कां क्लेश ?
कारागृहिं कल्पलताही लावितां सुखाशा वाया !
बाजार मांडिला का रे ? निर्जीव भुतें हीं छाया !

प्रियसखा जिव्हाळा माझा
विश्वाचा साऱ्या राजा !
अंतरलें त्या पतिराजा !
त्यावीण काय संसार !
रे मानसहंसा माझ्या, उड्डाण तुझें अनिवार ! ३

कालाच्या तीरावरुनी, मरणाच्या वेशीहून,
घेउनी भरारी हंसा अज्ञातीं जाय शिरून !
प्रियसखा पहा जा माझा प्राणाचा माझ्या प्राण;
तरि दूत खरा तूं हंसा, तरि खरें तुझें उड्डाण !
जा निरोप त्याला सांग, जन्माची सांग कहाणीः—
" विरहानल जाळी सखया, वार्ताहि न कोणी आणी—
" मी राणी या विश्वाची,
" जाहलें भिकारिण साची !
" विपरीत गती कर्माची !
विपरीत कसा व्यवहार ! "
रे मानसहंसा माझ्या, उड्डाण तुझें अनिवार ! ४

" दिन गेले, वर्षें गेलीं, लोटलीं युगेंही नाथा !
तळमळें वियोगीं सखया, पाहसी अंत किति आतां
विसरसी कसा दासीला, अपराध काय तरि झाला ?
कोणास शरण मी जाऊं ? कथुं दुःख तरी कोणाला ?
प्रार्थितें हात जोडोनी,
बहुवार पदर पसरोनी,
शांतवीं अतां भेटोनी !
तुजवीण कोण आधार ? "
रे मानसहंसा माझ्या, उड्डाण तुझें अनिवार ! ५

( ६९ )

# जीव-संयोग !

( रागः—कालिंगडा. )

जन खुळे म्हणति तर अपण खुळे !
त्यांचें अपुलें कधिं न जुळे !
त्यांचा अपुला मार्ग निराळा;
दिक्कालाचा त्यानां आळा;
प्रणयी आठवि का दिक्काला ?
पाळ आपुली खिरे पळें !
जन खुळे म्हणति तर अपण खुळे ! १
हपापले जन वस्त्राभरणा;
विटलों मधल्या शरिरावरणा;
वस्त्रें, सुंदरि ! काय आपणा ?
दो जीवांतिल पटचि गळे !
जन खुळे म्हणति तर अपण खुळे ! २
जिवा जिवांतिल भान सुखाचें
आड सुखा त्यांच्या येण्याचें;
तेंच हरपलें अपुलें साचें !
पार सुखास न त्याचमुळें !
जन खुळे म्हणति तर अपण खुळे ! ३
कमल-दल-स्थित जलबिंदू गे,
दल हललें जुळले ते दोघे !
माझ्या तुझिया ह्या संयोगें
आकृतिचा गे बांध गळे !
जन खुळे म्हणति तर अपण खुळे ! ४

प्रतापगढ, ( २९-८-२० ).

[ ७० ]

# प्रणय-प्रभा !

( रागः—असावरी. )

तव नयनिं उजळले बाल-रवी !
फुले हृदयिं मम उषश्छवी ! ॥ध्रु०॥
हृत्क्षितिजीं मम कनकमनोरम
राग उसळला उधळुनि कुंकुम !
तिळभर न उरे कोठेंही तम !
न्हाले बाग सखे ! विभवीं !
तव नयनिं उजळले बालरवी ! १
पिशाच, जैसें धुकें, वितळलें !
चोर पळाले, घूक दडाले !
सज्जन निज सत्कामिं गुंतले !
पक्षिवंदिगण तुला स्तवी !
तव नयनिं उजळले बाल-रवी ! २
गूढ, गहन हृद्भाग झळकती,
प्रगटति रत्नें तळिं दडलीं तीं !
राज्य तुझें या मुलुखावरतीं !
घेइं सुखें जी वस्तु हवी !
तव नयनिं उजळले बालरवी ! ३
तुझें प्रिये ! साम्राज्य याचपरि
हृदयाच्या माझ्या मुलुखावरि
यावज्जीव टिको दृढ सुंदरि !
हेंच हरीला मी विनवीं !
तव नयनिं उजळले बालरवी ! ४

प्रतापगढ, ( १-९-२० ).

ठाणे

# जीवन-संगीत

( रागः—भैरवी )

संसार सतारीवरि तारा
तूं मीहि, मदन वाजविणारा ॥ ध्रु० ॥

कलानिधी तो फिरवी चंचल
मधुरारक्त अंगुली कोमल
अर्पुनि सारें ही कौशल-बल !
वर्षती स्वर-सुधेच्या धारा !
संसार-सतारीवरि तारा ! १

लीलालोलुप तो रतिरंगीं
धुंद मद्यपी, तरल तरंगीं
प्रथम सखा घुमवी सुरसंगीं
नाचवी मूर्त तो श्रृंगारा !
संसार सतारीवरि तारा ! २

मधुर गुलाबी राग थरथरे !
अकाल ये जणुं उषा मदभरें !
वायू निज चांचल्या विसरे !
प्राण विसरला निजकारा !
संसार सतारीवरि तारा ! ३

स्वर्ग सुरांसह वर थरथरला !
जड शशि ज्योत्स्नारूपीं द्रवला
पुलकित धरणिस बहर उसळला
चालतां थबकल्या नभिं तारा
संसार सतारीवरि तारा ! ४

अपूर्व सुर-संमेलन रचिलें !
स्वर कल्लोळीं दृश्य बुडालें !
कोण पुसे, जिवलगे प्रेमले !
लांकडीच यंत्रा संसारा !
संसार सतारीवरि तारा ! ५

प्रतापगड, ( ७-९-२० ).

---

[ ७२ ]

## प्रभु तुज कवणेंपरि ध्याऊं !

( रागः—परज )

प्रभु तुज कवणेंपरि ध्याऊं- ॥ ध्रु० ॥
नामातीता तुजला स्वामी ?
संबोधूं मी कवण्या नामीं ?
किति असलों जरि सेवाकामी
केंवि तुला सेवूं । प्रभुजी कवणेंपरि ध्याऊं १

चिद्घन तूं, ही जड मम वाणी;
सुख तूं, ही दुःखाची खाणी;
अनंत तूं, हीं सांतचि गाणीं
कैसीं तव गाऊं । प्रभु तुज कवणेंपरि ध्याऊं २

रूपातीता रूपमूढजन,
गुणातिरिक्ता गुणग्रस्तमन,
केंवि अचिंत्या ध्याइल चिंतुन,
कैसा तुज लाहूं । प्रभुजी कवणेंपरि ध्याऊं ३

अपार तूझें अगम्य वैभव,
हीन दीन मी मायासंभव,
कसे आळवूं, नाथ! चरण तव,
तेज कसें साहूं । प्रभुजी कवणेंपरि ध्याऊं ४
नामरूपाचा दृश्य पसारा
अवाढव्य हा अपार सारा!
बावरलों किति सैरावैरा
मृगापरी धावूं । प्रभु तुज कवणेंपरि ध्याऊं ५
घनतिमिरीं मी बालक तान्हें
प्रकाशार्थ अति केविलवाणें
हात नाचवीं, टाहो जाणें,
केंवि हृदय दावूं । प्रभुजी कवणेंपरि ध्याऊं? ६
माउलिला तुजला प्रभुराया
चुकलों, लागे आर्त रडाया,
लावशील का कधीं उरा या
कोठें तुज पाहूं । प्रभुजी कवणेंपरि ध्याऊं ७

प्रतापगड १५।३।१८

---

[ ७३ ]

## ॐ तत्सत्

ससर्ज यो विश्वमनंतमेतत् व्याप्यानिलं वारि भुवं स्थितो यः
ज्ञेयो न जानाति तथापि सर्वं ध्येयः स एकः प्रभुरद्वितीयः
सुरः सुराणां च गुरुर्गुरूणां प्रभुः प्रभूणां जगतां विधाता
छाया जगद्यस्य विभाति सर्वमवेहि पूज्यं तमनन्यमेकम्
शक्यो वर्णयितुं कथं यदि यतो वाणी स्थिता कुंठिता
सादृश्यं न च येन घोषति तथा वेदोऽस्ति कुत्रोपमा?
जिज्ञासा यदि तस्य ते स्ववहितो भूत्वा मनो धारय
मुक्तः सन् भवसंभ्रमादवितथं ज्ञानं परं लप्स्यसे

[ ७४ ]

# समर्पण.

( राग:—मालकंस. )

अनंता ! तुझे गोल, तारे तुझे !
तुझें रूप ब्रह्मांड ! सारें तुझें !
तुझी ही कृती रे मनोमोहना !
अहोरात्र गाई तुझ्या गायना !
तया मूक गानें मना मोहिलें,
जगन्नायका ! वेड कीं लाविलें !
नुरे भान, मी स्वाधिकारा भुलें,
भरूं लागलों सूर वेडे खुळे !
मदोन्मत्त, त्वद्रूप गाऊं धजें,
स्वयंदीपका दीप दावूं सजें !
न ध्यावा जिथें पाय तेथें दिला,
बहु लाजलों भान येतां मला !
तुझे लाडके रे, तुझे लाल जे
तयांची करायास स्पर्धा धजें !
करानी दया, रे दयासागरा !
क्षमस्व प्रभो ! या तुझ्या लेंकरा !
अहो भाग्य माझें जरी या सुरीं,
सहस्रांश त्या गीतिची माधुरी !
तरी हें त्वदंघ्रीं समर्पी, हरी !
रुचो हें तुला स्तोत्र घे आवरी !

प्रतापगड,—(८—२—२०).

# गारुडी.

[हें छोटेखानी काव्य प्रख्यात आंग्ल कवि रॉबर्ट ब्राउनिंग याच्या 'पाइड पायपर' चें रूपांतर आहे. हें प्रथम श्रीमंत खासेसाहेब महाराज पवार, संस्थान देवास यांस काव्याची अभिरुचि लागावी म्हणून त्यांजकरितां लिहिलें. त्यांतच थोडाबहुत फेरफार करून सन १९०१ त तें पुन्हा लिहिलें.

प्रथम लेखन १८९४ देवास; पुनर्लेखन १९०१ इंदूर.]

( श्लोक. )

( १ )

नगर सुंदर एक महेश्वर
जवळ उत्तर बाजुस डोंगर
नदि अफाट भयंकर नर्मदा
खळखळाट जिथें करि सर्वदा
स्थळ सुरम्य नसे दुसरें असें
नगर भारतभूषण तें असे
कथिन गोष्ट तुम्हांप्रति तेथली
घडुनि जी शतकें नउ जाहलीं

( २ )

सुखी असोनी जन तेथ एकदां
आली तयांच्या नशिबास आपदा
तया पुरीं उंदिर फार माजले
त्यांच्या अनर्थें जन सर्व पीडले
भीती मनीं श्वान वधोनि त्यांना
लीलेंच ते मारिति मांजरांना
फराफरा ओढिति तान्हुल्यांना
धांवोनियां चावति बालकांना !
मोठ्यांस ही खाउं न घांस देती
ओढोनि हातांतुनि अन्न नेती !

कडाकडां फोडिति जाड माठ
दुधादह्याची मग काय वाट ?
केले विर्झोने पगड्यांमधून
झाली नव्या टाकिति कुर्तडून
त्रिध्या वनोनी किति कापडांच्या
राशी पडाव्या किति रोज त्यांच्या !
आल्या जरी चार घरास वाया
न सोय ती शब्द मुखें वदाया
साधोनिया मंडळ भोंवतालीं
दाटी करोनी मग एक कालीं
करोनि चीं चीं अति तीव्र घोर
गोंगाट देती उडवोनि थोर
किती करावा दुसरा हमामा
वर्णावया शक्ति न खास आम्हां !

( ३ )

बहू जाहले त्रस्त ते लोक सारे
मिळोनी तदा सर्व एक्या विचारें
निघे घोळका चावडीलागिं त्यांचा
गराडा पडे भोंवतालीं जनांचा
म्हणे एक कीं, "मट्ट हे कोतवाल
करारे कुणी यांस ऐसा सवाल
कशाला तुम्हांला जरीदार फेटे
नटाया थटायास शेले दुपेटे ?
पशांनीं तुम्हां ओततों कीं पगार
न कांहींच याचा तुम्हांला विचार !
अहो ! चालला आमचा येथ जीव
न याची तुम्हां बूज, कीं ये न कींव !

हवें लांबवोनी बसायास पाय
सुचावा कसा उंदिरांचा उपाय ?
मिजाशी पुरे ही; स्वकर्मास जागा
चला उंदिरांच्या उपायास लागा !
पडूं द्या जरा त्रास त्या मस्तकास
वळूं ना तरी आपली मोट खास ! ”
असे शब्द येतांच कानीं जलाल
भयें जाहले पांढरे कोतवाल !

( ४ )

साकी.

बघा जरासे मुखाकडे त्या
अतां कोतवालाच्या
कसें दिसे भयचकित वासलें !
बसली त्याची वाचा !
आधिंच मुख तें जसें ठेविलें
माठावरि टरबूज
वर्तुळ झालें शरीर चढली
जणों चहुंकडे सूज !
काय नयन निस्तेज, शिंपली
जुनी मलिन ती जेंवीं
बघुनि मात्र रसभरित ताट ज्यां
झळक नवी उजळावी !
भयें फाडिले तेच बघावे
आतां त्याचे डोळे
कसे निघति बटबटित बटारे
कीं मेदाचे गोळे !
बराच जातां वेळ हळु हळू
वाचा फुटे तयांस

म्हणति " नको ते शेले तुमचे
 पुरवे मज वनवास !
काय करावें उपाय न सुचे
 करितों किती विचार.
भणाणलें हो शिर हें माझें
 ताणुनियां निःसार
काय वेचतें ' उपाय काढा '
 ऐसें मुखें वदाया
सुलभ बोलणें परी न सोपें
 स्वकरें कृती कराया !
पिंजरा तरि"—वदणार पुढें तों
 पट्पट् वाजे दारीं
बघा दचकले कोतवालजी
 घाबरली ही स्वारी !
काय वाजलें पाउल? कीं हे
 आले उंदिरमामा !
उंच करोनी मान पाहती
 सारुनि साऱ्या कामा !

(९)

दिंडी.

बघांत टकमक हे सकल नयन काय
मूक व्हाया काय ह्या मुखां होय?
कुठुनि येई ही मूर्त अति विचित्र?
कोण रेखाटूं शके इचें चित्र?
रंगिबेरंगी झगा पायघोळ !
लाल पिवळा अति सैल पडे झोल
अंगकाठी किति रोड, उंच, काळी.
उरीं केसांची दाट झुले जाळी !

तीक्ष्ण लोचन अंगार पेटतात
मिशा दाढी उभयतां भेटतात !
अधिच त्याचें भाल तें भव्य मोठें
वरी भस्माचे ओढले फराटे !
शेंदुराचा वरि तिलक रसरशीत
नयनिं तिसऱ्या जणुं अग्नि धगधगीत
दोहिं कानीं रुद्राक्ष डोलतात
रुळे स्फटिकाची माळ ही गळ्यांत
खणन् खणके लोखंडि कंकणाची
जोड डाव्या हातांत सैल साची
मुखीं उजळे मृदु हास्य मावळेही
मूर्ति कोठिल कोणा न आकळे ही
तया पुरुषा, वेशास चित्र त्याच्या
बघुनि बोले कुणि पौर अशी वाचा
काय कोणी हे पितर अवतरोनी
इथें स्वर्गाहुनि येति का वरोनी !

( ६ )

श्लोक.

किंचित् पुढें तो सरसावुनीयां
बोले जनांला नर हांसुनीयां
“ प्रभाव माझा न तुम्हांस ठावा
माझ्या मुखें मींच कसा कथावा ?
जे जे जगीं जन्मति जीव-जात
त्यांचें असे जीवन ह्या करांत
जे रांगती, चालति, धांवती जे
जे पोहती कीं उडती नभीं जे
आकर्षुनी त्यांस मनाप्रमाणें
मी नाचवीं जादुत्रिये बळानें !

त्यांच्यावरी जादु करीं परंतु
जे त्रास देती जगतांत जंतुः
जे व्याघ्र सिंहादिक जीव हिंस्त्र
कीं गोम सर्पादि दुजे सहस्त्र
ठावा जरी मी न असें तुम्हांला
प्रख्यात मी गारुडि पुंगिवाला !
खांकेतुनी काढुनि पुंगि हातीं
पुढें करोनी फिरवी जरा ती
पुंगी अशी दृष्टिसमोर आली
झग्यामधें आजुनि जी दडाली !
वोटें तयाचीं स्फुरतात भासे
ती वाजवायास जणों विलासें !
परी दिसे मूकची शांत पुंगी
आली निजेची जणुं तीस गुंगी !
बोले पुन्हा तो मग त्या जनाला
गरीब हा मी जरि पुंगिवाला
तार्तार देशीं जधिं टोळ आले
प्रथावरी मेघ जसे निघाले
या पुंगिनें नाशुनियां तयांला
सुल्तान मी तेथिल सोडवीला !
इराण देशीं घुबडें निघालीं
तान्ह्या मुलांची स्थिति घोर झाली !
आला शहा काकुळतीस भारी
पुंगीच ही संकट तें निवारी !
ज्यांचा तुम्हांला न सुचे उपाय,
त्या उंदरांची मग गोष्ट काय ?
नाशीन ते मात्र करा विचार
मोजून घेई रुपये हजार "

"हजार कां मी परि लाख देतों ?"
तें कोतवाल प्रभुजी वदे तो.

(७)

( सवाई )

हांसत गारुडि शीघ्र निघे
जणुं जाणतसे निजमंत्रबळातें
ते स्फुरती बहु ओंठ तसे कर
फुंकुनि पुंगिस वाजविण्यातें
चंचळ लोचन लाल निळे
झळकूं मग लागति ते लवलाहीं
ज्योत जशी झळके बहु तीवर
झोंकियलें जर मीठ मुलांहीं

(८)

कटाव

फुंकितां गीत पुंगींत किति चमत्कार
मग झाला !
बहु विचित्र पुंगीवाला !
चहुंबाजू पटपट ध्वनि उठे
अफाट जणुं कां सैन्य पुटपुटे,
क्रमें उंच हो घर्घर दाटे
जणों सैन्य तें धांवे वाटे
दणाणला ध्वनि क्रमें भयंकर
जणों धावती रथादि भरभर
घरांमधोनी उंदिर नंतर
उड्या टाकती किति वरखेवर
येथुनि उंदिर, तेथुनि उंदिर
दारांतुनि लुडबुडती उंदिर
खिडक्यांतुनि उंदीर फडकतो

झरोक्यांतुनी टप्‌टप् पडती
एकचि धांदल उडे मग किती
एकावरुनी एक धांवती
उंदिर काळे उंदिर पिवळे
उंदिर पिंगट उंदिर ढवळे;
करडे उंदिर आणि सांवळे
उंदिर डोळस आणि आंधळे;
लठ्ठ, मठ्ठ, कोडगे रोडके
चंचल धांवति वृद्ध बालकें
शिष्ट ऐटिनें डोलत चालति
गुंडबंड ते नाचत निघती
किती शेंपटें मजेंत फिरविती
किती मिशांवर ताव चढविती
आयाबापहि सुना सासवा
चुलत्या चुलते नणदा जावा
माम्या मामे भाऊ बहिणी
धनी आणखी गडी कुणबिणी
यापरि निघती कुळेंची कुळें
घेउनियां पाहुणे रावळे;
ज्यापरि सागरिं लाट जळावरि
लाट भरे नगरांत त्यापरि,
तरंग ज्यापरि हेलकारिती,
वळवळ खळबळ उंदिर करिती,
अफाट ही उंदरांचि सेना,
कोणिकडे ही भुई दिसेना;
पुढें चालला पुंगीवाला
फुंकित पुंगित मृदु गीताला:
मागुनि हा घोळका निघाला:
नाचत साच न उपमा त्याला,

जो तयांवरी ये घाला
स्वप्नही न त्यांचें त्यांला !

विबुध-प्रिया.

यापरी नगरांतले मग सर्व उंदिर घेउनी
ठाकतां क्षणिं गारुडी नदिच्या तिरावर येउनी
घेति शीघ्र उड्या पटापट त्या नदीमधिं उंदिर
लोपला निमिषांत संचय तो जळांत भयंकर
एक उंदिर त्यांतला अति धष्टपुष्टचि भीमसा
जाय पोहुनि नर्मदाजल पैल पार जसा तसा;
गांठुनी अपुली विलायत बंधुंना निज भेटला
सांगतां आपुली कथा बहु अश्रुसागर लोटला.

दिंडी.

कथा सांगे यापरी निज सख्याला:—
" नाद पुंगीचा गोड जधीं झाला,
फुटति नारळ हो ध्वनी गमे त्याचा,
मुरंब्याच्या बरण्याच उघडण्याचा !
जणों कोणी श्रीखंड फेणतात,
काय भांड्यांतुनि राब ओततात,
दुधा लोण्याचीं उघडती कपाटें,
मधुर अन्नें भरतात कुणी ताटें !
फळें ताजीं परिपक्क अति रसाळ
रचुनि राशी करितात जणुं विशाळ,
जणो आमंत्रण करी अम्हां कोणी
मधुर मोहक काढोनि अशी वाणी:—

पद—मंत्र.

या उंदरांनों ! यारे या,
सहपरिवारचि सारे या !
मजा करा रे मजा मजा,
आज दिवस तुमचा समजा

दूध, दहीं, तूप, मही, मधुर फळें, घ्या सगळे !
या बाजार भरे दुनिया !
घ्याच हवें तें चाखुनियां !
या उंदरांनों यारे या !
सह परिवारचि सारे या !
मालटाल यारे उडुं द्या,
घडि न आजची परत उद्यां,
भले बहाद्दर ! खूप भिडा !
हवे तसे या, तुटुनि पडा !
आहारीं-व्यवहारीं, भीड नको, भीति नको
तर मग चंगळ उडवुनि द्या
टंगळमंगळ सोडुनि द्या !
या उंदरांनों यारे या !
सह परिवारचि सारे या !

( दिंडी. )

दिसे फाराच विस्तीर्ण एक भांडें
तुडुंबोनी ज्यांतून पाक सांडे:
कसें झळके, जणुं सूर्य ! अम्हां वाहे,
घेउं जातां नीं नदी पुरीं वाहे "

( साक्या )

आनंदी आनंद उडाला
महेश्वरीं मग भारी
जिकडे तिकडे ध्वजा फडकती
झडति चौघडे दारीं !
जग बघा तर कोतवालजी-
कडे. फुले मुख केवीं !
हुकुमावर किति हुकुम सुटती
संचरली जणुं देवी !

" सुतार आणा, गवंडी आणा,
बुजघा छिद्रं सारीं !
म्हणुन न राहूं द्या उंदरांची
गुह्या उभारा दारीं !
करा सडा संमार्जन, घाला
रांगोळ्या रंगीत !
सणासारखा दिवस समजुनी
गा मंगल संगीत !
मिष्टान्नाचा थाट उडूं द्या
घरोघरीं नगरांत,
पूर्वपुण्य ये उदया भाग्यें
सुख पडलें पदरांत ! "
प्रगटे अवचित ऐन रंगिं या
मुख गारुडि बोवाचें !
म्हणे " प्रथम ते हजार रुपये
टाका मोजुन साचे ! "

(९)

(पृथ्वी)

" हजार रुपये ! " असा ध्वनिच मात्र कानीं पडे
जरा वळुनियां बघा त्वरित कोतवालाकडे !
कसें वदन जाहलें सकळही निळें जांभळें,
हजार रुपये ! कशी रकम गारुड्यासी मिळे
तिजोरि नगरींतसर्वी अधिच ती रिकामी पडे
हजार रुपये ! कशी रकम द्यावया सांपडे !
कशास तरि गारुड्याप्रति भिकारड्या संप्रती !
भरा रकम ? कां अर्धी भरूं नये तिजोरींत तो
कुशाग्र बहु बुद्धिचे खचित आमचे अग्रणी
उगीच डगतोल का कधिहि ते जिभेच्या रणीं

हळूच मिचकावुनी नयन हांसुनी बोलती
स्वकार्य तर साधलें नदिमध्यें न आतां भिती
गिळोनि अमची वसे सकल उंदिरां नर्मदा !
जगांत मृत जाहले, परत काय येती कदा ?
तथापि तुजला गड्या कधिं न पाठवूं विन्मुख
उदार पुर आमुचें सकलही जगा ठाउक !
निमंत्रण तुला दिलें समज ! आज ये भोजना,
तमाखु वर घे, तयावरहि आणखी दक्षिणा !
अर्धीच नगरोत्सवीं सकल हो खजीना रिता
उदारपण आणखीं अधिक ये कसें दावितां ?
धनाविषयिं बोललों, सकलही विनोदांत तें !
तुलाहि कळतां वृथा विचकतोस कां दांत ते ?
हजार रुपये तुला फुकट वाणिचें तांडव !
हजार ! चल जाउं दे, गणुनि घे पुरे पांडव ! ”

( १० )

( श्लोक )

झाला तेव्हां लाल तो पुंगिवाला,
आवेशानें बोलला कोतवालाः—
सोडा थट्टा शीघ्र मोजा धनास,
नाहीं मातें वेळही थांवण्यास
जाणें आहे भोजना कंदहारीं,
पाहे माझी वाट तेथें अत्चारी
झाले विंचू पाकशाळेंत भारी
प्रार्थी मातें तो विचारा अत्चारी.
केला तेथें विंचवांचा विनाश
पाचारी तो प्रार्थुनी भोजनास
व्यापाराची गोष्ट नाहीं तयासी
सोडीना मी एक पैसा तुम्हांसी.

आहे जाणा गांठ या गारुड्याशीं
चाले ज्याशीं ना कुणाची मिजाशी
गेली नाहीं वेळ पाहा अजून,
मोजा. पुंगी जों न वाजे फिरून. "

( ११ )

( शार्दूलविक्रीडित )

बोले तो मग कोतवाल नटसा
तत्काल संतापुनी
रे नीचा ! वद तूं उणे गणसि का
आम्हां अचाऱ्याहुनी ?
टेंभा गाजविशी भिकार डगला
घालोनियां पुंगीचा
कैसा आठविला भिकार तुज हा
चाळा तुझ्या हानिचा ?
सोसूं का वद बोल फोल तुजशा
रे भामट्याचे कदां,
दारोदार फिरोनियां उदर तें
ज्यानें भरावें सदा ?
घोटा दाखविशी अम्हांस धमकी
त्या पुंगिची बेसुर !
जा जा फुंकची फुंक फुंकचि फुटे
जों तें तुझें रे उर ! "

( १२ )

( साक्या )

फिरुनि अवतरे मार्गावर तो
भरभर पुंगीवाला,
श्रवण-मनोरम फुंकित पुंगित
मधुर मधुर गीताला

ध्वनी तीन नव गुणगुणले नीं
काय असल्कृति थाटे
सळसळ हो रव, जणो उसळली
लाल नदी वर वाटे !
झटपट पटपट पाय आपटत
पुटपुट करित मुखानें,
खटपट वटवट टाकुनि चटचट
टाळ्या पिटित करानें,
नाचत भरभर मुलें चिमुकलीं
निघती आनंदानें
गरगर फिरती मधुर पांखरें
जशीं उधळतां दाणे !
रुळती कुरळे केस, झळकती
मधुर गुलाबी गाल,
दांत झळकती हिरे, तळपती
चंचल नयन विशाल !
मधुर मनोहर गीत वाजवित
चाले पुंगीवाला
मुलामुलींचा एक घोळका
मागुनि शीघ्र निघाला !

(१३)

(सुकुमार असुनि तूं)

जन सकल जादुनें विकल ! स्थळाला खिळले !
वदवे न, न हलवे, जणुं चित्रें ते बनले !
टकमका, पाहती फुका, चाललीं बाळें
ज्या बाजुस फुंकित पुंगी गारुडि चाले
यापरी, जाहल्यावरी, स्थिती मग हाय !
करणार बापुडे कोतवाल तरि काय ?

धडधडे, उरीं यापुढें, काय होणार ?
का सकल सोनुलीं टाकुनी हीं जाणार ?
नदिकडे, जधीं संवगडे, सकळही वळले
तयिं सकल मुखांचे पळांत पाणी पळलें
परि जधीं, टाकीलो, नदी वाम अंगास
मग जिवांत आला जीव, फुटे मनिं आस !
गारुडी, घेवची उडी, कसा नदिमाजी ?
का सकल वालगोपाल वधिल हा आजी ?
भरभरा, करोनी त्वरा, गारुडी चाले
डोंगराजवळ त्यामागुनि वालक आले !
नम्र खास, उंच शिखरास, लंघितिल बालें
यापरी मूक जन मनांत म्हणते झाले !
थांवनां, पुंगिही अतां, भेटतिल बालें
हें मनांत येतां आनंदाश्रू आले !
परि हाय, होय हें काय, ? केवढें दार
डोंगरांत उघडे ! कोण आंत अंधार !
फुंकीत, गीत पुंगींत, शिरे हा आंत
गारुडी; सकळ हो मुलें हरपलीं त्यांत !
मग पळें, दार लागलें, चहुंकडे शांत
जाहलें ! उडाला पुरिं एकच आकांत !
परि वाळ, एक पांगूळ, त्यांतलें उरलें:
नच पोंचूं शकलें: खिन्न मागुतें फिरलें !
कां मुला, खिन्न तूं ! तुला, काय तरि झालें ?
हें तयास पुसतां, दीनवदन तो बोले:—
टाकुनी, मला येथुनी, संवगडी गेले,
त्या दिवशीं मुकलों सकल सुखाला अपुले !

स्मरणीय, सकल रमणीय, वस्तु ते वघती,
त्या कोठुनि आतां या दुर्भाग्या दिसती !
आजुनी, स्मरे तो ध्वनी, पुंगिवाल्याचा !
दे वचन असें तो कैवारी बालांचाः—

( पद—आमंत्रणमंत्र )

या बालांनों ! यारे या !
लवकर भरभर सारे या !
स्वस्थ बसे, तोचि फसे, नवभूमी, दाविन मी !
या नगराला लागुनियां
सुंदर ती दुसरी दुनिया ?
या बालांनों ! यारे या !
लवकर भरभर सारे या !
खळखळ मंजुळ गाति झरे,
गीत मधुर चहुंबाजु भरे !
जिकडे तिकडे फुलें फळें,
सुवास पसरे रसहि गळे !
पर ज्यांचे, सोन्याचे, ते रावे, हेरावे,
तर मग कामें टाकुनियां
नवी बघा ही या—दुनिया !
या बालांनों ! यारे या !
लवकर भरभर सारे या !
पंख पाचुंचे मोरांना !
टिपति पाखरें मोत्यांना !
पंख फडकती घोड्यांना !
मौज दिसे ही थोड्यांना
चपल गती, हरिण किती ! देखावे, देखावे,
तर मग लवकर धांउनियां
नवी बघा ही—या—दुनिया !

ठाणे

या बालांनो ! यारे या !
लवकर भरभर सारे या !
वाटलें, व्यंग आपुलें, जाय पायाचें,
तों पुंगे थांवली, तोंड मिटे शिखराचें
कुणिकडे, सकल सांपडे, सौख्य तें आतां ?
भंगले मनोरथ; कांहि न आलें हाता !

(१४)

( अंजनीगीत )

महेश्वरीं आकांत उडाला
तोहिं सांगणें येइ कपाळा;
हळहळतो जन जिकडे तिकडे
दुःखचि सकळांला !
एक म्हणे कीं मुलगा गेला;
दुजो म्हणे नेलें नातेला
एक म्हणें कीं लेक हरपली
काय करूं याला !
चोहिं दिशांला हेर निघाले,
कोतवाल तो त्यांना बोले,
शोधुनि आणा पुंगीवाला
आणिक तीं बाळें ।
सांगा तोंडीं बहु विनवोनी
मन मानेतों धन घे गणुनी
हिरे, माणकें, मोत्यें, सोनें
परि बाळां आणी !
विफल सफल परि यत्न जाहला ।
पुंगीवाला नच सांपडला,
तेव्हां रडती हात हाणुनी
अपुल्या भाकाला

सदा सुखी या कोण जगांत ?
साधूक्ती ही येइ मनांत
धिक् धिक् जीणें बलवंताचें
बालाविण ज्यांत !

शके नऊशें एकुणतीशीं
अश्विन शुद्ध पंचमी दिवशीं
आली समजा गोष्ट घडोनी
खेदजनक ऐशी !

तेव्हां नवशक सुरू जाहला
अजुनी बघतां दिसे तुम्हांला
त्या काळांतिल लेखांवरतीं
अंतीं लिहिलेला !

ज्या मार्गानें मुलें निघालीं
नांव दिलें त्या ' गारुडिआळी '
ख्यात असे तें नगरामध्यें
अजुनी ह्या काळीं !

तेथें वीणा, वेणू, सनई,
वाजविण्याची सक्त मनाई ,
फिरवुनि देई कोतवाल तो
ह्या परिची द्वाही !

कैसीं बाळें लुप्त जाहलीं
स्तंभावरही कथा कोरली
उभा असे तो साक्ष द्यावया
स्तंभहि ह्या काळीं !

चावडीवरी चौबाजूला
शिलालेख हा ठळक कोरिला
विलायतेमधिं अजायबघरीं
अजुनि ठेविलेला !

(१५)

( श्लोक )

असे चीन देशामधें एक जात
निराळी तिची त्या स्थळीं रीतभात
निराळें तिचें रूप तैसाच वेष
बघोनी जनीं बोलवा ही विशेष
कुणी एकदां भूमिच्या गूढ पोटीं
मुलें कोंडिलीं भारतीं सानमोठीं
तयांची असे संतती येथ आली
न ठावी परी त्या कशी कोण कालीं !

(१६)

( शार्दूलविक्रीडित )

राहूं चोख मधे म्हणूनि जगतीं
तूं मीहि साऱ्यांसह
मुख्यत्वें परि गारुड्यांसह मुली,
ह्या पुंगिवाल्यांसह
पुंगी वाजवुनी हिरोत मग ते
उंदीर कीं मांजर
पाळूं आपण आपुलें वचन गे
आधीं दिलें त्यां जर !

समाप्त.

# कवितांच्या प्रथमचरणांची सूची.


अजुनि लागलेंचि दार ... ... ... ... ६४
अनंता तुझे गोल तारे तुझे ... ... ... १२०
आनंदी आनंद मुलांनां आनंदी आनंद ... ... ८१
आलें तुझ्यारे दारीं नृपा ... ... ... ५३
उगेंच काय बुलबुला शिणविसी गळा ... ... ३७
कडकड कडकड तडित् कडाडे जळतें नभ का तनी ... ३६
कधीं भेटतां एकांतीं तीं नाहीं कुणां दिसलीं ... ... १०६
कळ्याकळ्यांत विहार ... ... ... ५९
कांते या जगतीं किती मिरविती लावण्यगर्वाप्रती .. ... १९
कां रे जासी मज त्यजुनी ... ... ... २६
कालाच्या चढुनी श्रमें वरिवरी चवऱ्यांयशीं पायऱ्या ... ७७
काळेभोर विशाळ केश रुळती तीच्या नितंबावरी ... १००
किती हृदय ओढिती हरिण तो प्रमोदें वदे ... ... ७५
कुरणावरतीं वडाखालतीं गाइ वळत बैसतां ... ... २३
कुस्करूं नका हीं सुमनें ... ... ... ९
कृष्णवस्त्र हें भयद् फेंकुनी ... ... ... ८
कोठें शांति तुझा निवास दससी तूं प्रीति कोठें सुखा ... १०९
कोंवळीं फुलें वाळलीं ... ... ... ८६
गेली ज्योति विझोनियां मग फुका फुंका तथाप्य किती ... ७८
घन पिता मम जो नटवी धरा ... ... ... ४
घट भरे प्रवाहीं बुडबुडुनी ... ... ... १४८
घटोत्कचमाया पसरली हिंददेशींया ... ... ... २४
घुमव घुमव एकदां फिरुनि तो गोड तुझा पांवा ... ... ५४
चवघडा झडतो ... ... ... ... ५५
चिवचिव चिमणी छतांत ... ... ... ८८
चंद्रानें गगना पयोधवलशा वाटे रसें व्यापिलें ... ... २०
जन खुळे म्हणति तर अपणं खुळे ... ... १९५

जन्मा येउनियां कुशीं तव तुझ्या स्कंधीं उरीं वाढुनी ... १९
जाउनी, तिला येथुनि ... ... ... १०
जागसी जरी सुकुमारी ... ... ... ४३
जिवलगे सांगे मम सारा ... ... ... १२
जेव्हां हो अति तीव्र शीत सरिता होते हिमाच्छन्न ती ... २३
ज्योत्स्नेनें नभ व्यापिलें ... ... ... ३
झाले जे कवि वंद्य त्यां जन गणो ते मूढ कीं वाटती ... २२
झाले हे जुलमी गडे रोखुनि मज पाहूं नका ... ... १०
तव नयानें उजळले बालरवी ... ... ... ११६
तोनीसांजा सखे मिळाल्या ... ... ... ४५
तुज खेळ वाटली प्रीति मना रे वेड्या ... ... ७५
तुझ्या गळां माझ्या गळां ... ... ... ८९
तू हुबेहुब साउली त्याच मूर्तिची ... ... ... १०३
तेजी चिरंजीव जगीं जहाले ... ... ... ३३
त्वेगानें घनघोर घर्घर रवें गर्जे महासागर ... ... १८
दुदुभी दुंदुमे भारी ... ... ... ... ४२
नदीच्या शेजारीं, गडाच्या खिंडारीं ... ... ८३
नादीं लागुनि तुझ्या चेटक्या जारिण मी ठरलें ... ... १०४
नाहीं ज्या सुमनीं मधू न धिरस्या घे भृंग गुंगोनिया . ... २२
निर्जनीं घोर या वनीं ... ... ... ... ६८
पाडवा उगवला नवा ... ... ... ... ६५
पातालांतूनि येतां वरवर गगनीं सिंधुमाजी जहाज ... २१
प्रभु तुज कवणेंपरि ध्याऊं ... ... ... ११८
प्रीति ना वसे कधींहि उंच त्या गडावरी ... ... ५६
प्रेम तयावर होतं तर मग तुमचं ना भारी ... ... ७९
प्रेमोत्कर्षे मनें परस्पर जगीं आकर्षितो भूवरी ... ... १०८
मध्यरात्रीच्या निवांत समयीं रे माझ्या हृदया ... ... १०१
मधुमासामधि बहार येतो मधुमालतिला गे ... ... २९
मुसाफिर आम्ही ... ... ... ... १७

यापरि असे जीवन ... ... . . ... ४६
या क्षिप्रा चमळा परस्पर कशा आलिंगिती धांवुनी ... ८४
रवी जातां जातांच मंदिरातें ... ... ... १७
रात्रीं शांत निवांत विश्व वश हें निद्रेस झाल्यावरी ... १०२
रासमंडळ गोपीचंदन तुलसिकि माला जय ... ... ८५
रे मानसहंसा माझ्या उड्डाण तुझें अनिवार ... ... ११३
वदन मदनकेलिभुवन ... ... ... ३२
विमल या कलिका लतिकांवरी ... ... ... ४८
वेणूंत नादसम निश्य सखे, हृदयांत. ... ... १५
शुक्राची मृदु चांदणी लखलखे रम्या कुमारी वरी ... ८१
शैशव दिन जरि गेले निघुनी ... ... ... ६३
सखये या स्थानीं ... ... ... ... ३१
सखे अगे ऊठ रवी ... ... .. ... ११
सजलीस जरी हें हृदय सखे फाडाया .. ... ६२
ससर्ज यो विश्वमनंतमेतत ... .. . . ११९
सायंकाळीं मधुपगण ... . ... ७४
संसारसतारीवरि तारा ... ... .. ... ११७
हा श्रीविलासांत सदैव लोळे ... .. ... ५८
हृदय सांग चोरिलें कशास सुंदरी ... .. .... २८
हे भगवंता सदय अनंता ... .. ... १४५
हे मुग्ध नेत्र रागांत कि अनुरागांत ... .. ... ६१

# परिशिष्ट ‘ अ ’

**टीपा**—भास्कररावांच्या कवितांचा आधार समाजाच्या अंतर्बाह्य अवलोकनावर आहे. कवितांच्या मुळाशीं प्रत्यक्ष असे प्रसंग फार कमी. इतर काव्यांचा आधार अगदींच कमी. स्त्रीपुरुषांच्या भावनांची हालचाल कोणास दिसत नाहीं ? ती पाहून लागलेला चटका असले प्रसंग उत्पन्न करते. अशासारखे विचार अन्य वाङ्मयसागरांत नसतील असें नाहीं. कारण वर्ण्यविषय व कवि दोघेहि सारखे असल्यामुळें अशी सदृशता उत्पन्न होणें शक्य आहे. तथापि सामान्य वाचकास कविता उकलण्यास थोडेसें साधन असल्यास बरें म्हणून कांहीं टीपा देत आहें.

१ ‘कुस्करूं नका हीं सुमनें’ भास्करराव रतलाम येथें असतांना एक भाविक गृहस्थ देवपूजेसाठीं एका परडींत स्वच्छ ताजीं फुलें घेऊन चालला होता. गडबडींत दुर्दैवानें ती परडी सांडली व त्या ईश्वर-मस्तकीं वाहल्या जाणाऱ्या जीवितांचा मातींत पडण्याचा व लोकांचे पादाघात सोसण्याचा प्रसंग आला. भास्कररावांनीं खिडकींतून हें पाहिलें व माझ्या ‘फुलांची’ म्हणजे कवितांची ही स्थिति होईल कीं काय, अशी त्यांस शंका येऊन ही कविता त्यांनीं रतलामपासून उज्जैनीस पोंचेपर्यंत आगगाडींतच लिहिली. उज्जैनीस जाऊन भास्करराव हावभाव करीत या गाण्यांतील कडवींच्या कडवीं भाडीवर म्हणत बसले होते. त्यांचे स्नेही रा. नारायणराव दुबे हे त्यांस भेटावयास आले होते; या खुळ्याची ही समाधी उतरत नाहींसें पाहत, दरवाजाशीं हे उभे राहिले. परंतु ‘अंजली धरुनि अर्पिलीं’ हें शेवटचें कडवें आल्याबरोबर नारायणराव दार उघडून आंत धांवत गेले व उपरणें पसरून म्हणाले ‘यांत टाका, नाहींतर मळतील.’ झालें ! समाधी उतरली.

४ या कवनास कोणत्याहि कवितेचा आधार नाहीं. बालपणीं भास्कररावांनीं आपल्या कुटुंबांतील एका स्त्रीची अर्धी उडालेली तिरपीट पाहिली होती. त्याची स्मृति या कवितेस आधार आहे.

५ दुर्दैवानें य.चें दुसरें कडवें मिळालें नाहीं व भास्कररावांनाहि आठ-वत नाहीं. असतें तर बहार झाली असती.

६ यांतील शेवटचा श्लोक भास्कररावांच्या आशेवरून गाळला आहे.

७ हिंदुस्थानांतील किती पतींना असे उद्गार काढण्याची पाळी येत असेल बरें !

८ हें गुराख्याचे तोंडीं गाणें घातलें म्हणजे प्रत्येक गुराख्याच्या मनांत असे विचार येतातच असें खास समजावयाचें नाहीं. कल्पनेच्या साम्राज्यांत व अप्रत्यक्षाच्या वातावरणांत निसर्गाला धरून कवीला असा हक्कानें विहार करतां येतो.

२७ गिएन्झी व शिवाजीची बखर भास्करराव या वेळेस वाचीत होते. त्याचा हा समुच्चयानें परिणाम झाला असेल.

२८ हें सुमन शारदा नाटक पाहून सुचलें आहे.

२९ हें पूरक म्हणून वाचावें.

३० या सुमनांतील शेवटच्या कल्पनेप्रमाणें एक कांहीं पाकळ्या पड-लेलें सुमन संग्रहीं आहे. तें वाचनीय आहे म्हणून जेवढें आहे तेवढेंच देत आहें.

**हे भगवंता । सदय अनंता । तूं भवनाविकराणा**
**अमुची चिंता । तुज, तरी फुटतां । तारी दीनोद्धरणा**
**आदळतें हें । भयकर वादळ । गगनीं वळवीं नयना**
**कामनक्रदळ । वंचित निजबळ । सागरतळ दावोना**
**पैल तिरावर । तेज दिसे घर । अपुलें, त्यावर फिरवी नयना**

३१ ही कविता रा. नारायणराव दुबे यांचा तान्हा मुलगा वारला त्या-वेळीं देवासहून लिहून त्यांस इंदोर येथें पाठविली होती.

३२ 'दाटलें' =खच्चून भरलें आहे.

३३ 'बई' = मुलगी. अशी ताटातूट दुष्काळांत पुष्कळ कुटुंबांत झालेली बऱ्याच जणांनीं पाहिली असेल. अभक्ष्य=झाडाचे पाले वगैरे. यांत विरोधानेंच कवितेचा परिणाम जास्त होतो. प्रो. पाटणकर म्हणत कीं, येथें कल्पना उच्च वातावरणांतून खालीं आल्याचा भास होतो; तसें

तर कांहीं दिसत नाहीं. 'जगाहून भिन्न,' 'मुलाच्या विवाहकालचे विधुराचे उद्गार' वगैरे सुमनें पहा. शिवाय सुखांत दुःखाची आठवण होणें हेंहि मानवी स्वभावास जास्त धरून आहे.

३७ ही नारायणराय डुवे यांसच अनुलक्षून लिहिली होती अशाच अर्थाची भास्कररावांची अत्यंत बहारीची कविता मला अजून मिळाली नाहीं तिचा आरंभ असा आहे. 'अज्ञात आणि अज्ञात सखेहो तुम्ही हृदय माझे,'

३८, ३९ हीं काल्पनिक आहेत.

४०, ४१ कवीच्या मूळ कल्पनांचें सौंदर्य सर्वतोपरी आणून स्वतः-सहि रम्य कल्पना एखादी सुचली तर ती काव्यांत घालण्यास हरकत नाहीं. बहुधा भाषांतर करण्याच्या भानगडींत भास्करराव पडत नाहींत. ४१, ४२, व ७५ एवढ्याच काय त्या त्यांच्या भाषांतरवजा कविता आहेत. एखादे वेळेस इतर कवींच्या रम्य कल्पना डोक्यांत खेळत असतांना त्यांला ते मात्र अत्यंत बहारीचें स्वरूप देतात. अशा प्रकारची एक कविता खालीं देत आहें. टेनिसनची एनॉक आर्डन मधील.

who sets her pitcher
As village girl underneath the spring
Musing on him that used to fill it for her
Hears and not hears and lets it overflow.

या ओळी पहा व पुढील कविता वाचा.

रागः—देस

घट भरे प्रवाहीं बुडबुडुनी
न दिसे तुज का न पडे श्रवणीं ? ॥ध्रु०॥
पदर गळाला, उडे वायुवर
कुरळे उडती केंसहि भुरभुर
प्रमदे ! बघ त्यां सावर आवर
कां उभी प्रवाहीं शून्य मनीं ?
घट भरे प्रवाहीं बुडबुडुनी !
स्वैर गार या झुळुका वाहति
मातीच्या ये त्रास सभोंवति

क्षितिजीं बघ ढग वरवर चढती
बघ घरा निघाल्या सोबतिणी
घट भरे प्रवाहीं बुडबुडुनी २
सळ डोळ्यांवर, काय पाहसी ?
कान देउनी काय ऐकसी !
अचंचळ उभी व्याकुल दिससी ।
उचलिल घट का येवोनि कुणी ?
घट भरे प्रवाहीं बुडबुडुनी ३
पाउल नच तें शेत सळसळे
शब्द न मानवि वारा बोले
शीळ न, वायुच वंशीं खेळे !
कां विरघळसी भ्रमिं फिरफिरुनी ?
घट भरे प्रवाहीं बुडबुडुनी ४
कवळुनि पद, जल थरारुनि हले
स्पर्शुनि शरिरा वारा वरळे
वेली हंसति तुज, फुलवुनी फुलें
डोलती विनोदें तरु बघुनी!
घट भरे प्रवाहीं बुडबुडुनी ५

१४ । ९ । २०

४३ यांतील यमकें पाहूनच एखादा रसिक डुलूं लागेल. पण वाचकानें हीं यमकें कवि जुळवीत बसला असेल असें अनुमान काढ़ल्यास मात्र चूक होईल. यासंबंधीं भास्कररावांच्या पत्रांतील एक उतारा वाचनीय म्हणून देत आहे. " ज्या संपूर्ण सौंदर्याच्या प्रतिमा सांगितल्या त्या काव्याचें शरीर होय. हें शरीर–हीं रस सांठविण्याचीं भांडीं–शब्दांनीं रचिलेलीं असतात. पण हीं आधीं तयार करून नंतर त्यांत रस ओतावयाचा असें मात्र नव्हे. तर आंतील आनंद रस आपल्या स्वभावानुरूप स्वतःच आपलें शरीर धारण करितो. तो जसा असेल तसें शरीर असावयाचें. तो जितका निर्मळ असेल, जितका गहन असेल, जितका पवित्र

असेल, जितका मधुर, तेजस्वी, प्रौढ त्याप्रमाणें हीं शरीरें मनोहर असावयाचीं, अर्थानुरूप शब्द आपल्याआपण येतात. तथापि सर्व साधारण नियम असा दिसतो कीं अंतर्गत रस संगतीं, आवेशानें योग्य वस्त्रालंकारासह शब्दांतून प्रकाशित होत असतो. प्रतिभादेवीचा या प्रकाशनानंतरचा स्वतःचा कानून दृष्टीस पडतो. भवभूति, बाण, ड्रायडन पोप हे कानूनाचे खुशामती सरदार होत. ते काव्यदेवीच्या प्रकाशनाला फाजिल शृंगार चढवूं इच्छितात असें दिसतें. तसेंच वर्डस्वर्थ, ब्राउनिंग इ. बंडखोर असावेसें वाटतें. परंतु काव्यदेवीचा खरा अंमल चालू झाल्यावर यांची बंडखोरी किंवा खुशामत चर् नाहींशी होते व काव्यदेवी आपल्या स्वतःच्या कानूनाप्रमाणें यांच्या मुखांतून प्रकाशित होऊं लागते या कवींचीं वैयक्तिक मतें कोणीकडच्या कोणीकडे राहून जातात हें बारकाईनें यांचे ग्रंथ पाहणाऱ्यांच्या लक्षांत आल्यावांचून राहात नाहीं. कविता सयमक असावी का निर्यमक असावी या प्रश्नाचें उत्तर यांतच आहे.

४६ हें सुमन काल्पनिक आहे. त्याचा कोणाशीं वास्तविक संबंध नाहीं. "

५२-५४ हीं गाणीं मुलांसाठीं लिहिलेलीं आहेत. त्यांतील चाली व विचार मुलांस साजेसे आहेत. मुलांस मोकळ्या मैदानांत, कुरणांत जाऊन वागडण्याची स्वाभाविक हौस असते. सृष्टिशोभा नकळत त्यांजवर परिणाम करते. ही त्यांची स्वाभाविक रुचि ध्यानीं आणून हें गाणें लिहिलें आहे. केवळ सृष्टिस्वभाव व लेंकरांचा तत्संबधीं स्वभाव यांत ग्रथित केला आहे.

५५ ही कविता भास्कररावांच्या पहिल्या मुलाच्या हट्टावरून त्यांस सुचली. मुलाची आई हळदीकुंकवास गेली असतां मुलगा झोंपेतून उठला व त्यानें हट्ट घेतला.

५७ असला विनोद घरोघर चालतो. याला प्रत्यक्ष आधार नाहीं.

५८ हें काल्पनिक आहे.

६१ इंदूर येथें हें दृश्य पाहिलें होतें.

६२ शेवटच्या चार ओळी आशावादावांचून काय दाखवितात ?

६६ या कवितेचें रहस्य ६७ वें सुमन लक्ष देऊन वाचलें असतां तेव्हांच उकलेल.

६७. ६६ व्या कवितेंत विधवेच्या देहावसानीं तिचा प्रणयी पुरुष अकस्मात् नाहींसा झाला. तोच ६७ मध्यें वर्णिलेल्या गिरिगव्हरांत जाऊन बसला. त्याच्या भाषणांत ' शांति, सुखा, प्रीति ! तुमचा वास कोठें आहे ? तुम्ही कांहीं वस्तु आहांत कीं केवळ अर्थशून्य नांवें आहांत ? या चतुर्दशपदींतील प्रश्नावलीचीं उत्तरें आहेत. या वस्तु विषयांत नाहींत; विषयीं जो परमात्मा त्यांत--' तव सहवासीं शांति खरी, सुख खरें, खरी प्रीति '–आहेत. विषयाच्या भुताच्या पिंग्यांत नाहींत. तेथें दिशाभूल झाली असते. सुखरूप जीवात्मा सुखाचा शोध करीत असतो. पण तो विषयांत पहातो, म्हणून अंतीं निराश होतो, कष्टी होतो. कारण सुख विषयाचा भावच नव्हे. तें आत्म्याचें स्वरूप आहे. आत्म्यास विसरून तें भलतीकडे पाहूं गेल्यास कसें सांपडावें ? जेथें जें नाहींच तेथें तें कसें मिळेल ? तें हवें तर अंतर्मुख झालें पाहिजे. ' म्हणुनि चरण मी धरिले आलों शरण विविध रूपीं ! ' सुखप्राप्तीसाठीं द्रव्य, लोभ इ० ची गरज नाहीं.

हें गिरिसुखांतील भाषण म्हणजे नष्ट सख्याचे उद्गार होत. विधवेचें मरण खरोखर पुनर्विवाहप्रतिबंधक दुष्ट रूढीचा परिणाम ! त्या वेळीं जो ' दिगांचा कनवाळु ' नाहींसा झाला तोच ' गिरीमुखांतर्गत नष्ट सखा ' त्याचा शोध मृत विधवेच्या भावास–ज्यास आपल्या बहिणीची मानसिक स्थिति आकलतां आली नाहीं–त्या 'दगडास' लागला. याचा मित्र कोणी ' क्ष ' या नष्ट पुरुषाविषयीं नेहमीं चौकशी करीत असे. त्यास प्रसंग पाहून हा भाऊ गिरिमुखापाशीं घेऊन गेला आहे. एवढी टीप कविता उकलण्यास पुरी होईल.

६९ ' खिरे '–खिरणें म्हणजे कणकण सुटून नाहींसें होणें. वस्त्राचें जसें विरणें तसें मातीचें खिरणें.

## परिशिष्ट ‘ आ ’

हा हा काल कठीण हे भरतभूमाते तुला पातला

*　　　*　　　*

रत्नस्तंभ तुझे अये सकलही आर्य लया पातले

*　　　*　　　*

गेले ना तव हे प्रदीप विझुनि त्वकांति गेली लया
लोपोनी विभवार्क पावत तमा हें राज्य भोगावया
झंझावातज घोर कर्कश रवा विद्युत्प्रपाता महा
सिंह व्याघ्र वराहवन्य पशुंच्या कोलाहलानें अहा
ऐशा केवळ पंचतत्वतुमुलक्षोभा जुमानूनि ना
सोडोनि सदनांत..................गौरांगना
ज्यांचें केवळ नांवही अरिवधूवक्षःस्थलां कंपद
भीतीनें पडतीहि गर्भ गळती वस्त्रें, न चाले पद

*　　　*　　　*

नेले ते रणशूर वीर तव गे कालें मराठे गडी

*　　　*　　　*

ग्रंथ संग्रहालय
नं.........
ता. ........

# शुद्धिपत्र.

| कविता | पद्य | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| १० | ३ | ४ | रजनि अंमल | अमल रजनी— |
| | | | राणिचा. | राणिचा. |
| १२ | २ | १ | मोहरिती | मोहविती |
| १३ | ४ | ३ | आह्मां स्त्रीस | आह्मां स्त्रींस |
| १३ | ६ | ३ | ती सौध | तो सौध |
| ,, | ६ | ४ | सखी-विलोलनयनीं. | सखी विलोलनयना |
| १४ | ३ | ४ | फुंकुनी दिव्य | फांकुनी दिव्य |
| १६ | | १३ | हृच्चित्र दावी सती | हृच्चित्र घेई करीं |
| १७ | १ | ४ | यत्नें तो थर | यंत्रें तो धर |
| ,, | | ७ | असें आंतुन | असे आंतुन |
| १८ | १ | ३ | दुरुनी चालुनी | दुरुनि चालुनी |
| ,, | ३ | ३ | कातडिं | कातडीं |
| २१ | — | ११ | मदिरा मधुरामोदें | मदिरामधुरामोदें |
| ,, | | १४ | कळती | कलती |
| ,, | | १९ | सरस्तटाकीं | तडागतटिं मी |
| २३ | ५ | ३ | सेवुनियां | रोवुनियां |
| ३६ | १ | १ | श्री विलासांत. | श्रीविलासांत |
| ३७ | १ | १ | कळ्या कळयांत | कळ्याकळ्यांत. |
| ४१ | ५ | ३ | कोठवरी | कोठ परी |
| ४२ | १० | ४ | हे दावानलिं | ये दावानलिं |
| | ‘हे कालसागरा’ हें पद्य आर्या नंतर ‘नवलाट’ हें पाहिजे. | | | |
| ,, ४३ | ९ | ४ | कां अकाल | कां अपक्क |
| ४५ | | ८ | श्रमांति सुख | श्रमांतसुख |
| ५० | | ७ | भास्मान् | भास्वान् |
| ५६ | नोट | ३ | वयाचीं | वर्षाचीं |

| कविता | पद्य | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ५८, पान | ९३ | १८ | उद्यां येईल | उद्यां घेईल |
| ६२, पान | १०२ | २ | वत्र सखे | बध संख्या |
| ६७, पान | ११० | ८ | ऐकुनि धरशील | ओढुनि धरशील. |
| ,, पान | ११२ | ८ | खरें हायहाय | सरे हायहाय |
| ,, ,, | ११२ | २२ | वघतो श्रीराम | वसतो श्रीराम |
| ,, ,, | ११२ | २९ | मरण मरग | मरण |
| ७१ | १ | ४ | सुधेच्या सारा | सुधेच्या धारा |
| ,, | २ | ३ | प्रथम सखा | प्रथम रसा |

# परिशिष्ट 'अ'—पुरवणी.

## संस्कृत भाषेचें वैभव.

हा हा ! दुर्दिन घोर हे भरतभूमाते तुला पातले
  रत्नस्तंभ तुझे अये सकलही आर्यें लया पावले
गेले ते तव हेमदीप विझुनि त्वत्कांति गेली लया
  लोपोनी विभवार्क पावत तमा हें राज्य भोगावया

* * *

पाहोनी तुज दीन खिन्नवदना भ्याल्या मृगीच्या परी
  जे माते ! द्रवले बहू हुतभुजीं लोण्यापरी अंतरीं
जे द्याया तुज शांति सौख्य तव गे रक्षावया बालकें
  जे माते ! झटले अहर्निश—
झंझावातज घोर कर्कश रवा विद्युत्प्रपाता महा
  सिंहव्याघ्रवराहवन्य पशुंच्या कोलाहलातें अहा,
ऐशा सर्वहि पंचतत्वतुमुलक्षोभा जुमानोनि ना
  सोडोनी सुकुमार सुंदर घरीं वेल्हाळ गौरांगना,
कष्टें तोडुनि मोहपाश सगळा साहोनियां आपदा
  स्वातंत्र्या तुज द्यावयास शिणल्या ज्यांच्या विभूति सदा
ज्यांचें केवळ नांवही अरिवधूवक्षःस्थला कंपद
  भीतीनें स्रवतीच गर्भ, गळती वस्त्रें न चाले पद,
मारोनी समरीं अरी वळविली शत्रूमुखीं बोबडी
  कालें ते रणशूर वीर तव गे नेले मराठे गडी !

* * *

उन्मत्त द्विप ज्यापरी तुडविती मार्गांत जें जें असे
फोडी शैल-शिला, तरूंस उपटी लोंढा जळाचा तसे
कालप्रेषित वारिपातसमची उच्चप्रदेशांतुनी
आले ध्वंस करीत उग्र यवन त्वेषें उड्या टाकुनी !

येथें येउनि सारखाच यवनीं विध्वंस आरंभिला
केला गोद्विजनाश रात्रदिनही अग्नीं घरां लाविला !

* * *

काला ! ' भारतभूमिनाश करिं मी ' केला दिसे तूं पण
रे काला ! परि तूं खचीत चुकशी नीचा पणीं या पण
नाशूं तूं शकशील वैभव पुरें रे बाह्य नीचा, परी
वाग्देवीविभवापुढें नच चलें तूझी खला चातुरी

* * *

केला नाश जरी असा सकलही कालें तुझा गे तरी
याचा खेद न तूं करी स्वहृदयीं धैर्यास माते ! धरीं

* * *

हिंदू एकहि भूतलीं न उरला, ज्ञानार्कही लोपला
जेथें हो श्रुतिगान, वन्यवनितासंल्लापही जाहला,
जेथें भव्य विशाल सौध नयना आल्हाद देती मना
विद्युद्दीप जिथें सदा झळकती लागोनि अग्नी वना
त्या तेथें प्रळयाग्निही भडकुनी भ्याल्याहि देवांगना

* * *

केला यापरि पूर्ण नाशहि तरी वाचोनि शाकुंतल
जिज्ञासूजन धाउनी दुरुनियां येथें खला येतिल
जी भूमी जनिं जन्म दे कवि गुरु श्रीकालिदासाप्रती
ती पाहूं जननी स्वकीय नयनीं आशा धरोनि अती
येथें कृष्णकभिन्न भिल्लललना रानामधें हिंडतां
कच्चें भक्षित मांस त्यां तरुंतलीं दंतें फुलें तोडतां
पाहोनी अति खिन्न होउनि मनीं रे ते घरा जातिल !
काला ! चावत दांत ओंठ तुजला रे शाप ते देतिल !

* * *

तेव्हांही चमकेल यापरि परी गीर्वाणभाषारवी
सारे भूवरचे कवी चहुंकडे गातील रे थोरवी

REFBK-0001811

REFBK-0001811